
म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. ३०५६

वृत्तपत्रलेखन तंत्र आणि मंत्र

सुधीर राशिंगकर



REFBK-0024324

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.


28
28 NOV 198
13 FEB 1985
18 FEB 1990
1 FEB 1990

(क्र. मा. प.)
५०००-१२-८२

संदर्भ निबंध
३०५६
२४३२४
२४४८

(वृत्तपत्रलेखक संघटना, महाराष्ट्र राज्य, पुणे पुरस्कृत)

वृत्तपत्रलेखन–तंत्र आणि मंत्र


REFBK-0024324

सुधीर राशिंगकर

बी. ई. (मेकॅनिकल)
बी. ई. (इलेक्ट्रिकल)
एम. आय.ई.



उत्कर्ष प्रकाशन, पुणे ४११ ००४.

"घरचे खाऊन लष्करच्या भाकरी भाजणारे" असे ज्यांच्याबद्दल नेहमी म्हटले जाते पण ज्यांची पत्रे वाचक नेहमीच आवडीने वाचतात त्या सर्व जगभर पसरलेल्या असंख्य पत्रलेखकांना

व

त्यांच्या विचारांना व या खटाटोपीला आपल्या स्तंभांतून स्थान देणाऱ्या वृत्रपत्रसृष्टीला हा उपक्रम सादर समर्पित.



प्रकाशक :
सौ. सविता सु. जोशी
उत्कर्ष प्रकाशन
१३५/५/ए–२ रेणूका अपार्टमेंटस
शिवाजीनगर,
पुणे ४११ ००४.

कव्हर छपाई :
मे. के. जोशी अँड कं.
१७४५ सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०.

मूल्य : बारा रुपये

प्रथमावृत्ती :
मे १९८४

मुद्रक :
श्री. प्रमोद वि. बापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९, सदाशिव पेठ,
नागनाथपाराजवळ,
पुणे ४११ ०३०.

"घरचे खाऊन लष्करच्या भाकरी भाजणारे" असे ज्यांच्याबद्दल नेहमी म्हटले जाते पण ज्यांची पत्रे वाचक नेहमीच आवडीने वाचतात त्या सर्व जगभर पसरलेल्या असंख्य पत्रलेखकांना

व

त्यांच्या विचारांना व या खटाटोपीला आपल्या स्तंभांतून स्थान देणाऱ्या वृत्रपत्रसृष्टीला हा उपक्रम सादर समर्पित.



चार शब्द

आपल्या सांस्कृतिक, सामाजिक व राजकीय जीवनात वृत्तपत्रलेखकांना महत्वाची कमगिरी वजावता येते, ते ती बजावतही असतात. समाजप्रबोधनाचे परिणामकारी साधन या दृष्टीने वाचकांच्या पत्रव्यवहाराचे महत्व म्हणूनच मोठ्ठे आहे. प्रसंगी पदरमोड करून समाजातील वैगुण्ये, शासनयंत्रणेतील दोष वा विविध घडामोडींवरील आपले विचार या सदराद्वारे जनतेपुढे ठेवले जातात– हे कार्य अधिक परिणामकारक व्हावे व यात अधिकाधिक नागरिकांचा समावेश व्हावा हे उद्दिष्ट या पुस्तकाचे रूपाने साध्य होईल. संघटनेच्या या क्षेत्रांतील दृष्टीकोनाचा परिपाक म्हणजेच या संघटना पुरस्कृत पुस्तकाची निर्मिती.

पुस्तकाची कल्पना मूर्तस्वरूपात आणण्यासाठी या योजनेच्या कार्यवाहीची व संपादनाची संपूर्ण जबाबदारी पेलण्यासाठी आमचे कार्याध्यक्ष श्री. सुधीर राशिंगकर यांची निवड एकमुखाने होणे अपरिहार्य होते. आमच्या पहिल्याच वृत्तपत्रलेखन स्पर्धेत त्यांना गतवर्षी प्रथम पारितोषिक मिळाले तर त्यांच्या " तुमचे भवितव्य तुमच्या हाती "या व्यवसायमार्गदर्शनपर पुस्तकप्रकल्पाचा रोटरी इंटरनॅशनल या आंतरराष्ट्रीय संघटनेने " महत्कृत्य पारितोषिक " देऊन गौरव केला आहे. या पुस्तकाची आता महाराष्ट्र सरकारच्या शिक्षण संचालनालयानेही दखल घेतली आहे. विविध सामाजिक प्रश्न व गरजा यांवरील त्यांची पत्रे सातत्याने प्रसिद्ध होत असतात. त्यांच्यावर टाकलेली जबाबदारी त्यांनी समर्थपणे पेलली व मेहनतीने हे कार्य पूर्णत्वास नेले त्यामुळेच हे एक आगळंवेगळं पुस्तक आज प्रत्यक्षात उतरु शकले.

पुस्तकप्रकाशनाची पूर्ण आर्थिक जबाबदारी उत्कर्ष प्रकाशनने स्वीकारल्यामुळे संघटनेस हे पुस्तक मूर्तस्वरूपांत आणता आले त्याबद्दल प्रकाशकांचे मनःपूर्वक आभार मानतो व यापुढे त्यांचासंघटनेशी संबंध वृद्धिगतच होईल अशी आशा करतो.

संघटनेची ही सेवा वृत्तपत्रलेखकांना उपयुक्त वाटेल अशी आशा आहे.

श्री. के. के. निकम

अध्यक्ष, वृत्तपत्रलेखक संघटना
महाराष्ट्र राज्य पुणे (१९८४)

१८१ येरवडा, पुणे ६.

पुरस्कार

वृत्तपत्र जिवंत, रसरशीत करण्यात वाचकांच्या पत्रव्यवहाराचाही वाटा असतो. वृत्तपत्र हे जसे संचालकाचें, संपादकाचे, तसेच वाचकांचेही असते. वाचकांना आपल्या वृत्तपत्राशी मनाने जोडून घ्यायचा एक प्रयत्न म्हणजे वाचकांच्या पत्रव्यवहाराचे सदर. पण मराठी वृत्तपत्रांकडे नजर टाकली, तर काही मोजकी वृत्तपत्रे वगळता हे सदर चमकदारपणाच्या बाबतीत अभावानेच तळपत असते. महिन्याभरातील सर्वोत्कृष्ट पत्राला पारितोषिक द्यायची दै. केसरीची योजना म्हणजे हे सदर अधिक वाचनीय आणि आकर्षक बनवण्याची एक धडपड. अर्थात यालाही पुरेसा प्रतिसाद नेहमीच मिळतो, असे नाही. यादृष्टीने विचार करता पुण्यातल्या 'वृत्तपत्रलेखक संघटने'ने चालवलेला या पुस्तकाचा हा प्रयत्न अभिनंदनीय आहे.

वाचकांनी थोडासा आळस, काहीशी उदासीनता आणि बरीचशी अनास्था दूर केली, तर मराठी वृत्तपत्रातल्या या सदराचा चेहरामोहराच बदलून जाईल. समाजापासून तुटकपणे राहायची वृत्ती बाजूला ठेवली म्हणजे झाले ! हे काम सोपे नाही. एखाद्या प्रश्नाविषयी अंतःकरण जळते तेव्हाच लिहिता येते. संपादकीय लिखाणाबाबत जसे हे खरे, तसेच वाचकांच्या पत्रांबाबतही. वृत्तपत्रांनी आपल्यासाठी राखून ठेवलेले स्तंभ वापरायची बुद्धी वाचकांपाशी हवी आणि थोडीशी हौसमुद्धा.

सर्वसामान्य माणसाला रोजच्या जीवनात जाणवणाऱ्या गैरसोयी, अडचणी असोत किंवा आर्थिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातल्या एखाद्या प्रश्नासंबंधी वेगळे मत मांडायचा अथवा एखाद्या भूमिकेचा पाठपुरावा करायचा प्रश्न असो, पत्र छोटेसे असावे. गरजेपेक्षा चारदोन शब्दही अधिक वापरले जाणार नाहीत, याची काळजी घ्यायला हवी. भाषा शुद्ध हवी. उपहास, उपरोध यांना फाटा द्यायचे काहीच कारण नाही, पण अपशब्द नकोत. निंदानालस्ती नको कायद्याच्या दृष्टीने एखाद्याची बदनामी होईल अशी भाषा नको. पाल्हाळ आणि रटाळपणा टाळायला हवा. चांगल्या अक्षरात लिहिलेले पत्र संपादन करणाऱ्याचे लक्ष चटकन वेधून घेते याचीही नोंद घ्यावी.

एखाद्या दोषावर बोट ठेवण्यासाठी, एखाद्या गाऱ्हाण्याकडे लक्ष वेधण्यासाठी किंवा थोरामोठ्यांच्या वागण्या-बोलण्यातली विसंगती दाखवण्यासाठी नेहमीच गंभीरपणाने लिहावे लागते, असेही नाही. हलकेच चिमटे काढणारे, खेळकर भाषेतले एखादे छोटेसे पत्रही त्या दिवशीच्या वाचकांच्या पत्रव्यवहाराला एक वेगळाच

रंग देऊन जाते. आपल्या लिहिण्याला ही अशी आगळी झालर लावून द्यायचा ढंग मात्र हवा, तसेच निकोप मन हवे.

कचरापेटीत न मावणारा कचरा आणि आपल्या घराच्या कोपऱ्यावरचा न लागणारा दिवा याविषयी पत्र लिहूच नये, असे नाही. पण यातूनही आता बाहेर पडायला हवे. शेतमजुरांच्या मागण्यांपासून चित्रपटापर्यंतच्या आणि तऱ्हातऱ्हांच्या उत्सवांपासून अणुयुद्धाच्या धोक्यापर्यंतच्या प्रश्नासंबंधी आपला दृष्टीकोन आग्रहाने मांडायला हवा. संपादकांच्या आपल्याला न पटलेल्या भूमिकेवर कोरडे ओढायला हवेत. चांगले वृत्तपत्र अशा पत्रांना आग्रहाने ठळक प्रसिद्धी देत असते. अशा स्वरूपाच्या पत्रांची मराठी वृत्तपत्रे वाट पाहात आहेत. 'वृत्तपत्रलेखक संघटने 'सारख्या संस्थांनी या दिशेने जरूर प्रयत्न करावा. त्यांना यश लाभावे हीच इच्छा.

दै. केसरी, ५६८ नारायण पेठ,
पुणे ४११०३०.

चंद्रकांत घोरपडे
अध्यक्ष, प्रेसक्लब, पुणे.
(मुख्य संपादक, दै. केसरी)

प्रस्तावना

वृत्तपत्र लेखक संघटनेचे कार्याध्यक्ष श्री. सुधीर राशिंगकर यांनी दैनिकात 'वाचकांची पत्रे' हे सदर संपन्न करणाऱ्या पत्रलेखकांसाठी हे एक क्रमिक पुस्तकच लिहिले आहे. वृत्तपत्रांचे स्वरूप दिवसेंदिवस इतके व्यापक होते आहे की दैनिकातील एकेका विभागाबद्दल यापुढे पुस्तके लिहावी लागतील. 'वाचकांची पत्रे' हा आपल्या दैनिकांतील लोकांशी थेट संपर्क साधणारा एकमेव स्तंभ आहे. समाजात व देशात घडणाऱ्या घटनांबद्दल वृत्तपत्रे आपली मते मांडतात, परंतु वृत्तपत्रात जे प्रकट होते त्याबद्दलची मते वाचकांची पत्रे या सदरात येत असतात. एकपरीने संपादक, समाज व वाचक यांची ही देवघेव असते. अनेक दृष्टीने महत्त्वाचे असे हे सदर आहे व त्याचे भलेपण टिकविणे, त्याचा दर्जा कायम ठेवणे हे सर्व पत्रलेखकांवर अवलंबून असते.

श्री. राशिंगकर यांनी पत्रलेखकाना या पुस्तकात सविस्तर व स्पष्ट सूचना दिल्या आहेत. संपादकांची खुषामत करून आपली पत्रे छापून आणू नका असे बजावून सांगितले आहे. आपले नाव वृत्तपत्रात यावे यासाठीच केवळ पत्र लिहू नका हे सर्व संपादकांच्या मनातील ग्रंथ लेखकाला जाणवले हे फार बरे झाले. पत्रलेखक व कवी हा वर किंवा शाप दोन्ही असू शकतो. ते आनंदही देतात किंवा तापही देतात. उत्तम पत्र हे वृत्तपत्राचे महत्त्व वाढविण्यास कारणीभूत होते तर दर्जाहीन पत्रे आली तर त्या स्तंभाची रयाच जाते. 'मुंबई सकाळ'चा संपादक असताना अधूनमधून एक पत्र येई. त्यावर 'व्यक्तीगत' 'तातडीचे' असे लिहिलेले असे. त्या शब्दांवरूनच ते पत्र कुणाचे आहे हे कळत असे. त्या पत्रात 'माझी पत्रे छापली जात नाहीत' ही तक्रार असे. तुमच्या कार्यालयातील लोक माझ्याविरुद्ध असल्यामुळे ती पत्रे स्वीकारली जात नाहीत असे पत्रात प्रत्येकवेळी लिहिलेले असे. वृत्तपत्रात आपली पत्रे छापून येण्यासाठी अनंत खटपटी करीत फिरणारी माणसे मला दिसतात तेव्हा कधी कधी खिन्नता येते. याउलट टपालात सहजपणे असे पत्र येते की त्यासाठी कोणत्याही शिफारशीची गरज लागत नाही. चांगले ते चांगले हा नियम कित्येक कलेला लागू पडतो तोच पत्रालाही.

श्री. राशिंगकरांनी या पुस्तकात जे मार्गदर्शन केले आहे ते संपादकांच्या भूमिकेशी जुळणारे आहे. प्रत्येक वृत्तपत्राचे काही धोरण असते. संपादकांची विशिष्ट भूमिका असते. ती भूमिका मान्य नसणारेही पुष्कळ असतात. अशी मंडळी वाचकांची पत्रे या स्तंभाचा उपयोग आपली विचारसरशी रेटण्यासाठी करतात. असे एखादे पत्र प्रसिद्ध केले नाही की ते संपादकाबद्दल कडवटपणे बोलू लागतात. वृत्तपत्रे हे व्यासपीठ आहे, संपादकाला जर एखादी सुधारणा व्हावी असे वाटत असेल तर ती अडविण्याचा अधिकार लोकांना जरूर आहे, परंतु त्याच वृत्तपत्राचा उपयोग करून दिलाच पाहिजे असे म्हणता येणार नाही. वाचकांची पत्रे किती

तऱ्हेची असतात. याचा फार चांगला परामर्ष लेखकाने या पुस्तकात घेतला आहे. काही नमुनेदार पत्रे दिली आहेत. हल्ली उपहासात्मक प्रश्नांना खूप भाव आला आहे. वाचकासही ती चांगली वाटतात. लेख लिहिण्यासाठी जसे शब्दसामर्थ्य व शैली लागते तसेच पत्रलेखनालाही लागते. शेवटी विचारप्रधान पत्रांना वृत्तपत्रे महत्त्व देतात हे सर्व पत्रलेखकांनी लक्षात घ्यावे.

तक्रारी किंवा गाऱ्हाणी याबद्दलच्या पत्रांचा पाऊस वृत्तपत्र कचेरीत पडत असतो. स्वतःची झालेली गैरसोय अधिक प्रकट होते. मग त्या त्या खात्यांचे खुलासे सुरू होतात. वृत्तपत्रातील जागा ही फार महत्त्वाची असते. अनेक महत्त्वाच्या बातम्या जागेअभावी रहातात. वाचकांची पत्रे हे सदर नेहमी अग्रलेखाच्या पानावर असते. त्यापानावर जाहिराती नसतात तर ती जागा फार मोलाची असते. तिथे प्रसिद्ध होण्या जोगे आपले पत्र आहेकाय, असा विचार प्रत्येक पत्रलेखकाने करावयास हवा.

कम्युनिस्ट देशात अग्रलेखाला महत्त्व नसते. तेथे वाचकांची पत्रे हे सदर महत्त्वाचे मानले जाते. आपली सर्व तऱ्हेची गाऱ्हाणी (मते नव्हेत) या सदरात मांडण्याची मुभा असते. चीनच्या 'पीपल्स डेली' या दैनिकात सर्वात मोठा विभाग वाचकांचा पत्रव्यवहाराचा आहे. तेथे २० च्या वर उपसंपादक वाचकांकडून आलेल्या पत्रांची छाननी करीत असलेले मी पाहिले. रशियात तीच स्थिती आहे. वाचकांच्या पत्राची ताबडतोब दखल सरकार घेते व ते खाते वृत्तपत्राला आपण काय केले ते कळविते. तो मजकूरही दुसऱ्या दिवशी येतो. 'हिंदुस्थान टाइम्स' सारखे दैनिक वैयक्तिक गाऱ्हाणी एक दिवस प्रसिद्ध करते व खात्याची उत्तरेही देते. वैयक्तिक प्रश्न व सामाजिक प्रश्न यांच्या सीमारेषा सांभाळण्याची फार गरज असते. खात्यांचे खुलासे अनेकदा निरर्थक असतात, परंतु ते छापावे लागतात. या पुस्तकात समाविष्ट केलेल्या पत्रात वाद कसा रंगतो याबद्दल 'गोखले हॉल' बद्दलचे पत्र आहे असा वाद विषय त्या वृत्तपत्राला श्रेय मिळवून देतो. कावळ्याच्या नजरेने केवळ दोष दाखविणाऱ्या पत्रांपेक्षा समाजात परिवर्तन घडवून आणणाऱ्या पत्रांची आज वृत्तपत्राना गरज आहे. वार्ताहर अपुरे पडतात, तिथे पत्रलेखक काम करू शकतात एक दिवस असा यावा की प्रत्येक वृत्तपत्रात निदान १० चांगली पत्रे रोज प्रसिद्ध व्हावीत. या उद्दीष्टाकडे नेण्यास उपयोगी पडेल असेच हे पुस्तक आहे.

यासाठी लेखकाचे अभिनंदन. पुस्तक वाचनीय तर आहेच, परंतु सर्वांना सुयोग्य मार्गदर्शन करणारे आहे.

दि. २८।४।८४
एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉइंट,
मुंबई ४०००२१.

माधव गडकरी
संपादक "दै. लोकसत्ता"



स. न. वि. वि.

कांही महिन्यांपूर्वी केवळ कल्पनास्वरूपात असलेले हे पुस्तक आज आपल्या हाती देतांना कर्तव्यपूर्तीचा एक आगळाच आनंद मिळत आहे. वृत्तपत्रलेखन व स्तंभ-लेखन अभ्यासवर्ग झाल्यापासून त्यातील विचार पुस्तकरूपाने एकत्र असावेत असे वाटायचे. केवळ "वाचकांच्या पत्रव्यवहारात कसे लिहावे "?" या विषयावर आजपर्यंत कोणी लिहिले नव्हते. म्हणूनच ही कल्पना पुढे आली व संघटनेची माजी कार्यकारिणी तसेच बहुसंख्य सभासदांनी ती उचलून धरली. १४ ऑगस्ट १९८३ रोजी झालेल्या संघटनेच्या अभ्यासशिबीरात ती रुजली. अशा पत्रलेखनाच्या तांत्रिक व वैचारिक बाबींवर लिहीतांना महाराष्ट्राच्या विविध भागात पसरलेले हजारो पत्रलेखक नजरेसमोर आले व त्यांच्या अनुभवांना व विचारांना अशा उपक्रमात स्थान मिळाले पाहिजे असे साहजिकच वाटले. अर्थात् सर्वांनाच स्थान देणे स्थल-संकोचामुळे अवघड होते. म्हणून निवडक ६०–७० लेखकांना सहकार्याचे आवाहन केले. त्यांपैकी ४० चे वर लेखकलेखिकांनी तत्परतेने प्रतिसाद दिला, कल्पनेचे स्वागत केले. त्यांचे विचार सविस्तर व अभ्यासपूर्ण होते. पण जागेअभावी व द्विरूक्ति टाळण्यासाठी त्यांचे संपादन करावे लागले. पुस्तकाच्या प्रथम भागात समविचारांना एकत्र स्थान दिले तर प्रत्येकाचे स्वतःचे खास असे अनुभव होते त्यांना "अनुभवाचे बोल" मध्ये जागा मिळाली. काही पत्रे तिसऱ्या भागात दिली. ही पत्रे प्रसिद्ध झालेली आहेत म्हणजेच संपादकीय संस्कारातून गेलेली असल्याने संपादकांना नेमके काय व कोठल्या शब्दात मांडलेले हवे असते त्याची कल्पना येईल. त्याबरोबरच पत्रांचा विषय व त्यातील मूलभूत विचार हा त्या त्या लेखकाचा असल्याने पत्रलेखकांचे हे विश्व किती व्यापक आहे व त्यांनी स्पर्श केलेले विषय "वाचकांचा पत्रव्यवहार" या सदराला गगन कसे ठेंगणे आहे हे दाखवून देतील. सहकार्याबद्दल या लेखक बंधूभगिनींचे आभार मानलेच पाहिजेत. लेखकांची बाजू झाली. पण ज्यांत ही पत्रे छापून येतात त्या वृत्तपत्रांची म्हणजेच त्यांच्या संपादकांची बाजूही विचारात घेणे विषयाचा समतोल राखण्याचे दृष्टीने आवश्यक होते. अन्यत्र उल्लेख केलेल्या अभ्यासवर्गातील संपादकांच्या व्याख्यानांचा यासाठी उपयोग झालाच पण अन्य अनेक संपादक मंडळींनी या पुस्त-

काच्या कल्पनेचे स्वागत करून चर्चेला वेळ दिला, मांडणीसाठी उपयुक्त सूचना दिल्या, हस्तलिखित पाहून सुधारणा सुचविल्या व एक प्रकारे या कल्पनेचा पाठपुरावा केला. या सर्वांचा परिपाक म्हणजेच आता आहे या स्वरूपात निर्माण झालेले हे पुस्तक. या वृत्तपत्रसृष्टीच्या सहकार्याचे व आपुलकीचे ऋण कसे फेडावे हा प्रश्नच आहे.

पुस्तकाचा आकार पाहता हे पुस्तक ३–४ महिन्यांपूर्वीच प्रसिद्ध व्हावयास पाहिजे होते. अनेक लेखकांनी पुनःपुन्हा उत्सुकतेने त्याबाबत विचारले. पण माझ्या व्यावसायिक व्यापांमुळे व अन्य आवश्यक तरतुदींच्या विशेषतः आर्थिक जुळणीतील विलंबामुळे प्रसिद्धीस विलंब झाला.

या पुस्तकाच्या निर्मितीबाबत बहुमोल आर्थिक व नैतिक मार्गदर्शन उत्कर्ष बुक सर्व्हिसचे श्री. सुधाकर जोशी यांनी केले, एवढेच नव्हे तर पुस्तकाची आर्थिक व वितरणाबाबतची पूर्ण जवाबदारी स्वीकारली. संघटनेचे माजी अध्यक्ष श्री. पतके विद्यमान अध्यक्ष श्री. निकम, उपाध्यक्ष श्री. ह. बा. शिंदे कार्यवाह श्री. बाजीराव नलावडे, कोषाध्यक्ष श्री. राजमाचीकर, श्री. मधुकर अत्रे तसेच कार्यकारीणीच्या सर्व सभासदांनी व अन्य संघटना सदस्यांनी वेळोवेळी सहकार्य केले. सर्वांचा नामोल्लेख केवळ स्थलसंकोचामुळे करता येत नाही त्याबद्दल मी सर्वांची क्षमा मागतो व त्याबरोबरच आभारही मानतो. चित्रकार श्री. अरुण फडणीस (मुखपृष्ठ), श्री. प्रमोद बापट, (छपाई), श्री. रत्नाकर जोशी (कव्हर छपाई) यांचेही आभार मानणे कर्तव्यप्राप्त आहे. श्री. चंद्रकांत घोरपडे, अध्यक्ष प्रेसक्लब, पुणे यांचा पुरस्कार व श्री. माधव गडकरी, संपादक, दै. लोकसत्ता यांची प्रस्तावना हे वस्तुतः 'वाचकांचा पत्रव्यवहार' या विषयावरील 'अग्रलेख'च आहेत. उभयतांनी आपल्या धावपळीतून वेळ काढून लिहिले ते पत्रलेखकांवरील प्रेमाखातरच. मी व्यक्तिशः व संघटनेतर्फे त्यांचे आभार मानतो.

प्रत्यक्ष संपादनास सुरुवात केल्यावर या एरवी साध्या वाटणाऱ्या विषयावरही नागरिक किती विचार करतात हे पाहून मन थक्क झाले. जागरूक समाजाचे हे चित्र भावी काळाचे आशादायक चित्र रंगविते. सध्याच्या जागेच्या टंचाईत व महागाईतही बहुतेक सर्व वृत्तपत्रे व अन्य नियतकालिके या सदरासाठी आवर्जून भरपूर जागा देतात त्यातून त्यांनाही या स्तंभाचे महत्व किती वाटते ते दिसून येते. या पुस्तकाची कल्पना सांगितल्यावर नागपूरच्या एका लेखकाने आम्हास लिहीले की, "खरा लेखक अशा पुस्तकातून वाचून मग लिहीण्याइतका वेळ थांबेल हे खरे नाही. फक्त त्याने लिहीलेले वृत्तपत्रांनी छापले पाहिजे." आमचा हा प्रामाणिक प्रयत्न ते छापण्यायोग्य कसे होईल याकरता आहे. व या प्रयत्नातून अगदी मूठभर लेखकांच्या लेखनपद्धतीत फरक पडला तरी मोठ्ठेच समाधान

लाभेल. म्हणूनच पुस्तकाबद्दल आपले मत व त्याद्वारे कोणास फायदा (वा तोटा) झाल्याचे आम्हास कळविल्यास बरे होईल.

पुस्तकनिर्मितीच्या निमित्तान गेले ४–६ महिने एका निराळ्या विश्वात वावरायला मिळाले. ही सेवा समाज स्वीकारेल अशी आशा आहे. इतरत्र दिलेल्या संघटनेच्या माहितीद्वारे लेखकानी एकत्र का यावे ते कळेल. संघटनेद्वारे सामूहिक प्रयत्नातून हे समाजसेवक अधिक भरीव कार्य करू शकतील. म्हणूनच अशा उपक्रमाकडे विधायक दृष्टीने संबंधितांनी बघितले पाहिजे. (वृत्तपत्रलेखक संघटना म्हणजे खरे तर "वृत्तपत्र–पत्रलेखक संघटना" भाषेच्या सोईसाठी त्यातील एक "पत्र" गिळून टाकले. तसेच या पुस्तकाच्या नावातीलही. पण त्यामुळे आशयाला बाधा येत नाही.)

शेवटी खालील दोन विचार आवर्जुन मांडावेसे वाटतात. बऱ्याच पत्रलेखकांनी वारंवार अशी मागणी केली आहे की ज्या अंकात पत्र छापून येते तो अंक भेट म्हणून वृत्तपत्रातर्फे त्यांना मिळावा. स्वतःचे छापून आलेले पहायला मिळणे याचे सुख व समाधान आगळे असतेच. पण नंतरही एखाद्या तक्रार व सूचनेचा पाठपुरावा करण्यास ते सोईचे होते. या मागणीच्या पूर्ततेत वृत्तपत्रांच्या कांही अडचणी असतील. पण या सूचनेवर गंभीर विचार झाला तर लेखकांना अनेक वृत्तपत्रांकडे विचार पाठविण्यास प्रोत्साहन मिळेल.

तसेच वृत्तपत्रांप्रमाणेच आकाशवाणी व दूरदर्शनवरही अशाच प्रकारचे सदर चालू करता येईल काय याचा केन्द्र सरकारने विचार केला पाहिजे. अर्थात विचारांना स्थान मिळण्यात या प्रसार माध्यमांत मर्यादा जरूर पडतील पण त्यावर विचारपूर्वक चौकट आखता येईल. संबधित याचा अवश्य विचार करतील अशी आशा आहे.

या प्रकल्पास ज्या ज्या व्यक्ति, संघटना वा संस्थांनी सर्वप्रकारे सहाय्य केले, प्रोत्साहन दिले त्या सर्वांचे व्यक्तिशः ऋण मानून मी आपली रजा घेतो.

आपला,

–सुधीर रांजिणकर
कार्याध्यक्ष – वृत्तपत्रलेखकसंघटना
(१९८४)

"शिवकृपा" १२०६ ब। २५
शिवाजीनगर, पुणे ४११००४
दूरध्वनि ५५१६२.

आभार

वृत्तपत्रलेखक संघटना व वृत्तपत्र विद्याविभाग, पुणे विद्यापीठ यांच्या सहकार्याने १९८२ मध्ये १८ व २५ जुलै रोजी "वाचकांचा पत्रव्यवहार" या विषयावर अभ्यासवर्ग घेण्यात आला होता. त्यांत दै. सकाळचे संपादक श्री. श्री. ग. मुणगेकर, दै. केसरीचे संपादक श्री चंद्रकांत घोरपडे, दै. तरुण भारतचे त्यावेळचे संपादक श्री. वि. ना. देवधर आणि वृत्तपत्रविद्याविभागाचे त्यावेळचे प्रमुख श्री. ल. ना. गोखले यांची उद्‌बोधक व्याख्याने झाली. त्या व्याख्यानांतील मुद्‌द्यांचा या पुस्तकाच्या मांडणीत उपयोग झाला हे नमूद करावेसे वाटते.

तसेच या पुस्तकाची मांडणी व निर्मिती करताना खालील संपादक मडळींनी बहुमोल मार्गदर्शन केले. त्यांचे आम्ही आभारी आहोत.

श्री. श्री. द. वाघ, संपादक, दै. महाराष्ट्र हेरॉल्ड, पुणे.

श्री. द्वारकानाथ लेले, सहसंपादक, दै. सकाळ, पुणे.

श्री. एकनाथ बागूल, सहसंपादक, दै केसरी, पुणे.

श्री. चं. प. भिशीकर, माजी संपादक, दै. तरुण भारत, पुणे.

श्री. सुधाकर देशपांडे, सहसंपादक, दै. तरुण भारत, पुणे.

खालील वृत्तपत्रलेखकांनी आपले विचार वा प्रकाशित पत्रांची कात्रणे पाठवून या प्रकल्पास सक्रीय साहाय्य केले. त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच.

१) मुंबई– श्री. गो. शं हुजुरबाजार, १४ मनोहरमहाल, २५२ मोघल लेन, माहीम, मुंबई १६.

श्री. सूर्यकांत खैरे, राधासदन, जवाहरनगर, मारुती मंदिराजवळ, खार (पूर्व) मुंबई ५१.

फादर फ्रान्सिस दिब्रिटो, सेन्ट पॉल्स कॉलेज, गोरेगांव, मुंबई ६३.

२) पुणे – श्रीमती शारदा ढवळे, कोहिनूर मंगल कार्यालजवळ, कर्वे रोड, पुणे ४.

श्री. नी. वा. देशपांडे, न्यू आर बी १ रेल्वे क्वार्टर्स, ताडीवाला रोड, पुणे १.

श्री. अ. का. ऊर्फ तात्या फडके, १७८५ सदाशिव पेठ, पुणे ३०.

श्री. विठ्ठलराव पवार, ५८९ घोरपडे पेठ, विठ्ठल मंदिराजवळ पुणे २.
वैद्य वा. वि. मेहेंदळे, ४०३/१, शनिवार पेठ, पुणे ३०.
श्री. ग. स. ठोसर, मेजर (रिटा.) १०९५ सदाशिव पेठ पुणे ३०.
श्री. बी. एल. तारी, ८५/१ वनाझ कॉलनी, पौड रोड, पुणे २९.
श्री. मा. ना. भिडे, ४ गृहकल्प अपार्टमेंटस्, कर्वे रोड, पुणे ४.
डॉ. पां. गो. पुरंदरे, ८४९ सदाशिव पेठ, पुणे ३०.
श्री. सुहास मुंगळे (मास्तर), ४०९ कसबा पेठ, पुणे ११.
श्री. पां. य. कोडीतकर, ४८८ शुक्रवार पेठ, पुणे २.
श्री. ना. रा. देशपांडे, परीतकर ब्लॉक्स, वडगावशेरी, पुणे १४.
श्री. ह. बा. शिंदे, ४८ मंगळवार पेठ, पुणे ११.
श्री. पु. शं. पतके, १२०४।३० शिवाजीनगर, पुणे ४.
श्री जुगल राठी, प्रभात चेंबर्स, बाजीराव रोड, पुणे २.
श्री. का. नी. मुळे, ५७९ बुधवार पेठ पुणे
श्री. मु. दा. कुलकर्णी, ७२२ अब, नवी पेठ, पुणे ३०
श्री. द. रा. कदम,
सौ. नीता मुळे
श्री. सुरेंद्र पाठक

३) बोदवड– श्री. बाबूराव गंभीर वाणी, बोदवड (जळगाव)

४) पिंपरी – श्री. नंदकुमार वसंत सातुर्डेकर, पिंपरी वाघेरे, पुणे १७.

५) सांगली – श्री. श्री. ग. सबनीस, दांडेकर बिल्डिंग, पेठभाग, सांगली,

६) कोल्हापूर – श्री. राम हरोलीकर, डी २८१६ शुक्रवार पेठ, कोल्हापूर.

७) मंगळवेढा – श्री. सुरेश दीनानाथ जोशी, मंगळवेढा.

८) सोलापूर – डॉ. रवि जवळगेकर, ४८ नवी पेठ, सोलापूर १.
श्री. भा. शं पटवर्धन, १७२ दक्षिण सदर बाजार, सोलापूर ३.
श्री. वि. बा. अयाचित, ६५ क नवी पेठ, सोलापूर ३.

९) उरण – श्री. चिंतामण वामन उपाध्ये, उरण (रायगड)

१०) वाई – डॉ. प्र. शं. मराठे,
डॉ. शरद अभ्यंकर,

११) फलटण – प्रा. वि. अ. शेख,

१२) आटपाडी – श्रीमती जयनंदा शंकरदेव देशमुख, आटपाडी (सांगली)

१३) नायगाव – श्री. रघुनाथ पां. शिरकर, पो. नायगाव, ता. वसई.
१४) तळेगाव दाभाडे – ॲड. पु. वा. परांजपे, तळेगाव दाभाडे, जि. पुणे.
१५) कारंजा – प्रा. अनिल भागे, कारंजा (जि. वर्धा)
१६) बेलापूर – श्री. विष्णुपंत गोविंद डावरे, बेलापूरगाव, जि. नगर.
१७) नीरा – श्री. वि. ना. चौधरी, नीरा (जि. पुणे)
१८) अमरावती – श्री. जुगलकिशोर राठी, कल्पना भवन, जनादेन पेठ,
अमरावती १.
श्री. गोविंद कासट, सतीधाम मार्केट, जवाहर रोड, अमरावती
१९) लोणावळा – श्री. मो. म. आगरवाल



वृत्तपत्रलेखन–तंत्र आणि मंत्र

वाचकांचा पत्रव्यवहार

" वाचकांचा पत्रव्यवहार " हा आज जगातील कोणत्याही भाषेतील बहुतेक सर्व नियतकालिकांचा अविभाज्य व अपरिहार्य स्तंभ बनला आहे. हा स्तंभ नसणारे वृत्तपत्र विरळाच आणि असे होणे हे साहजिकच आहे. कारण समाजातील ताजेपणा व जीवनकलहाचे प्रतिबिंब या स्तंभात दिसते. वाचकांची चावडी, वाचकांचे मनोगत जनमताचा कानोसा अशा विविध व समर्पक नावाने हा स्तंभ वृत्तपत्रातून आढळतो व नेमकी ही नावेच या स्तंभाचा कार्यकारणभाव पटवून देतात. एक प्रकारे हा स्तंभ हे मुक्त व्यासपीठच असते. त्यातील विविधतेमुळेच हा वाचनीयही बनला आहे

वाचकांशी नाते

वृत्तपत्रांचे डोळे म्हणजे वाचकांची पत्रे. वर्तमानपत्रांचा समतोल राखण्याचे महत्त्वाचे कार्य या स्तंभाद्वारे संपादक साधतात. काही संपादक तर या पत्रांना छोटेछोटे अग्रलेख मानतात व संपादकीयांनंतर या स्तंभाचे महत्त्व मान्य करतात. त्यामुळेच की काय बऱ्याच वृत्तपत्रांतून खुद्द संपादक वाचकांच्या पत्रांची निवड करतात. किंबहुना वाचकांशी नाते जोडण्याचा वृत्तपत्रांचा वा अन्य नियतकालिकांचा हा एक प्रांजळ प्रयत्न असतो.

सामाजिक उपयुक्तता

समाजातील विविध समस्या या पत्रव्यवहारामुळे दृष्टोत्पत्तीस आणल्या जात असल्याने व त्या निमित्ताने त्या समस्येचे विविध पैलू दृष्टोत्पत्तीस येत असल्याने या स्तंभाची सामाजिक उपयुक्तताही मोठी आहे. एका वृत्तपत्र लेखकाच्या मते हे तक्रारनिवारण केंद्रच आहे. दुसरे त्यापुढे जाऊन म्हणतात की पत्रें ही हेडकॉन्स्टेबलस स्थानिक वृत्तपत्रे या पोलीस चौक्या तर जिल्हा वृत्तपत्रे ही पोलीस हेडक्वॉर्टर्स आहेत. यामागची भावना हीच की कायदा व सुव्यवस्था राखणे हे जसे पोलीसाचे काम तसेच काम ही पत्रे काही अंशी बजावतात. म्हणूनच पत्रलेखकाला जागल्या म्हटले तर ते वावगे ठरू नये.

यशस्वी पत्रलेखक

काही सांगायचे असते म्हणून लेखक पत्र लिहितो. पण नुसती पत्रे छापून आली म्हणजे यशस्वी पत्रलेखक झाला हे म्हणणे कितपत यथार्थ आहे ? वृत्तपत्र-लेखन ही म्हणली तर कला आहे, म्हटले शास्त्र आहे. पत्राद्वारे किती समस्या समाजापुढे मांडल्या, त्यातल्या किती सोडविता आल्या, समाजात त्यावर किती विचारमंथन झाले, पत्रांतून किती पत्रे निर्माण झाली, पत्रांतून दिलेला संदेश कोणा-साठी होता व तो तिथपर्यंत पोचला का ? का तो एकतर्फीच झाला ? काय लिहिले व कोणासाठी लिहिले ? या सर्वांतून पत्राची यशस्वीतता सिद्ध होणार असते. काही-तरी सांगायची तळमळ असते म्हणून वाचक पत्रे लिहितो पण जे सांगायचे ते योग्य पातळीवर पोचविणे व त्यातही एखादा विचार वा प्रसंग सारांशरूपाने मांडता येणे या गोष्टी सहजसाध्य नसतात. त्यासाठी प्रयत्न व अभ्यास आवश्यक असतात. मात्र थोडचाफार प्रयत्नाने लेखन कौशल्य वा शैलीत निश्चित सुधारणा होऊ शकते. पत्रे छापून यायला लागली म्हणजे लेखकाला उत्तेजन मिळते, लेखनाची आवड वाटत जाते व त्यातूनच हळूहळू यशस्वी पत्रलेखक आकार घेऊ लागतो.

पुस्तकाचे प्रयोजन

आणि यासाठीच या पुस्तकाचे प्रयोजन. बऱ्याच नागरिकांना समस्या वा आपले विचार मांडायचे असतात, ते जनतेपर्यंत पोचवायचे असतात पण ते नियत-कालिकांना हव्या त्या वैचारिक व तांत्रिक साच्यात बसले नाहीत तर बाजूला पडतात व अंती लिहीणाऱ्याची निराशा होते. या पुस्तकातील विविध वृत्तपत्रलेखक व संपादकांच्या अनुभवाधिष्ठित विचारातून निश्चित अशी दिशा लिखाणास मिळू शकेल असे वाटते. कारण शेवटी संपादकांची गरज, वृत्तपत्रांच्या व अन्य नियत-कालिकांच्या विविध प्रकारच्या मर्यादा व त्यांची बंधने जाणून घेणे हेही लेखकाचे कर्तव्य आहे.

नियतकालिकांचे प्रकार

प्रत्यक्ष लेखनाकडे वळण्यापूर्वी नियतकालिकांचे प्रकार थोडक्यांत पाहू. दैनिके, अर्धसाप्तहिके, साप्ताहिके, मासिके, पाक्षिके, द्वै त्रैमासिके वा वार्षिके अशा विविध प्रकारात त्यांच्या छपाईच्या कालक्रमानुसार नियतकालिके असतात. यांपैकी बहुतेक सर्व प्रकारात "वाचकांचा पत्रव्यवहार" हा स्तंभ असतो. दैनिके सोडली तर बाकी सर्व नियतकालिके ही बव्हंशी एखाद्या विशिष्ठ क्षेत्राला वाहिलेली असतात जसे खेळ, सिनेमा, नाटच, कला, छंद, राजकारण, समाजकारण धार्मिक विचार तसेच कुमारगट, तरूण, स्त्रिया वगैरे वगैरे. साहाजिकच त्यांत प्रसिद्ध होणारी पत्रे

(किंवा प्रसिद्धीसाठी निवडली जाणारी पत्रें म्हणा) ही त्यात्या क्षेत्रांशी संबंधित किंवा त्यात्या नियतकालिकांत पूर्वी येऊन गेलेल्या लेखावरील प्रतिक्रिया व्यक्त करणारी किंवा एखाद्या विषयावरील अनुभव व्यक्त करणारी अशा स्वरूपाची असतात. त्यामुळे अशा नियतकालिकांकडे पत्रें पाठवताना त्यांच्या स्वरूपाचे भान रांखणे महत्वाचे असते.

दैनिकांचें क्षेत्र

याऊलट दैनिकांच्या विश्वात विषयांचे व्यासपीठ अधिक व्यापक असते. व त्यामुळे विषय वा समस्यांचे वैविध्य विशाल बनू शकते. मात्र प्रत्येक दैनिकाचे राजकीय वा सामाजिक धोरण, कार्यक्षेत्र, वाचकवर्ग हे सर्व ठरलेले असते व पत्रें निवडतांना या निकषांचा विचार संपादकवर्गास करावा लागतो हे लक्षात ठेवले पाहिजे. म्हणजेच पत्राचा विषय वा मांडणी दैनिकांच्या स्वरूपावर आपणास ठरवावी लागेल. ज्यांचा खप एखाद्या गांवापुरताच मर्यादित आहे. अशांपासून तालुकापत्रें, जिल्हापत्रे, विभागीय पत्रे, प्रांतिक पत्रे व अखिल भारतीय स्तरांवरील दैनिके असे दैनिकांचे विविध प्रकार त्यांचे कार्यक्षेत्र वा खप याप्रमाणे पडतात. शिवाय राजकीय पक्षांची दैनिके, सामाजिक संस्थांची दैनिके असेही प्रकार असतात. या सर्वांतून त्या त्या दैनिकात कुठल्या प्रकारच्या पत्रांना स्थान मिळणार हे ठरत असते. शेवटी संपादकांनाही पत्रांचा वाचकवर्ग कोण आहे हे लक्षात ठेवून पत्राच्या विषयांची निवड करावी लागते. वृत्तपत्रलेखकाने याचा अभ्यास करून आपले पत्र कोणत्या दैनिकाकडे वा नियतकालिकाकडे पाठवायचे हे ठरवले पाहिजे.

पत्रांचे प्रकार

यानंतर प्रश्न येतो तो वाचकांच्या पत्रव्यवहारात येणाऱ्या पत्रांचे प्रकार– स्थूलमानाने याची विभागणी पुढीलप्रमाणे होऊ शकेल. नागरिकांच्या जिव्हाळ्याचे आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय वा स्थानिक धोरणाचे विषय, स्थानिक तक्रारी, विविध विषयावर शेरेबाजी करणारी, शैक्षणिक, सांस्कृतिक, धार्मिक, सामाजिक शासकीय प्रश्नांविषयीं टीका करणारी वा स्वत:ची मते मांडणारी, नागरी गरजा व सुविधा यातील अडीअडचणींना वाचा फोडणारी पत्रे वगैरे वगैरे. पूर्वी राजकारणावरील पत्रे हाच महत्वाचा विषय असे. पण आता वरील अन्य विषयांवरील पत्रांना महत्वाचे स्थान या स्तंभात मिळते. अशा प्रकारे 'वाचकांचा पत्रव्यवहार' हा स्तंभ हे वाद-विवादाचे मुक्त व्यासपीठच होऊन बसले आहे.

आदर्श पत्र कोणते ?

आता आदर्श पत्र कोणते हाही वादविवादाचा विषय होऊ शकतो. पण एका

प्रथितयश संपादकांच्या मते अनुभवावर आधारलेले, वेगळेंपणा असलेले, प्रचलित विषय वा समस्येवर स्वत:चा प्रथम पण वेगळा अनुभव वा मत मांडणारे पत्र हे आदर्श म्हटले पाहिजे. त्यादृष्टीने असे आदर्श पत्र तयार करण्यासाठी ज्या दोन आवश्यक अंगांचा विचार करणे प्रत्येक पत्रलेखकाला आवश्यक आहे त्याचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते. त्यांपैकी एक म्हणजे पत्राचे तांत्रिक अंग व दुसरे वैचारिक अंग.

पत्राचें तांत्रिक अंग

तांत्रिक अंगात पत्राचा दर्शनी भाग येतो. तुमची व पत्रे निवडणाऱ्या संपादक-वर्गाची पहिली भेट पत्राच्या दर्शनातून होत असते. पत्र हातात पडल्याबरोबर त्यांत मांडलेल्या विषयापेक्षा पत्र कशा स्वरूपात पाठविले आहे. यावरून संपादकवर्ग त्या पत्राकडे आकर्षित होतो. या महत्वाच्या बाबीचा लेखकाने विचार केला पाहिजे. ("फर्स्ट इंप्रेशन इज लास्ट इंप्रेशन" किंवा 'प्रथम तुज पाहता' या उक्तींची येथे आठवण यावी).

कागद व अन्य बाबी

पहिली गोष्ट कागद. कागद पांढराशुभ्र असणे उत्तम. (गुलाबी वा अन्य रंगांचा कागद वापरण्यास हे काही प्रेमपत्र नव्हे, होय की नाही?) कित्येक लेखक कागदाकडे दुर्लक्ष करतात. चुरगळलेला, पिवळा, अगदी तोकडा, पाठकोरा कागद वापरून काटकसर करण्याचा प्रयत्न करतात ते योग्य नाही. पाठपोट लिहीण्याचा मोह अशाकरता टाळला पाहिजे की पत्र नंतर जुळणीखात्याकडे जाते तेथील संस्कारांकरता पाठपोट लिहीलेले पत्र हाताळणे अवघड असते. पांढराशुभ्र, पुरेसा मोठ्ठा (शक्यतो १।४ डेमी) कागद, व्यवस्थित समास सोडून, सुवाच्च अक्षरात लिहीलेले, दोन ओळीत पुरेसे अंतर सोडून लिहिलेले पत्र वाचणाऱ्याचे लक्ष चटकन् वेधून घेते. कारण अशा पत्रांवर संपादकीय व छपाईचे संस्कार करण्यास संपादक, सहसंपादक कम्पोजर किंवा प्रूफरीडर यांना फार कष्ट पडत नाहीत. आपले स्वत:चे अक्षर चांगले असले तर उत्तमच (अर्थात् आपले अक्षर आपल्याला चांगले वाटणार यात शंका नाही पण ते इतरांना कसे वाटते हे महत्वाचे व त्याकरताच इतरांचा सल्ला किंवा मत घेणे उत्तम.) नसलेच तर ज्याचे अक्षर चांगले आहे अशाकडून लिहून घ्यावे. टंकलिखित असले तर सोन्याहून पिवळे पण टंकलेखनाचा खर्च करण्याची तयारी हवी.

पत्राच्या वर उजव्या कोपऱ्यात 'वाचकांच्या पत्रव्यवहारासाठी' (अगर ज्या नियतकालिकाकडे पत्र पाठवायचे त्यांत या स्तंभासाठी जे नाव असते त्या

नावाचा) असा उल्लेख असला म्हणजे निवडीचे काम अधिक सोपे होते. गिचमिड अक्षरातील वा कसेतरी खरडलेले पत्र असले तर वाचणारी व्यक्ती कंटाळून जाते व कित्येक वेळा आशय कितीही चांगला असला तरी पत्र बाजूला पडते.

जागेची टंचाई

जागेची टंचाई ही वृत्तपत्रांनांही जाणवत असतेच. तसेच संपादक व त्यांचे सहकारी यांना वेळेचीही टंचाई असते. आपल्या पत्राने त्यांची फार जागा वा वेळ व्यापू नये हे पाहिले पाहिजे. यासाठी लिहीणे स्पष्ट असावे व थोडक्यांत मांडावे. पत्राच्या लांबीची मर्यादा अवश्य पाळावी. लांबलचक पत्र बऱ्याच वेळा नाकारले जाते. या सदरात अधिकाधिक लेखकांच्या विचारांना स्थान मिळावे या दृष्टीने हे योग्यच आहे. थोडक्यांत पण मुद्देसूद विचार मांडलेले पत्र चटकन् स्वीकारले जाते. त्याकरता पाल्हाळ न लावता सरळ मुद्यावर आलेले उत्तम, शक्यतो १५-२० ओळीत पत्र संपलेले चांगले. तसाच महत्त्वाचा विषय असल्यास लांबले तरी स्वीकारतात पण असे विरळा.

भाषा

पत्रात नेमकेपणाबरोबरच अनावश्यक बोजड भाषा टाळली पाहिजे. लिहीणे स्पष्ट असावे. याकरता बरेच पत्रलेखक वापरतात ती पद्धत म्हणजे आपल्याला जे म्हणावयाचे आहे ते लिहून परत काही वेळान आपले आपण वाचून आपणास कसे वाटते ते पहावे. बऱ्याच वेळा आपल्यालाच आपल्या चुका कळून येतात. स्वत:ची लेखनशैली असली तर उत्तम, नसली तरी बिघडत नाही. साधे, सोपे लिहावे. पत्राच्या साहित्यिकमूल्यापेक्षा संपादक त्यांतील आशयाला अधिक महत्व देतात. एक महत्वाची गोष्ट याबाबत लक्षात ठेवली पाहिजे की या स्तंभातले लिखाण बव्हंशी अनाहूत असते त्यादृष्टीने आपल्या पत्रास सदरात स्थान मिळण्याची महत्वाची धडपड आपल्यासच केली पाहिजे. व ती आपण पत्र किती नेटकेपणे व विषयाला धरून लिहीले आहे त्यावरूनच ठरते.

अन्य पथ्ये

आणखी काही पथ्ये पाळणे अपरिहार्य असते. शेवटी वृत्तपत्रांचे संपादक आपल्या पत्रातील आशयाला व त्याच्या प्रसिद्धिला जबाबदार असतात त्यादृष्टीने आपण करत असलेले विधान व आरोप पत्रांतून करणार त्याच्या सत्यतेची खात्री बाळगली पाहिजे. म्हणजेच प्रसिद्धीनंतर तुम्ही व मुख्य म्हणजे संपादक अडचणीत येणार नाहीत याची खबरदारी घेतली पाहिजे. (अन्यथा पुढच्यावेळी संपादक आपल्या पत्राकडे सावधगिरीनेच पाहतील.)

निनावी पत्र लिहीणे टाळले पाहिजे. आपणास जे काही म्हणावयाचे असेल ते छातीठोकपणें आपल्या नावावर म्हणता आले पाहिजे. यदाकदाचित् काही ठोस कारणामुळे आपले नाव प्रसिद्ध होणे योग्य ठरणार नसेल तर निदान संपादकांना तुमचे खरे नाव व पत्ता माहीत असणे अत्यंत आवश्यक आहे. कारण शेवटी मजकुराची जबाबदारी त्यांची असते.अशा वेळी एका वेगळ्या पत्रात संपादकांना निनावी पत्र छापण्याच्या सूचना व शक्यतो त्यामागची तुमची भूमिका मांडणे उत्तम याच्या अभावी बहुतेक वेळा निनावी पत्रे छापून येण्याची शक्यता अगदी कमी असते. व्यक्तिगत निंदा, आरोप टाळणेही आवश्यक कारण हे व्यासपीठ व्यक्तिगत प्रश्न सोडविण्यासाठी नाही. त्या पत्रातून एखादी व्यक्ति ओळखली जाऊ शकेल असे अचूक ओळख पटवणारे वर्णन टाळावे. उदा. एस्, टी. वा रेल्वे प्रवासातील अडचणीचे वर्णन करताना प्रवासाचा दिनांक व गाडी क्रमांक दिल्यास ड्रायव्हर वा कंडक्टर ओळखणे सोपे असते व बऱ्याच वेळा आपल्या लिखाणाचा उद्देश कारभारातील सर्वसाधारण सुधारणा हा असतो व अशा वर्णनामुळे एखाद्या व्यक्तीवर नाहक चौकशीची वा तदनुषंगिक अन्य कारवाईची संक्रांत कोसळते. अर्थात् कारण तसेच सबळ असेल तर असा उल्लेख होणे अपरिहार्यच आहे.

कोणाची बदनामी, वैयक्तिक महत्वाकांक्षा, फाजील अतिशायोक्ती यापासून दूर राहणे चांगले.

लिखाणातील विविधता

नुसती प्रतिक्रियात्मक पत्रे लिहीण्यापेक्षा खात्रीलायक पुरावा असलेली व समस्येवर उपा सुचविणारी पत्रें अधिक पसंत केली जातात. नुसतीच टीकात्मक पत्रे बऱ्याच वेळा नाकारली जातात. याकरतां लिखाणात विविधता हवी, स्वत:ची अशी शैली हवी व याकरता हवे विस्तृत वाचन व निरीक्षण शक्ती. समाजात डोळे, कान व मन उघडे ठेवून वावरण्याची संवय हवी. त्यांतून असंख्य पत्रांचे विषय मिळतात लिखाणात त्याचा उपयोग होतो.

आमच्याकडे अनुभव पाठविलेले प्रथितयश वृत्तपत्रलेखक विविध वृत्तपत्रे, आकाशवाणी, दूरचित्रवाणी वगैरे माध्यमांद्वारा आपला अभ्यास वाढवत असतात. त्याचा त्यांना निश्चित फायदा झालेला आहे. हे " अनुभवाचे बोल " या प्रकरणातून दिसेल.

आपल्या लेखनशैलीत सुधारणा करण्याचा एक सोपा मार्ग म्हणजे आपले मूळ पत्र व छापून आलेले पत्र यांची तुलना करावी. ते जसेच्या तसे छापले असेल तर तुम्ही संपादकांच्या कसोटीला उतरला हे पक्के समजावें. पण तसे झाले नाही.

तर शीर्षकापासून शेवटच्या शब्दांपर्यंत कुठला मजकूर गाळला, कुठला बदलला, त्याचा पत्राच्या परिणामकारकतेवर काय परिणाम झाला याचा अभ्यास केल्याने आपल्या लिखाणात निश्चित फरक पडतो.

संपादकांची खुषामत

बऱ्याचजणांची अशी समजूत असते की संपादकांची खुषामत करणारी पत्रें नक्की छापून येतील. पण ते चूक आहे. आपली खुषामत किती करून घ्यायची याची मर्यादा संपादक जाणतात. बहुतेक संपादकांना खुषामत आवडत नाही. त्यामुळेच वृत्तपत्रांच्या अग्रलेखाला पाठिंबा देणारी पत्रें छापून येतीलच असे नाही. तसेच बरेच जण आपल्या पत्रासमवेत त्या पत्राची वा संपादकांची स्तुती करणारी उपपत्रे जोडतात. उद्देश त्यामुळे पत्रे छापून येतील हा पण हेही खरे नाही.

अगदी वृत्तपत्राच्या अग्रलेखावर, धोरणावर वा एखाद्या भूमिकेवर कडाडून हल्ला चढवणारी पत्रेही संपादक "आवडीने" निवडतात असा अनुभव आहे पण आपले पत्र विरोधासाठी विरोध असे न ठेवता खरोखरच एखादे आगळे मत मांडणारे असले पाहिजे.

एकाच विषयावर, एकसारखा आशय असलेली पत्रेही छापून येत नाहीत. ज्याचे पत्र पहिले, त्याला अग्रक्रम मिळतो. यासाठी आपल्या पत्राचे काहीतरी नाविन्य पाहिजे, पत्रातून, निश्चित सूचना हवी. व हे सर्व इतरांच्या आधी वृत्तपत्रांकडे पोचायला हवे.

लिखाणाचा क्रम

यावर कांही प्रथितयश पत्रलेखक पुढील क्रम वापरतात. पत्र लिहीण्यापूर्वी तक्रार, अडचण वा अन्य समस्यांत तथ्य किती आहे हे पाहणे, मनातील विचार प्रथम कागदावर लिहून काढणे, पुन्हा तपासणे, शब्दरचना, शुद्धलेखन, परिणामकारकता, मुद्द्यांची व तदनुषंगिक परिच्छेदांची मांडणी ठरविणे व या सर्वांच्या आधारे वृत्तपत्रांकडे पाठवायची पक्की प्रत लिहून काढणे. या पद्धतीत त्रास व किचकटपणा असला तरी अशी काळजी घेऊन लिहीलेले पत्र छापून यायची शक्यता अधिक. काहीजण तर ८–१० दिवस पत्राचा विषय डोक्यात घोळवतात, शब्दरचना पक्की करतात व मगच पत्र लिहीतात. कारण त्यांची धारणा अशी असते की पत्र म्हणजे विद्वत्ताप्रचूर निबंध नसून त्यामागील तळमळ महत्त्वाची आहे. लेखनाचा विषय, आशय, मांडणी, शैली प्रभावी असल्यास पत्रास व त्यानिमित्ताने आपल्या विचारास उठाव प्राप्त होतो व असे पत्र वाचकांचे मन आकर्षून घेते. म्हणूनच

जागरूक वृत्तपत्रलेखक थोडीच पण अभ्यासपूर्ण पत्रे लिहीतो.

पाठपुरावा

शासनातील त्रुटींबद्दल लिहीताना तर प्रथम अभ्यास असणे आवश्यकच असते. कारण शासनाला आपला कारभार सुधारायची खरोखरच इच्छा असते व तुमची टीका, तक्रार वा सूचना रास्त असेल तर शासकीय यंत्रणा त्याची दखल घेण्यासाठी खडबडून उठते, स्पष्ट, निर्भीड शब्द योजनेद्वारा कार्यालयीन दिरंगाई, निष्क्रियता, अन्याय याबाबत रास्त गाऱ्हाण्यांचा वा सूचनाचा विचार होऊन सुधारणा झाल्याचा अनेकांचा अनुभव आहे. कारण या पत्रांतूनच जनमानसाचा कल शासनालाही कळतो. यासाठी नुसते पत्र लिहून लेखकाने न थांबता आपल्या तक्रारीच्या निवारणासाठी संबंधित खात्याकडे पाठपुरावा करत राहणे आवश्यक आहे. त्यांसाठी आपल्या प्रसिद्ध झालेल्या पत्राचे कात्राण वा झेरॉक्स प्रत संबंधित खात्याकडे पाठवून द्यावी.

वैचारीक अंग

आपले लिखाण तर्काधिष्ठित असावे याकडे पत्रलेखकाने लक्ष दिले पाहिजे. विचारांचे वा भावनांचे रागात रूपांतर होऊ नये. इतरांच्या विचारांना चालना देणारे नवे काही असले तर विषयावरील आपले सामर्थ्य आपोआपच प्रस्थापित होते. वस्तुस्थितीचे केवळ प्रामाणिक वर्णन करण्यापेक्षा घटनेतील सत्य, त्यांतील तपशील व त्यावरील आपला दृष्टीकोन यांची मांडणी महत्त्वाची असते. नव्हे, त्याचीच खरी गरज असते. यासाठी लिखाणाला सत्याचा आधार हवा व तो पत्ररुपाने मांडताना लेखकांचा अभ्यास दिसावा बदनामी करणारे, कुणाच्या धंद्याची नुकसानी करणारे वा एकाद्याची अब्रुनुकसानी करणारे लिखाण छापून येणे कठीण. तसेच न्यायप्रविष्ठ बाबीसंबंधीचे पत्रही बाजूला पडते. वैयक्तिक गोष्टींपेक्षा जनहिताच्या पत्रांना संपादकांची अधिक दाद मिळते.

बऱ्याच सपादकांची अशी तक्रार असते की त्यांचेकडे वैचारिक, वृत्तपत्रांच्या संपादकांच्या चुका दुरुस्त करणारी पत्रे कमी येतात. बहुतांशी पत्रे तक्रारी मांडणारी असतात. अन्यायाला वाचा फोडणारीही कमीच. वाद रंगविणारी, समाजातील गोंधळावर प्रकाश टाकणारी, पुढे येणाऱ्या धोक्यांची पूर्वासूचना देणारी, वाचकांची उदासीनता दूर करणारी, पत्रांत आपल्याच मनातले विचार मांडलेत अशी वाचकांची भावना निर्माण करणारी पत्रे वृत्तपत्रांना हवी असतात.

काळाचीं समयसूचकता

यासाठी काळाची समयसूचकता पाळणे महत्त्वाचे असते. एखाद्या विषयावर, समस्येवर आपल्यासारखेच आणखी दहाजण लिहिणारे असणार ज्याचे पत्र प्रथम

पोचेल. त्याला पहिली पसंती मिळणार हे निश्चित. कोणत्या विषयावर वा समस्येवर सद्या चर्चा, खल चालू आहे, लोकमत कुठला बाजूला आहे याचे भान ठेवून लिहिलेले पत्र झटकन् छापून येते.

तारेवरची कसरत

मात्र ही तारवेरची कसरत आहे. प्रत्येक वृत्तपत्राचे राजकीय, सामाजिक वा वैचारीक धोरण ठरलेले असते त्याचे भान पाळले पाहिजे. पत्राच्या पहिल्या पाच सात ओळीत पत्राचा वा त्यातील विषयाचा वकूब संपादकांना कळतो आणि तसा कळणेही आवश्यक असते. कारण या सदरासाठी असलेल्या जागेच्या मर्यादा, पत्रांची संख्या व स्वतच्या वेळेच्या मर्यादा याचाही विचार होत असतो. यासाठी कमीतकमी शब्दात विषय मांडण्याची हातोटी साधता येणेही आवश्यक आहे. त्याबरोबरच हेही लक्षात ठेवले पाहिजे की एकच वृत्तपत्र सतत एकाच व्यक्तीचे पत्र फारकाळ छापेलच असे नाही. त्याबरोबरच आपली पत्रे नेहमी छापली म्हणजे आपला हा हक्कच होऊन बसेल असे लेखकाने समजू नये. पत्राची साहित्यिक मूल्ये प्रत्येक वृत्तपत्रसंपादकांच्या निर्णय शक्ती प्रमाणेच मोजली जातात. योग्य प्रकारे विचार मांडले तर इतरांच्या विचारात बदल घडवून आणण्याचे सामर्थ्य त्यांत निश्चित असते.

विनोदबुद्धी

एका संपादकांची रास्त तक्रार लेखकांच्या विनोदबुद्धीबद्दल आहे. त्यांच्या मते सर्वच पत्रे गंभीर कशाला हवीत ? गंभीर विषयही मार्मिक विनोदाने परिणाम कारकरीत्या मांडता कां येऊं नये? अशा विनोदगर्भ पत्रांना निश्चित पसंतीची दाद मिळेल. (या करता व्यंगचित्रांचे उदाहरण समर्पक वाटते. बहुतेक नियतकालिकांत व्यंगचित्रांचा समावेश आजकाल अपरिहार्य बनला आहे. कारण मोठा निबंध लिहून जो परिणाम साध्य होणार नाही तो एका छोट्या व्यंगचित्राने होतो.) आपल्या पत्रलेखनांस विनोदाची झालर कशी देता येईल याचा विचार प्रत्येक लेखकाने (गंभीरपणे ?) अवश्य करावा याद्वारे समाजाचा एकाद्या प्रश्नाकडे बघण्याचा दृष्टीकोन निश्चित बदलता येऊ शकेल.

जेंथ न पोंचे रवि

"जेथ न पोचे रवी, तेथ पोचे कवी" ही उक्ती वृतपत्रलेखकाबाबतही समर्पक नाही का ? अशी दृष्टी ठेवून वावरणाऱ्या व लिहिणाऱ्या लेखकाकड नागरीक आपणहून मांडण्यासाठी तक्रारी घेऊन येऊ लागले की यशस्वीतेची पावती

मिळाली असे समजायला हरकत नाही. काहीजण वृत्तपत्रलेखकांना रिकामटेकडे समजतात, क्वचित निंदा, नाराजी सहन करावी लागते पण तळमळीच्या लेखकाची समाजाने दाद घेतल्याचीही उदाहरणे आहेत. यासाठी उत्तम म्हणजें लेखकाची वृत्ती स्थितप्रज्ञासारखी हवी. मानसन्मानाची अपेक्षा न करता वा निंदेस न घाबरता समाजाचे प्रबोधन करणारे "सत्यं, शिवं, सुंदरम्" लिखाण करत रहावे त्याचा स्वीकार होतच रहातो लिहीण्यापूर्वी मनांत वैचारिक खळबळ माजली पाहिजे, ती जेवढी तीव्र व त्याचबरोबर भाषा जितकी संयमी तेवढी लिखाणाची परिणामकारकता अधिक ही प्रक्रिया महत्त्वाची होय.

याचबरोबर चांगल्या कार्याची प्रशंसा करणारी पत्रे का नसावीत. त्यायोगे कार्यकर्त्यांना हुरुप येतो व असा लेखक जनतेच्याजवळ जातो.

एका विचारवंतांच्या मते एकदम पत्र लिहीण्याकडे धांव न घेता वृत्तपत्रलेखकाने प्रथम योग्य त्या स्तरावर समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करावा व त्यांत अपयश आले तर झालेल्या प्रयत्नांचा उल्लेख करून मग पत्र लिहावे. त्यायोगे पत्राची परिणामकारकता वाटते. तसेच 'तसाच' महत्वाचा विषय असल्यास संपादकांना भेटून त्याचेशी चर्चा करून, त्यांना हवा त्या पद्धतीने विषय मांडल्यास सर्वांत उत्तम.

आगे बढो !

वरील विवेचनावरून वृत्तपत्र लेखन हे एक तंत्र आहे व ते पाळल्यास आपल्या विचारांना व्यासपीठ निश्चितच मिळू शकेल हे दिसून येईल. अर्थात प्रत्येकाची लेखन शैली व मांडणी भिन्न रहाणार व तशी असणे आवश्यक आहेच. परंतु साध्यासाध्या बाबतीत काळजी घेतली तर कुठलेही पत्र निश्चितच दुर्लक्षिले जाणार नाही, संपादकांचा व्याप कमी होईल व पर्यायाने त्यांना पत्रांना अधिक न्याय देणे जमेल असा विश्वास आहे. या छोटया पुस्तकाच्या द्वारे आम्ही आमच्या लेखक लेखिकांचे लक्ष या गोष्टींकडे वळवण्यात यशस्वी झालो तर बरेच कांही साध्य झाले असे म्हणता येईल. या सर्व काळज्या घेऊन लिहीलेले पत्र छापून यायची शक्यता अधिक असली तरी शेवटी त्याबाबतचा अंतिम निर्णय संपादकांचा त्यामुळे त्यांच्या कसोटीस कसे उतरता यावरच सर्व अवलंबून. म्हणून आमची विनंती की लिहायला सुरुवात करा, पत्र छापून येण्यापर्यंत लिहीत रहा. हळूहळू त्यातूनच तुमच्यातला लेखक निर्माण होईल. आगे बढो !

अनुभवाचे बोल

"वाचकांचा पत्रव्यवहार" या सदरासाठी लिहीतांना मी प्रथम वृत्तपत्रातील बातमी, अग्रलेख लक्षपूर्वक वाचते. नंतर ज्या विषयावर पत्र लिहायचे त्यासंबंधी मनांत कांही वेळ विचार करून सुसंगतरीत्या लिहून काढते. शुद्धलेखनाची काळजी, आकर्षक भाषाशैली, कमीतकमी पण परिणामकारक शब्दात विचार व्यक्त करण्यची कोशिश, पत्राची सुरुवात व शेवट आकर्षक या बाबींवर अधिक प्रयत्न करते. माझ्या प्रसिद्ध झालेल्या पत्राबद्दल मिरज, पुणे, मुंबई, कोयनानगर वगैरे विविध ठिकाणाहून वाचकांची अभिनंदनपर पत्रे आली आहेत. त्यामुळे आडगांवात राहूनही कांही समाजसेवा होऊ शकते हे पटले.

–श्रीमती जयनंदा देशमुख, मु. आटपाडी.

माझी १० पैकी ९ पत्रे छापून येतात याचे समाधान वाटते मी वर्तमान-पत्रातील हव्या त्या मजकुराची कात्रणे काढून विषय व तारीखवार रचना करते. त्यामुळे पत्र तयार करणे सोपे जाते. विषयाचे अद्ययावत ज्ञान ठेवणे लेखकाचे दृष्टीने आवश्यक आहे. विविध पत्रलेखकांची पत्रे वाचून लेखनशैलीत फरक करता येतो. नागरिकत्वाचे कर्तव्य बजावणे, रचनात्मक विचार मांडणे, विविध प्रश्नांवर उपाय सुचविणे, स्वतःच्या कटु अनुभवावरून इतरांना सावध करणे व या सर्व प्रकारे नागरी जीवन समृद्ध व्हावे यासाठी सतत धडपड करणे ही माझ्या पत्र-लेखनाच्या खटपटीची मुख्य उद्दिष्टे आहेत.

–श्रीमती शारदाबाई ढवळे, पुणे.

"वाचकांचा पत्रव्यवहार" म्हणजे संपादकांचे डोळे आहेत. पत्रलेखक जागरुक व निर्भीड हवा. येथील सुभाष चौक व नवीपेठमधील अतिक्रमण काढावे. यावर स्थानिक पत्रांतून वाचा फोडल्याबद्दल दादा लोकांचा ससेमिरा चालू झाला. अशा बाबतीत समाज व शासनाने बघ्याची भूमिका न घेता संरक्षण देण्याकडे लक्ष दिले तर वृत्तपत्रलेखक अधिक चांगली कामगिरी बजावू शकेल.

–वि. बा. अयाचित, सोलापूर

काहीही लिहीण्यापूर्वी आपल्या मनामध्ये एक वैचारिक खळबळ निर्माण होते. ही उर्मी जितकी प्रखर तितके लिखाण धारदार बनते. वृत्तपत्रांतील एखादी बातमी वा अग्रलेख आपले मन वधून घेते. त्यातून विचार चालू होतो. लिहील्याशिवाय चैन पडत नाही. ही प्रक्रिया महत्वाची. यामुळेच सर्वसाधारपणे माझे लिखाण प्रसिद्ध होत आले आहे. अर्थात केवळ लिहावयाचे म्हणून लिहीले असे मी करत नसल्याने जे प्रसिद्ध झाले नाही त्याबद्दल विषाद नाही.

—प्रा. वि. अ. शेख, फलटण.

थोडक्या शब्दांत गुंफलेल्या माझ्या पत्रांचे बीज वर्तमानपत्रातील अग्रलेख वा बातम्यांत असते. माझे मूळ पत्र व प्रसिद्ध झालेले पत्र ताडून पहातो. त्यायोगे संपादकीय संस्कार कसकसे होतात हे कळण्यास मदत होते व चुकांची पुनरावृत्ती टाळता येते. सामाजिक प्रश्नांत कोणाचेही नांव न घेता लिहीलेल्या पत्रामुळे कोणाची नाराजी विकत न घेता योग्य तो परिणाम साधता येतो. समाजाकडून मिळालेली दाद ही पत्रलेखकाची चालना. "जेथ न पोचे रवी, तेथ पोचे कवी" हे पत्रलेखकाला चपखल लागू पडते.

—जुगलकिशोर राठी, अमरावती.

वृत्तपत्रांत लिहीतांना मी कोणत्याही पक्षाचा गणवेश चढवत नाही. चांगली भाषा वापरतो. कोयना भूकंपानंतर वाई तालुक्यांत एका शिक्षकाला १०० बांबू व पत्रे मंजूर झाले होते पण ते घेण्यासाठी त्या बिचाऱ्याला अनंत हेलपाटे घालूनही काम होत नव्हते. यावर मी "या शाळामास्तरला जिवंतपणी बांबू मिळतील का?" असे पत्र लिहीले. त्यानंतर ४८ तासात त्याचे काम झाले. काम करणारे कमिशनर देव म्हणून होते त्यामुळे मी पुन्हा पत्र लिहीले "आले देवाजीच्या मना तेथे कोणाचे चालेना." एकाद्या पत्रांवर वाचकांची पत्रे आली की समाधान वाटते. माझ्या मते वृत्तपत्रांतील पत्रे हेच खरे सामाजिक मत असते.

—डॉ. प्र. शं. मराठे, वाई.

नुकतेच ७० वे वर्ष लागले. मुंबईत स्थायिक झाल्यापासून पत्र लिहीतो. तक्रारी, गाऱ्हाणी सूचना याव्यतिरिक्त नवीन विषय हाताळण्याकडे माझा ओढा असतो. माझ्या लिखाणाचा "अप्रसिद्ध" वचक असतो हे समाधानाच. माझ्या मते नागरिकांनी एकादा विशिष्ठ विषय निवडून त्यावर अभ्यास करून पत्रे लिहून आपले वैशिष्ठ्य निर्माण करावे.

—गो. शं. हुजुरबाजार, मुंबई १६

माझ्या लेखनयशाची गुरुकिल्ली म्हणजे जनमानसाचे पडसाद घेत, अन्यायाविरुद्ध वादळ उठवत वैयक्तिक टीका टाळून, समाजोपयोगी गोष्टींचा चिकाटीने

केलेला पाठपुरावा हा एक आगळा छंद मी दीर्घकाळ जोपासला आहे.

—चिंतामण वामन उपाध्ये, उरण.

चांगला विषय पत्रातून मांडल्यास नागरिक अशा लेखकाला लक्षात ठेवतात व भेट झाल्यास पत्राची आठवण करून देतात. तुमच्या परिश्रमाची दाद घेतात. असा माझा अनुभव आहे. समाजात वावरताना डोळे, कान आणि मन उघडे ठेवून वावरले तर पत्रलेखनाचे असंख्य विषय सांपडतात मात्र आपली वृत्ती स्थितप्रज्ञाची पाहिजे.

—भा. शं. पटवर्धन, सोलापूर.

आमच्या गावातील विविध त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न करतो केवळ पत्र लिहून न थांबता संबंधित अधिकारी, खाती वा विभागाकडे अडचणी दूर करण्याचे दृष्टीने पाठपुरावा करतो. त्यामुळे एक जागरूक पत्रलेखक म्हणून नागरिक आपणहून त्यांच्या अडचणी घेऊन माझेकडे येतात याचे मला समाधान आहे.

—सुरेश दीनानाथ जोशी, मंगळवेढा.

एखाद्या महत्त्वाच्या विषयावर संपादकांनी टीप लिहून वाचकांची मते मागविल्यास समस्येचा वा त्या विषयाचा सर्वांगीण विचार होऊ शकेल असे माझ्या अनुभवावरून वाटते.

मा. ना. भिडे, पुणे ४.

पत्रलेखक व पत्रकारांनी एकमेकांचे मनोगत समजावून घेण्याचा प्रयत्न केल्यास या सदराल अधिक चांगले स्वरूप येईल. पत्रकारांनी काही विषयावर आवर्जून पत्रे यांसाठी मागवावीत असे वाटते. माझ्या लिखाणाचे पथ्य म्हणजे मी खात्रीलायक पुराव्याशिवाय टीका करत नाही.

—(मेजर) ग. स. ठोसर, पुणे ३०.

अहमदाबादच्या "टाइम्स ऑफ इंडिया" मध्ये ९–१०–७५ रोजी माझे सुइसाइड लेक हे तेथील कांकरिया तलावातील वाढत्या आत्महत्येविषयीचे पत्र प्रसिद्ध झाले. तत्पूर्वी एक वर्ष मी त्या वृत्तपत्रात येणाऱ्या आत्महत्येसंबंधींच्या अशा बातम्यांची वर्गवारी केली व मगच पुरेशा अभ्यासानंतर पत्र लिहिले तसेच सिव्हिल हॉस्पिटलमधील रुग्णांच्या व्यसनांचा ४–५ वर्षे अभ्यास करूनच पत्र लिहिले

—वैद्य वा. वि. मेहेंदळे, पुणे ३०,

मी चांगल्या कामाबद्दल संबंधित कार्यकर्त्यांना शाबासकी देणारी पत्रे लिहितो. महापालिका व अन्य संबंधित अधिकाऱ्यांनी विविध सूचनांचा प्रयत्नपूर्वक विचार केला पण मटकेवाल्यांविरुद्ध टीका करताच घरापुढे संडासातील घाण येऊन पडल्याचाही अनुभव मिळाला.

—राम हरोलीकर, कोल्हापूर.

पत्र पाठविताना ते कोणत्या दैनिकाकडे पाठवायचे याचे तंत्र मी संभाळतो. पेव फुटल्यासारखे सारखी पत्रे लिहीत सुटण्याचा हव्यास संयमाने टाळावा. थोडी पण अभ्यासपूर्ण पत्रे अधिक परिणामकारक ठरतात असा माझा अनुभव. अभ्यासूवृत्ती, सामाजिक जाणीव व मुद्देसूद, आटोपशीर, साधेसुधे पत्र ही यशस्वी पत्रलेखनाची गुरुकिल्ली आहे.

—श्री. ग. सबनीस, सांगली.

आपले पत्र जनतेला आपले वाटले पाहिजे. तिच्या तोंडून " खरं आहे याचं, आपल्या मनातलंच यानं बोलून दाखवलंय ', असे उद्‌गार येणे ही यशाची पावती.

—नंदकुमार सातुर्डेकर, पिंपरी वाघेरे.

पत्रलेखकाच्या ठायी चौकसबुद्धी व लेखनाची आवड पाहिजे विविध घडामोडींचे मनन हाच दैनंदिन अभ्यास. त्यासाठी परीक्षेची आवश्यकता नाही.

—बाबुराव वाणी, बोदवड (जळगाव)

आपले पत्र प्रसिद्ध होण्यापूर्वी त्याच विषयांवर इतरांचे पत्र प्रसिद्ध झालेले पहायला मिळणे याचा अर्थ आपले विचार व त्यांवरील पत्ररूपी कृती यांचा आपला वेग कमी पडतो. यासाठी पत्रलेखकाने वेळेचे भान पाळले पाहिजे. हा माझा अनुभव.

—विठ्ठलराव पवार, पुणे २.

सदैव वृत्तपत्रे काळजीपूर्वक वाचावी लागतात एखादी कोपऱ्यातली छोटी बातमीदेखील पत्राचा उत्कृष्ठ विषय होऊ शकते. काहीवेळा वृत्तपत्रलेखकाचा लिखाणाचा हेतू न पाहता त्याला पत्ररूपाने झोडपले जाते हा माझा अनुभव. पण मी त्यामुळे नाराज होत नाही. जेथेजेथे अनास्था, अव्यवस्था, अन्याय दिसेल तेथेतेथे पत्ररूपी परमेश्वर उभा केला पाहिजे. त्यायोगेच या सदराला अधिक महत्त्व प्राप्त होईल.

—तात्या फडके पुणे ३०.

स्वत: धर्मगुरू असल्याने जनतासंपर्काची संधी अधिक मिळते. लोक आपणहून तक्रारी, अडचणी सांगतात. पत्रलेखकाच्या मनात जनतेबद्दल अपार अपुलकी व प्रेम असले म्हणजे त्यांची दु:खे आपली वाटू लागतात व एक चांगले पत्र तयार होते. वृत्तपत्रांतील चुकीच्या बातमीबद्दल सखोल अभ्यास करून संपादकांना कळविले तर त्यांना बरे वाटते हा स्वानुभव. मात्र तक्रारीसोबत उपायही सुचवावेत म्हणजे लिखाण विधायक होईल.

—फादर फ्रान्सिस दिब्रिटो, गोरेगाव, मुंबई ६३.

मी लांबलचक पत्रे लिहीत नाही. थोडक्या शब्दांत विषयाला धरून कोणाची मने दुखावणार नाहीत अशी भाषा वापरून गोड शब्दांत पत्र लिहितो. त्यामुळे कित्येक पत्रांतील सूचनांवर झटपट कार्यवाही झाली व विविध ठिकाणी अनेकवेळा गौरव झाला.

–सूर्यकांत खैरे, मुंबई ५१

वृत्तपत्रांतील लेखन चटकदार कसे करावे यासंबंधी एका पाश्चात्य लेखकाचा सल्ला माझ्या कायमचा लक्षात राहील. असे पत्र हे एखाद्या सुंदर तरुणीच्या झग्यासारखे असावे. विषय झाकण्याइतपत लांब पण लक्ष वेधून घेण्याइतपत आखूड. अनेक लोक विनाकारण लांबड लावतात. पत्रे ही काही विद्वत्ताप्रचुर निबंध नाही. त्यामागची तळमळ महत्त्वाची. क्वचित प्रवासात नाव सांगितल्यावर एखादा अनोळखी माणूसही " म्हणजे वृत्तपत्रांतून नेहमी पत्रे येतात ते तुम्हीच तर " असे म्हणतो त्यावेळी होणारा आनंद खरा.

–डॉ. शरद अभ्यंकर, वाई'

वस्तुनिष्ठ तक्रारीबाबतची माझी पत्रे यशस्वी ठरली आहेत. त्याला विषयाचे अनुषंगाने पत्रलेखन करताना ते प्रभावी व परिणामकारक होण्यासाठी अवांतर माहिती मिळते. सत्यता पडताळून पाहून मगच वृत्तपत्रांकडे धाव घेतो.

–रघुनाथ पां. शिरकर, मु. नायगाव (ठाणे)

मी नेहमी स्वत:ला आलेले अनुभव स्पष्टपणे सत्यपरिस्थती व नागरिकांनी सांगितलेली तक्रार याचे आधारे पत्राद्वारे मांडतो. एखादे पत्र प्रसिद्ध झाले नाही तर संबंधित संपादकांना भेटून त्यांना कोठल्या शब्दांत पाहिजे होते हे समजावून येण्याचा प्रयत्न करतो.

–सुहास मुंगळे (मास्तर) पुणे ११.

मी गेली २० वर्षे वाचकांच्या पत्रव्यवहारात लिहीत आहे. विषयाची पूर्ण माहिती गोळा करून पत्र लिहितो. पत्रलेखक जागरूक असल्यास तक्रारी दूर निश्चित होतात असा माझा अनुभव आहे पण त्यासाठी लेखकाची वृत्ती समाजाभिमुख पाहिजे.

–ॲड– पु. वा. परांजपे, तळेगाव दाभाडे.

गेली ३५–४० वर्षे मी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये वावरलो. त्यातून आलेले अनुभव तसेच माझे गाव लोणावळा याचे आगळे वैशिष्ठ्य टिकविण्यासाठी मी सातत्याने पण पुरेसा अभ्यास करून लिहीत आलो. पाठपुरावा करत राहिल्याने बऱ्याच गोष्टींत यशस्वीरीत्या प्रश्नांची सोडवणूक होऊ शकली.

–मो. म. आगरवाल, लोणावळा.

विविध क्षेत्रांत विखुरलेल्या समाजघटकांना एकत्रित आणण्यासाठी वाचकांच्या पत्रव्यवहाराशिवाय दुसरा मार्ग नाही. हे सदर हा वृत्तपत्राचा आत्मा व जागरूक लोकशाहीचे प्रतीक आहे.

—प्रा. अनिल भांगे, कारंजा (वर्धा)

प्रत्यक्ष पत्राबरोबरच स्वतंत्र कागदावर संपादकास पत्र लिहून त्यात पत्राची पार्श्वभूमी देतो. संपूर्ण वर्षात काही ठरावीक दिवसांसाठी जसे १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, शिक्षक दिन, बालक दिन, वगैरे आवर्जून लिहितो. पत्राच्या संपादकीय संस्कारासाठी अशा पत्रास पुरेसा वेळ देतो त्यामुळे ते ठरावीक दिवशी छापून येते हा अनुभव. अस्वीकृत पत्रांची संख्या त्यामुळे माझ्याबाबतीत कमी असते. अर्थात इतकी मेहनत घेऊनही एखादे पत्र छापून आले नाही तर संपादकीय निर्णयाबद्दल विषाद न मानता आत्मपरिक्षण करून चूक सुधारतो.

—नी. वा. देशपांडे, पुणे.

विषयाचा अभ्यास चांगला व भाषाशैली साधीसोपी हे माझ्या पत्राच्या काळजीपूर्वक लिखाणाचे अंग. अश्लील नाट्यप्रयोगासंबंधीचे माझे पत्र प्रसिद्ध होताच श्रीरामपूर येथे प्रेक्षकांनी एका नाटकाचा प्रयोग बंद पाडला ही गोष्ट भूषणावह वाटते.

—विष्णुपंत डावरे, बेलापूर.

सोलापूर विभाग सेंट्रल रेल्वेत घालावा म्हणून झालेल्या आंदोलनाच्या वेळी बऱ्याच वृत्तपत्रांतून लिहून सत्यपरिस्थिती मांडली. तसेच सोलापूर येथील मेडिकल कॉलेज सरकारने ताब्यात घ्यावे म्हणून झालेल्या आंदोलनाच्या वेळीही पत्रे लिहिली तुरुंगवास भोगला.

—डॉ. रवि. जवळगेकर, सोलापूर.

सुवाच्य हस्ताक्षर, पत्राची मांडणी, दोन्ही बाजूस समास सोडून लिहिणे ही विषयाला धरून लिहिणे व पुरेसे विचारमंथन करणे. याबरोबरच पत्राची महत्त्वाची अंगे आहेत. यासाठी कष्ट पडतात हे इच्छुकांनी विसरू नये. पत्रलेखक हा सर्वसामान्यांचे प्रश्न वेशीवर टांगणारा लोकप्रतिनिधीचा आविष्कार मानला पाहिजे.

— बी. एल. तारी, पुणे २९.

"सकाळ फेम" पुरंदरे असे नाव मला मिळाले. वाचकांनी आवर्जून पत्रे लिहून कौतुक केले. मुख्यतः शिक्षणसुधारणेवर भरपूर लिहिले प्रसिद्धीची हाव असे पत्रलेखकाबद्दल कुत्सितपणे लिहिले जाचे ते मला चूक वाटते. कारण एखादा

विचार वा प्रसंग सारांशरूपाने मांडणे हे काम पुरेशा प्रयत्नाशिवाय सहजासहजी साध्य होत नाही.

–डॉ. पां. गो. पुरंदरे, पुणे.

पत्रलेखनातून सामाजिक कार्याची आवड निर्माण झाली. यासाठी अडीअडचणी समजावून घेण्याची धडपड करावी लागली. त्यातूनच पत्रलेखनाबरोबरच २६५ वधूवरांचे विवाहही जमवू शकलो.

–पां. य. कोडीतकर, पुणे २.

मी समाजहिताच्या दृष्टीने तसेच दुष्ट रुढी. परंपरा दूर करण्याच्या दृष्टीने लिहितो. वडगावशेरी येथे पोस्टऑफिस सुरू करण्यासंबंधी वरचेवर पत्रे लिहिली. १८ ऑगस्ट ८३ रोजी पोस्ट शाखा सुरू झाली. याबाबत गावकऱ्यांचे सहाय्य चांगले मिळाले. अशा सुधारणांमुळे त्यात्या भागाची सोय झाल्यास समाजाने लेखकांचे कौतुक केल्यास त्यांना प्रोत्साहन मिळेल व अधिकाधिक समस्या– अडी-अडचणी दूर करण्याचा हुरुप वाढेल असे मला वाटते.

–ना. रा. देशपांडे, वडगाव शेरी.

वृत्तपत्रलेखकाने केवळ संपादकांची री न ओढता हंसक्षीरन्यायीने लिखाण करावे. लिहायचे म्हणून पत्र लिहू नये. समस्याप्रधान विषय हाताळावा. केवळ पत्र लिहून न थांबता अन्य मार्गाने समस्या सोडविण्याचा प्रयत्न करावा. ग्रामीण समस्यांवर लिहिणारे थोडे वृत्तपत्रलेखक आहेत मात्र अशा लेखनात लेखकांना बराच त्रास सहन करण्याची सवय ठेवावी लागते. मात्र समस्यापूर्तीनंतर मिळणारे समाधान आगळच असते.

–वि. ना. चौधरी, नीरा.

पत्र लिहिताना अडचणी, तक्रारीबरोबरच विविध क्षेत्रातील कार्यकर्त्यांचे कौतुक अभिनंदत करणारी पत्रेही लिहितो. पत्र थोडक्यात पण परिणामकारक होण्याकडे लक्ष देतो. त्याकरता इतरांच्या पत्रांचाही अभ्यास करतो. एक आटो-रिक्षावाला अमरावतीजवळील "तपोवन" या कुष्ठरोगनिवारणसंस्थेकडे घेऊन जाणाऱ्या प्रवाशांकडून मिळणाऱ्या १० रु. पैकी ५ रु. त्या संस्थेला देणगी देतो हे कळल्यावर त्यासंबंधी मी पत्र लिहिले. त्यावर जिल्हाप्रसिद्धी अधिकाऱ्यांनी लोक-राज्यमध्ये त्या रिक्षावाल्याची मुलाखत छापली. आनंद वाटला.

–गोविंद कासट, अमरावती.

पत्रलेखनाचे एक क्षेत्र अद्यापही काहीसे उपेक्षित आहे असे मला वाटते. दैनंदिन भौतिक जीवनातील सोयीगैरसोयींवर किंवा घटनांवर उदंड पत्रे पाठविली

जातात पण पाश्चात्य जगाशी आलेल्या आपल्या संपर्कामुळे आपल्या जीवनपद्धतीवर झालेला परिणाम, जुन्या संस्कारापासून तुटलेल्या पिढीतील संघर्ष, नव्या-जुन्याचा तुलनात्मक विचार, ग्राह्याग्राह्यतेचे निकष, मानसिक तणाव, अशांतता व तत्जन्य विकृती इत्यादी आपल्या जीवनाशी निगडीत कितीतरी विषयांवर चिंतन करून लिहिता येईल. सुखसमृद्ध जीवनाच्या उभारणीचा तो विधायक विचार ठरेल. त्यातूनच समन्वयाचे मार्गही सुचू शकतील. त्यासाठी चर्चा व अध्ययनाचा आधार घ्यावा. मला स्वतःला हा विषय जिव्हाळ्याचा वाटतो. तांत्रिक बाजूचे दृष्टीने एक औचित्यपूर्ण विचार असा की एका वृत्तपत्रातील लिखाणावर निर्माण होणारी प्रतिक्रिया शक्यतो अन्य वृत्तपत्राकडे न पाठवता त्याच वृत्तपत्राकडे पाठवावी. सार्वजनिक तक्रारी संदर्भात एकदम वृत्तपत्राकडे धावण्याची प्रवृत्ती वाढू नये. तक्रारनिवारण करण्यासाठी प्रथम काय प्रयत्न केले व ते कसे अयशस्वी झाले ते पत्रात मांडता आल्यास पत्र अधिक ग्राह्य व उपयुक्त ठरते. पत्रव्यवहारातून दोषैक दृष्टी, निष्क्रिय सरकारावलंबिता वाटण्याऐवजी त्यातून विश्वास, गुणग्राहकता, सक्रियता व विधायकता वाटावी, अनुभवांची देवाण-घेवाण व्हावी या भूमिकेतून लिखाण व्हावे.

—चं. प. भिशीकर, पुणे.

मी दिल्लीस असताना आवर्जून मराठी लोकांना उपयुक्त अशी माहिती पुण्याकडील वृत्तपत्रांना पाठवत असे. अनाहूत असे हे काम पण त्याचा बराच उपयोग होत असे. यातूनच लेखनाची आवड वाढली व माझ्या माहितीचा नागरिकांना उपयोग झाला याची पावतीही अनेकांनी आवर्जून वेळोवेळी दिली.

—पु. शं. पतके, पुणे.

जीवनाचे प्रत्येक क्षेत्र म्हणजे एक स्वतंत्र विशाल दालन आहे. प्रत्येक छंद हे त्यांतील एक शास्त्र आहे. याचा प्रत्यय पदोपदी येतो. म्हणूनच वरवर "रिकामपणाचा उद्योग" किंवा "लष्कराच्या भाकरी" असे संपादकांना पत्रे लिहीणे हे वाटते पण खोल विचार करता हे एक शास्त्र आहे हे ध्यानात येते. पत्रलेखनात सुसूत्रता यावी यासाठी प्रयत्न केल्यास त्याचे सौष्ठव वाढतच जाते अशा पत्रलेखनाचे वेड लावून घेणे काही वाईट नाही. कारण असे पत्र हे मनात चालू असलेल्या खळबळीचे प्रतिबिंब, समाजजीवनाचा आरसाच म्हणावयास हरकत नाही. अन् म्हणूनच त्यांचे महत्व आहे. पत्रलेखकांनी एक काळजी घेतली पाहिजे असे वाटते. पत्रातील मजकूर, मांडलेले विचार परखड असावेत हे जरी खरे असले तरी पत्र हा दोन माणसांना जोडणारा दुवा आहे हेही विसरू नये.

—सुधाकर देशपांडे पुणे


मी वाचकांच्या पत्रव्यवहारात लिहीताना माझी दृष्टी शिक्षकाप्रमाणे विद्यार्थ्यांच्या चुका शोधण्याकडे असते. त्यामागील उद्देश त्या चुका दुरुस्त व्हाव्यात हा असतो. या दृष्टीने समाजात वावरताना जनतेच्या अडीअडचणी जाणून घेण्याचा प्रयत्न करतो. वृत्तपत्रे, साप्ताहिके वगैरे काळजीपूर्वक वाचतो. व एखाद्याने एखाद्या विषयावर मांडलेले विचार यापेक्षा अधिक आकर्षक कसे होतील याचा अभ्यास करतो. या सदरातून प्रसिद्ध होण्याच्या विचारातून समाजप्रबोधन व लोकजागृती व्हावी हा उद्देश आहे. पुष्कळवेळा शासकीय खात्यांना पत्रांमुळे जाग येते व कामे मार्गी लागतात. निःस्वार्थपणे काम करणाऱ्या या लेखकांचा शासन व समाजाने वेळोवेळी गौरव केला पाहिजे असे मात्र वाटते. त्यायोगे अधिकाधिक जागरूक नागरिक अशा लेखनाकडे वळतील. व अंती समाजाचा फायदा होईल.

—ह. बा. शिंदे, पुणे

अंधाऱ्या रात्री कुणाच्या हाती दीपक व्हावे !
उजळूनी त्याची वाट सुखाने हांसत विझुनी जावे !

असे कार्य सतत वृत्तपत्रलेखकाला करावे लागते व हाडाचा वृत्तपत्र लेखक त्यातच समाधान मानतो.

—मु. बा. कुलकर्णी, पुणे



वाचकांची पत्रे–काही नमुने

वृक्षतोड थांबवा

जुलै महिना आला की वृक्षारोपण सप्ताह साजरे झाल्याच्या वातम्या येऊ लागतात ही आनंदाची बाब आहे. कारण गेल्या पन्नास वर्षांत जंगले तोडण्याचा प्रकार इतक्या मोठ्या प्रमाणावर झाला आहे की १९३० मध्ये आपल्या देशाच्या एकंदर क्षेत्रफळाच्या ३६ टक्के जंगले होती. ती आता फक्त दहाबारा टक्केच राहिली आहेत. व असेच वृक्ष तोडण्याचे प्रमाण चालू राहिले तर या शतकाच्या शेवटी हे प्रमाण फक्त ५–६ टक्के राहील व त्यामुळे देशाच्या आर्थिक परिस्थितीवर विपरित परिणाम होऊन आज आपल्या देशात दरवर्षाला लाकडाचे उत्पादन एकशेतीन दशलक्ष टन आहे तर वापर एकशे तेहतीस दशलक्ष टन होत आहे. त्यामुळे ही तफावत कमी करण्यास अधिक वृक्षारोपण करणे महत्वाचे आहेच, पण वृक्षाची तोड थांबविणे हे अधिक निकडीचे आहे. या समस्येवर उपाय म्हणून खालील गोष्टी केल्या पाहिजेत. लाकडी फर्निचरवर कायद्याने बंदी घालावी. घर बांधणीत लाकडाचा वापर शक्य तितका कमी करावा. रेल्वेनी लाकडाचे 'स्लिपर' रेल्वेमार्गावर वापरण्याचे बंद करावे. त्याऐवजी "प्रीस्ट्रेसर्ड काँक्रीटचे" स्लिपर वापरावेत. लाकडी कोळशाचे उत्पादन सक्तीने व कायद्याने बंद करावे, ग्रामीण भागात केरोसिन स्वस्त दराने वाटप करावे व केरोसिन शेगड्यांचा प्रचार करावा. अग्निसंस्कारासाठी विद्युतदाहिनीचा उपयोग करावा. समुद्र किनाऱ्यावर राहणाऱ्यांनी अग्निसंस्काराच्या ऐवजी "जलसंस्कार" करावेत. एकीकडे अधिकाधिक वृक्षारोपण तर दुसरीकडे "झाडे न तोडणे" अंमलात आणल्याशिवाय या गंभीर समस्येवर उपायच नाही असे वाटते.

(दै. सकाळ, पुणे. ६।७।१९८३)

मा. ना. भिडे, पुणे

हृदयाच्या शस्त्रक्रियेचा न झेपणारा खर्च

हृदयाची शस्त्रक्रिया हो अतिशय नाजूक आणि अत्यंत खर्चाची बाब आहे. हृदयाची झडप परदेशातून आणावी लागते असे समजते व त्यास लागणारी किंमत व शस्त्रक्रियेचा खर्च संबंधित रुग्णास झेपत नाही. त्यामुळे आर्थिक साहाय्याची जरूर असते. नागरिकांकडून आर्थिक साहाय्य मिळावे म्हणून वर्तमानपत्रातून अनेकदा आवाहन केले जाते. ज्या रुग्णास अर्थक साहाय्य मिळत नाही त्यास मरण पत्करणे भाग ठरते. या अडचणीचा विचार शासनाने केला तर संबंधितास शासनातर्फे जीवदान मिळेल. हृदयाची झडप बसविण्याकरिता लागणारी सामग्री पुणे व मुम्बई येथील शासकीय रुग्णालयात पुरवावी व खर्च शासनाने सोसावा.

(दै. केसरी. पुणे. १।४।१९८३) विठ्ठलराव शे. पवार पुणे,

विदेशी मुद्रेचा प्रश्न

सरकारला निर्यात व्यापाराकडे जास्त लक्ष ठेवावे लागते. विदेशी मुद्रा नेहमीच भारतात येत राहावी. त्यात खंड पडू नये म्हणून वेळोवेळी सरकारतर्फे काही सवलती जाहीर करण्यात येतात. कारण विदेशी मुद्रेचा देशाच्या आर्थिक परिस्थितीशी फार निकटचा संबंध असतो. परदेशातून जो माल घ्यावा लागतो त्याचा मोबदला विदेशी मुद्रेतच द्यावा लागतो. सरकारचे इतके प्रयत्न असूनसुद्धा विदेशी मुद्रेची वाढ फारच मंदावत आहे. तेव्हा सखोल विचार केला तर निदर्शनास येईल की, जे लोक निर्यात करतात, ते आयातसुद्धा करतात व यामुळे विदेशी मुद्रेच्या बचतीत फरक पडत नाही. जर सरकारने केवळ निर्यात करणाऱ्यांना (अर्थात ज्या वस्तूंना परवानगी आहे त्या) आकर्षक सवलती दिल्या, तर विदेशी मुद्रेच्या बाबतीत बराच फरक पडेल. याशिवाय भारतीय कच्च्या मालापासून भारतातच बनविलेल्या मालाचा जास्तीतजास्त माल पाठविण्यात चढाओढ निर्माण होईल. आयात कमी झाल्यामुळे ज्या वस्तू फक्त विदेशी आकर्षण म्हणून आयात केल्या जातात. त्यांचा ओघही कमी होऊ शकेल. सवलती मात्र फार आकर्षक असावयास पाहिजेत. आयात न करता, निर्यात करतात त्यांना आयकराचे विशेष भक्कम सूट विक्रीकर माफ, संबंधीत उत्पादन वाढविण्यात इतरांपेक्षा कमीतकमी व्याजावर भांडवल पुरविणे, नवे उद्योगधंदे सुरू करण्यास प्रोत्साहन देणे, अशा सारख्या सवलती दिल्या तर निर्यात वाढेल.

(दै. नागपूर पत्रिका, नागपूर ६।५।१९८३) – जुगलकिशोर राठी, अमरावती

दुःखी शिक्षकांचे संमेलन भरवा

नुकताच शिक्षकदिन साजरा झाला. शिक्षक वर्गाची स्तुती स्तोत्रे गाऊन

मोठा गौरव केला गेला. ज्या शिक्षकांना 'राज्य पुरस्कार' दिला गेला त्याचे जीवन धन्य झाले.' शिक्षकाच्या आयुष्यात असा योग येणे म्हणजे पूर्वपुण्य म्हटले पाहिजे. या त्यांच्या सत्कारातून त्यांच्या व त्यांच्या मुलाबाळांसाठी आर्थिक काय पदरात पडते ते त्यांनाच माहीत ! ज्यांना सत्कार मिळाले ते खरोखरचेच आदर्श शिक्षक आहेत किंवा नाही याबद्दल संशय (?) प्रगट न करिता जरी विचार केला तरी त्यांचे जीवन या पेशात मिळणाऱ्या मुशाहिऱ्याने सुखी होते काय ? मंत्र्याच्या हस्ते या आदर्श शिक्षकांचा सत्कार झाला. त्या मंत्र्याचे जीवन व शिक्षकांचे जीवन तुलना करून पाहिल्यास काय दृश्य दिसेल ? सरकारने एकदा आदर्श शिक्षकांचे ऐवजी दुःखी शिक्षकांचे संमेलन भरवावे व त्यांच्या दुःखाच्या करुण कहाण्या ऐकाव्यात.

(दै. सकाळ, पुणे १३।९।१९८३) — तात्या फडके, पुणे.

न्याय केव्हा मिळणार ?

माध्यमिक शिक्षक संघटनेचे एक झुंजार व निःस्वार्थी कार्यकर्ते कँपमधील अल्पसांख्यकिय विद्यालयातून आठ वर्षांपूर्वी सेवानिवृत्त झाले. त्यांचे निवृत्तीवेतन प्रकरण शिक्षण उपसंचालक किंवा शिक्षणखात्याकडे वा अन्यत्र त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर आठ वर्षांनंतरही आजतागायत पडून आहेत असे समजते. या प्रकरणी शिक्षण संचालक वा शासकीय कर्मचारी नेत्यांनी तसेच शिक्षण आमदारांनी जातीने लक्ष घालून हा लज्जास्पद कलंक धुऊन टाकण्याचा प्रयत्न करावा.

तसेच नजिकच्या काळात निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांवर अन्याय होऊ नये म्हणून (सेवापुस्तके) ही सावधगिरीची उपाययोजना तात्काळ अमलात आणली पाहिजे. शिक्षक, अध्यापक, प्राध्यापक किंवा शिक्षकेतर कर्मचारी ज्यादिवशी निवृत्त होणार असेल त्या दिवशी त्यांना या सर्व सुविधा प्राप्त होतील अशी व्यवस्था होणे आवश्यक आहे.

(दै. प्रभात, पुणे १८।४।८३) — ह. बा. शिंदे, पुणे ११

शिक्षणात परिवर्तन हवे

शालेय सुधारणा सुचवण्यासाठी महाराष्ट्र शासनाने नेमलेल्या राज्य सल्लागार समितीच्या विशेष सभेत राज्यपाल मा. आय. एच. लतीफ यांनी जे भाषण केले आहे ते खरोखर मननीय आहे.

शिक्षणातून कार्यानुभवाकडे तसेच अभ्यासाचा बोजा हे राज्यपालांनी दाखवलेले मुद्दे विशेष लक्षात घेण्यासारखे आहे.

याशिवाय आणखीही बऱ्याच त्रुटी दोष आमच्या शिक्षणात आहेत. पदवीधरांची संख्या वाढते तशी कार्यालयीन कामे करणाऱ्यांची भाऊगर्दी झालेली दिसते,

सध्याच्या शिक्षणात कोणतेही व्ययसाय करण्यास योग्य ठरेल असे शिक्षण दिले जात नाही. अर्थात ज्या शाळांमध्ये टाइपिंग, प्रिंटिंग, बुकबाईंडिंग इ. शिकविले जाते त्यांचा अपवाद आहेच. यामुळे विद्यार्थी पदवीधर होतो नोकरीसाठी वणवण भटकतो कंपनोत प्रश्न विवारला जातो. 'आपल्याला कोणते काम येते? मग सगळीच बोंब असते.' आता पदवीनंतर पुन्हा एखाद्या ट्रेडचे शिक्षण घ्यावयाचे म्हटल्यास पैसा खर्च होतो. बराच कालावधीही खर्च होतो. त्यात नोकरीचे वय संपले की आणखी पंचाईत होते.

२) शिक्षणात श्रीमंत वर्गांचा वरचष्मा दिसतो खाजगी क्लासेसच्या जोरावर हा वर्ग अभ्यासात पुढे जातो. यामुळे ज्या शिक्षणसंस्थात नीट शिकविले जात नाही. त्या शाळांमधील गरीब विद्यार्थी मागे पडतात.

३) ५० टक्क्याहून जास्त विद्यार्थी मध्येच शाळा सोडतात त्याची कारणे काय हे आजपर्यंत समजून घेतले काय?

४) सध्याची परिक्षापद्धत विचित्र आहे. परिक्षा सारख्या येतच राहतात चाचणी, चौमाही, आठमाई...! अभ्यासाच्या पसाऱ्यामुळे आणि अनावश्यक सुट्ट्यांमुळे प्रत्यक्ष शिक्षणाचा काळ थोडासा असल्याने विद्यार्थ्यांना अभ्यासाव्यतिरिक्तचे साहित्य वाचावयास मिळत नाही. शिवाय बरेच विद्यार्थी वर्षभर अभ्यास करून ऐन परिक्षेच्यावेळी आजारी पडतात त्यांची काहीच सोय होत नाही.

हे सर्वकाही बदलायला हवे.

(दै. राष्ट्रतेज, पुणे १७।८।८३) – नन्दकुमार वसंत सांतुर्डेकर पिंपरी, पुणे १७

टी. सी. सी. ची अरेरावी केव्हा थांबणार?

सरकारी नोकरातील अरेरावीचा प्रत्यय प्रत्येकास केव्हा ना केव्हा तरी येतोच. रेल्वेच्या टी. सी. चा माझ्यावर गुदमरलेला प्रसंग हयाचे एक उदाहरण आहे. मी पुणे स्टेशनवर तिकीट काढताना बुकिंग क्लार्कला सह्याद्री एक्सप्रेस केव्हा येणार हे विचारता त्याने फलाट क्र ४ सांगितले पुन्हा खात्री करून घेण्यासाठी स्टेशनचे गेटवरील टी. सी. ला विचारले, परंतु ३–४ वेळा अदबीने विचारूनही काही उत्तर मिळाले नाही आणि टी. सी. महाशय 'दो नंबरपर आयेगी म्हणून एकदम खेकसले. मी थांबून त्यांना परत विचारले की बुकींग क्लार्क ४ नं. म्हणत होता. तेव्हा त्यांनी एकदम 'तो मुझे क्यो पूछता है रे, धक यहाँसे–' म्हणून एकेरीवर येऊन भांडायलाच सुरवात केली. जवळपासचे प्रवासी एकदम काय झाले, काय झाले म्हणून गोळा झाले. परंतु त्यांच्याशी परत वाच्यता करण्याची सोयच नव्हती, कारण त्या जनतेच्या सेवकाचा आततायीपणा चालूच

होता. रेल्वेने 'सौजन्य सप्ताह' साजरा करण्याऐवजी कायमचे थोडेतरी शिष्टाचार शिकवावेत.

दै. विशाल सह्याद्री, पुणे ३१।१।८२ —वि. ना. चौधरी, निरा

हवा-केंद्रांची आवश्यकता

एकेकाळी पेट्रोलपंपावर पेट्रोल भरण्यासाठी वाहन नेले म्हणजे गिऱ्हाईकांची सरबराई उत्तम व्हायची. पाणी फुकट घातले जायचे, काचा पुसल्या जायच्या व हवाही फुकट व आदबीने तपासून दिली जायची. पण आता "गेले ते दिवस" असे म्हणायची पाळी आली आहे. कमी 'कमिशन' मुळे परवडत नाही. या सबबीखाली यातील (पैसे देऊन) पेट्रोलच्या सेवेखेरीज अन्य सेवा मिळणे मुश्किल होत चालले आहे. अर्थात यातील मुख्य जाणवणारी अडचण "हवा" न मिळण्याची आहे. थोडी पाहणी केली तर बहुतेक पंपावर हवा भरून मिळत नाही. पंप बिघडला आहे, चालू असला तर माणूस नाही, माणूस असला तर पाइपचा व्हॉल्व्ह मोडलेला किंवा "आपल्या जबाबदारीवर वाहनचालकांनी हवा भरून घ्यावी" असा फलक. कोठे हवेच्या वेळा ठरावीक इतके करून जर तिथल्या मुलाने हवा भरून दिली तर बक्षिसी पाहिजेच. नाहीतर "पुढच्या खेपेला दाखवतो, असा अविर्भाव एकूण काय वाहन धारकांची गैरसोय ! (किंवा चालू भाषेत "हवा तंग" !) आता वाहनांची (दुचाकी व चार चाकी) संख्या वाढत चालली आहे. त्यांत स्त्रियाही मोठ्या संख्येने असतात. सर्वांनाच आपली आपण हवा भरून घेणे शक्य नसते व शेवटी "पाहिजे तर चार–आठ आणे घ्या पण हवा भरायची सोय उपलब्ध करून द्या" असे वैतागाचे उद्‌गार येतात. यावर एक उपाय म्हणजे सरळ निरनिराळ्या भागात "हवा केन्द्रे" स्थापन करावीत. ती पेट्रोलपंपावरच पाहिजेत असे नाही.

(दै. केसरी २।८।८३) सुधीर राशिंगकर पुणे,

अन्याय्य पाचपट भाडेवाढ

उन्हाळ्याच्या सुट्टीत लग्नासाठी द्यावयाच्या शाळेच्या भाड्यात पुण्याच्या शिक्षण मंडळाने नुकतीच वाढ केली. भाडेवाढ ही पूर्वीच्यापेक्षा एकदम पाचपट आहे. यात काय साधले ? गरिबांच्या हिताच्या दृष्टीने विचार करायला पाहिजे होता. आज गरिबाचे कैवारी खरे कोण हेच कळू शकत नाही. सर्वांना गरिबाचा कळवळा आहे हे मान्य, पण लग्नासाठी कोणते लोक शाळा घेतात ? स्पष्टपणे बोलायचे झाले तर गरीब समाजच या शाळांमध्ये कार्य उरकतो. कारण मंगल कार्यालयाची संख्या, भाढेवाढ वा अन्य गोष्टींमुळे सामान्य माणसांना कार्यालय परवडत नाही. तरीसुद्धा तो ऋण काढून सण साजरा करतो. शाळा ताब्यात घेताना

त्या ठिकाणी भोजनाची सोय नसते. खुर्च्या, टेबले नसतात. असते ते फक्त शाळेचे मैदान आणि चार-दोन खोल्या. ह्या सोयी ज्याच्या त्याने करायच्या असतात. मग पूर्वीच्या दरात एकदम सहापट वाढ का ? पूर्वी एका दिवसात वीजखर्चासह ६० रु. असा दर होता आणि आज एका दिवसाला वीज खर्चासकट ३५० रुपये ! म्हणजे गरिबावर अन्याय नाही का ? अनामत रक्कम पूर्वी २०० रुपये होती. आता ती ५०० रुपये केली.

(दै. केसरी, पुणे २३।३।८३) सुहास मुंगळे (मास्तर), पुणे.

स्वातंत्र्य की स्वैराचार ?

पुणे महापालिकेच्या महापौर, उपमहापौरपदांच्या निवडणुकीचे वेळी नगरसेवकांनी घातलेला धुमाकूळ पाहता आम्ही अजूनही स्वतंत्र, सार्वभौम भारताचे जबाबदार नागरिक म्हणवून घेण्यास पात्र नाही असे म्हणावेसे वाटते. आम्ही स्वातंत्र्याचा अर्थ स्वैराचार असा घेतला. देश परकीय अमलाखाली असला म्हणजे सर्व चुकांचे खापर राज्यकर्त्यांच्या माथी फोडता येते, पण स्वकीयांचाच अंमल असला म्हणजे सर्व प्रमादास आमचे आम्हीच जबाबदार ठरतो. मतदाराचा वैचारिक अंकुश लोकप्रतिनिधीवर राहिला नसल्याने त्याचे सभागृहातील वर्तन सभ्यतेस सोडून होत आहे. राज्य विधानसभेचे पावसाळी अधिवेशन विरोधी पक्षसदस्यांच्या अनुपस्थितीतच पार पडले आणि तेही पूर्वनियोजित कालावधीपेक्षा एक आठवडा अगोदरच. येथेही लोकशाही संकेताची पायमल्ली झाली. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर तीन तपे सुजाण व जबाबदार नागरिकत्व निर्माण करण्याच्या बाबतीत सत्तारूढ व विरोधी दोन्ही पक्ष उदासीन राहिले ही खरी या स्वैराचारामागील कारणमीमांसा आहे. देशहितापेक्षा वैयक्तिक महात्वाकांक्षा, स्वार्थ यांना महत्त्व दिल्यामुळे सर्वत्र निराशेचे वातावरण दिसते आहे. सामान्य जनतेचा शासनकर्त्यांवर, न्यायालयांवर, पोलिसांवर विश्वास नाही. त्याच्या हाती आपले जीवन सुरक्षित आहे अशी खात्री कोणासही नाही. वर्षानुवर्षे १५ ऑगस्ट येत आहे, पण फक्त ध्वजवंदन, नेत्याची ठराविक भाषणे, रात्री सांस्कृतिक कार्यक्रम यापलीकडे आमची उडी जात नाही. जबाबदार नागरिकत्व, कर्तव्यदक्ष लोकप्रतिनिधी निर्माण्याच्या ऐतिहासिक कामगिरीकडे आम्ही कोणत्या १५ ऑगस्टपासून वळणार ?

दै. सकाळ, पुणे १५।८।८३ नीलकंठ बा. देशपांडे, पुणे

बोधवाक्यांचा बोध

जागतिक युद्ध सुरू झाले (३ सप्टेंबर, १९३९) व त्यात काही शब्द, अक्षरे रूढ झाली. उदा. क्यू (रांग), व्ही फॉर व्हिक्टरी अगर 'मे आय हेल्प यू'

(आपणास मदत मिळेल) वगैरे. तेव्हापासून प्रत्येक ऑफिसमध्ये काही ना काहीतरी बोधवाक्य, बोधचिन्ह लावण्याची प्रथा सुरू झाली. मात्र त्यातून जनतेबरोबर अधिकाऱ्यांनीही बोध घेतला पाहिजे, पण नेमके उलटे होते. उदा. आज प्रत्येक सरकारी कचेरीतून हे वाक्य आढळते. 'पीपल वाँट क्विक रिझल्टस्. सर्च फॉर आल्टर नेटिव्हज् अँड नॉट एस्क्युजेस.' (जनतेला ताबडतोब निकाल पाहिजे. काहीतरी पर्याय शोधा, कारणे सांगू नका.) हा उपदेश जनतेपेक्षा अधिकाऱ्यांसाठीच जास्त आहे, पण हा मूळचा चांगला उद्देश लांब राहून, लाचलुचपत, भ्रष्टाचार वगैरेंसारख्या गोष्टी जन्माला आल्या. या बोधवाक्यांचा बोधचिन्हांचा उपयोग होणार नसेल तर ती प्रथम काढून टाकावीत. त्यामुळे जनतेस शासनाबद्दल विश्वास वाटेल.

दै. सकाळ, पुणे २३।६।७५ — भा. शं. पटवर्धन, पुणे

सेंट्रल रेल्वेचा अनागोंदी कारभार

भुसावळ हे सेंट्रल रेल्वेचे डिव्हीजनल केंद्र ! या डिव्हिजनचा सर्वच कारभार चमत्कारिक म्हणावा लागेल. भुसावळ जंक्शनहून नागपूरकडे जाणाऱ्या सर्व पॅसेंजर गाड्या बहुतांशी वेळेपेक्षा उशीरा सुटतात. त्यातही भुसावळ आऊटर सिग्नलपर्यंत ३-४ वेळा या गाड्या निर्जन आणि निर्जल स्थानी थांबतात. अर्थात यात रेल्वे कर्मचाऱ्यांचे काही हितसंबंध असण्याची शक्यता आहे. त्यानंतरचे पहिले स्टेशन वरणगांव ! येथे तर गाडी थांबण्याची निश्चित कालमर्यादाच नाही. या ठिकाणी रेल्वे कर्मचाऱ्यांची यथेच्छ खानापानीची सोय होते आणि गाडी बराच वेळ थांबल्याने अर्थातच कँटीनचालकाला चांगला आर्थिक लाभ होतो आणि अशा रितीने गाडी नागपूरला पोहोचेपर्यंत जादा कामाचा फायदाही रेल्वे कर्मचाऱ्याच्या पदरात अनायसे पडतो. पुढे गाडी बैलगाडीच्या गतीने वेग घेते आणि डोलत डोलत मार्गक्रमण करते. परिणामी बोदवड स्टेशन गाठायला गाडीला रोज साधारण दीड ते दोन तास उशीर होतो.

तसेच रेल्वेचे भरमसाठ वाढलेले भाडे देवूनही सुविधेऐवजी तापदायक आणि जिकीरीच्या प्रवासाचा अनुभव मात्र जनतेला सातत्याने रोज येतो. याबद्दल तक्रार करता संबंधित अधिकाऱ्याद्वारा दिलगीरीशिवाय दुसरे काहीही घडत नाही. एकंदरीत सेंट्रल रेल्वेचा भुसावळ डिव्हिजनचा कारभार अगदीच कुचकामी, गलथन, अकार्यक्षम आणि अनागोंदी असाच म्हणता येईल. तेव्हा याबाबत सेंट्रल रेल्वेचे संबंधित वरिष्ठ अधिकारी चोख कर्तव्यपूर्तीचे दर्शन जनतेला घडवितील काय ?

दै. बातमीदार, जळगाव ११।४।८३ — बाबुराव गंभीर वाणी, बोदवड

वृद्ध पत्रकारांची दखल घ्या

महाराष्ट्रात अजूनही काही वयोवृद्ध मंडळी आपापल्या परीने वृत्तपत्रसेवा करत आहेत. त्यांची आर्थिक परिस्थिती ढासळलेली आहे. त्यांना जीवन कंठणे अवघड झाले आहे. एकत्र कुटुंबव्यवस्था सद्य परिस्थितीमुळे संपूर्ण ढासळली गेली. उतारवयात त्यांना कोणी विचारत नाही. ही सत्यस्थिती आहे. सरकार स्वातंत्र्य सैनिक नि विविध क्षेत्रातील कलाकारांना आर्थिक मदत देते, पण पत्रकारांच्या बाबतीत म्हणावे तसे लक्ष दिले जात नाही. पत्रकार वृत्तपत्रांचा नंदादीप असतो. अ. भा. मराठी पत्रकार संघ स्थापन झालेला आहे. निरनिराळ्या जिल्ह्यातील पत्रकार संघांनी अशा पत्रकारांची संपूर्ण माहिती घेऊन त्यांची नावे जिल्हाधिकारी यांचेमार्फत वा संघामार्फत कळवून मानधन देण्याचा निकडीचा प्रयत्न करणे आवश्यक आहे, असे वाटते. अजूनही काही वयोवृद्ध पत्रकार निर्भयपणे लिखाण करणारे आहेत. त्यांनी लेखणी विकून स्वाभिमान गहाण टाकलेला नाही असे आवर्जून म्हणावेसे वाटते. अ. भा. मराठी पत्रकार संघ व शासन यांनी यासंबंधी सहानुभूतीपूर्वक विचार करावा अशी विनंती.

दै. संचार, सोलापूर १।३।८३ –वि. बा. आयचित, सोलापूर

" बँकांतील वाढती लूट "

१८ ऑगस्टच्या अंकातील बँकांमधील वाढती लूटमार हा अग्रलेख वाचला. आपले कोणत्याही विषयाचे विश्लेषण नेहमीच चिंतनीय असते. पन्नास कोटी ही रक्कम फक्त ठकबाजी आणि अफरातफरीची आहे व तीही सरकारी आकड्यानुसार ! त्यात डुबीत रक्कम मिळविली तर चित्र फारच भयंकर होईल. कोणासही रूचो की न रूचो, बहुतेक राष्ट्रीयीकृत बँका नफ्यात नाहीत हे कटुसत्य आहे. बँक हुंडी व चेकवर अमाप कमिशन घेत असते. असे असतानासुद्धा ही स्थिती का ? हा प्रश्न उभा राहतोच. बँक कर्मचाऱ्यांना त्यांच्या मेहनतीचा भरपूर मोबदला मिळतो. मग त्यांच्यासाठी व्याजात इतकी सवलत का ? उद्या धान्य कोठारावर काम करणाऱ्यांनी अगदी अल्प किंमतीत धान्य मागितले तर त्यांचे काय चुकले ? व्यंगचित्राबाबत आपण जे लिहिले तेही अगदी सत्य आहे. एखाद्या महानुभावाने तरी ते खोटे सिद्ध करण्यास धजावे.

बँकांचे राष्ट्रीयीकरण झाल्यावरही ज्या ठिकाणी दोन बँकांनी काम होऊ शकते, तेथे राष्ट्रीयीकृत बँकेच्या अधिकात अधिक शाखा काढून काय साधते ? त्यांच्यासाठी अवाढव्य खर्च करण्यास काय हशील ? काम वाढले तर त्याच बँकेत

कर्मचारी वर्ग वाढविता येतो, पण सरकार कधीकाळी तरी व्यापारी बुद्धी वापरेल तर शपथ !

दै. तरुण भारत २७।८।८३ —जुगलकिशोर राठी, अमरावती

महागाई निर्देशांकाचे गौडबंगाल आहे तरी काय ?

गेल्या तीन महिन्यांत महागाई निर्देशांक कमी होत आहे. वास्तविक महाराष्ट्रातच नव्हे तर सबंध देशभर दिवसेंदिवस भरमसाठ महागाई वाढत आहे आणि आपल्या देशात तर महागाई कमी होण्याची सुतरामसुद्धा शक्यता नाही. उलट दरवर्षी अर्थसंकल्पाला वस्तूंचे दर वाढतच असतात व मध्येच केंद्र सरकारला लहर आली की, गॅस, रॉकेल, डिझेल, पेट्रोल व पोस्टाच्या तिकिटांपासून ते पत्रांपर्यंत दरवाढ केली जाते. या वर्षीचा महागाईचा विचार केला तर वाढत्या महागाईच्या भस्मासूराने सामान्य माणसाला जीवन जगणे अशक्यप्राय झाले आहे. मात्र गेल्या तीन महिन्यांत जीवनमान निर्देशांक जो काढला जात आहे तो सर्वसाधारण वाढत्या महागाईशी तुलना करता कामगारवर्गाच्या डोळ्याला पानं पुसली जात आहेत.

जानेवारी ते मार्च या महिन्यांचे वस्तूंचे वाढते दर पाहता महागाई कुठेही कमी झालेली नाही. उलट वस्तूंचे दर वाढूनही त्या बाजारातून गायब होतात आणि पुनश्च काळ्या बाजारात विकल्या जातात. अर्थातच त्यामुळे रुपयांना काहीही किंमत राहिलेली नाही. निर्देशांक मात्र कमी होत आहे. गेल्या तीन महिन्यांत जानेवारी ४८३, फेब्रुवारी (महिन्याचे दिवस कमी असून) ४७९, मार्च ४६८ या तीन महिन्यांतील निर्देशांकाची तुलना करता निर्देशांक काढण्याच्या बाबतीत निश्चितपणे फसवेगिरी आहे व त्या पाठीमागे काहीतरी विशेष गौडबंगाल आहे आणि या गौडबंगालाच्या पाठीमागे जर भांडवलदारांचा हात असेल तर शासनकर्त्यांनी याबाबतीत त्वरित लक्ष द्यावयास हवे. केवळ मतांच्या गठ्ठ्यासाठी सामान्य कामगारवर्गाचा पुळका निवडणुकांकरिता नको आहे. तर त्यांच्या जीवनमानाशी ज्या महत्त्वाच्या बाबी निगडीत आहेत त्याकडेसुद्धा जातीने लक्ष दिले पाहिजे. आजच्या परिस्थितीत पुणे शहराच्या महागाईचा विचार केला तर पुण्याची महागाई मुंबई व सोलापूर शहरांपेक्षा कमी नाही. उलट काही अंशी जास्त आहे. तरीसुद्धा पुण्याच्या कामगारांना जो निर्देशांक दिला जातो तो बी वन गटातील दिला जातो. वास्तविक पुण्याला 'अ' गटातील निर्देशांक देणे आवश्यक आहे. परंतु पुण्याच्या कामगारवर्गावर जाणूनबुजून महागाई निर्देशांकाच्याबाबतीत अन्याय केला जात आहे.

एकंदरीत महागाई निर्देशांकाचे हे गौडबंगाल जर असेच चालू राहिले तर श्रमिक वर्गाचे निश्चितच आर्थिक शोषण होऊन त्यांच्या परिवाराला व्यवस्थित-

रित्या जीवन जगणे कठीण होईल. याबाबतीत देशातील सर्व कामगार संघटनांनी राष्ट्रीय पातळीवर तसेच राज्य पातळीवर सरकारला धारेवर धरले पाहिजे.

दै. श्रमिक विचार, पुणे — बी. एल. तारी

अमरावतींतील आटोवाला

" असाही एक टॅक्सी चालक ! " हे ८।८।८३ च्या म. टा. मधील सौ. उजगरे यांचे पत्र व " व. पुं. च्या कथेतील टॅक्सीवाला " हे १८।८।८३ च्या म. टा.मधील श्री. माधव पिटके यांचे पत्र वाचून मलाही अमरावतीतला एक ऑटोवाला आठवला.

त्या दिवशी मी व माझे एक मित्र श्री. घनश्याम शर्मा, अमरावतीहून ६ किलोमीटर दूर असलेल्या विदर्भ महारोगी सेवा मंडळ, तपोवन येथे गेलो. येण्या-जाण्याचा ऑटो ठरविला. तपोवनाला भेट देऊन परत आलो तेव्हा ऑटोचालक ऑटोत नव्हता. बाजूला ऑफिसमध्ये ऑटोवाला ५ रुपये देणगी देत होता. चौकशी-अंती कळले की, जेव्हा जेव्हा हा ऑटोवाला तपोवनची सवारी आणतो तेव्हा ५ रु. देणगी देतो. रात्रीची सवारी आणली व कार्यालय बंद असेल तर पुढच्या खेपेला पाच अधिक पाच, दहा द्यायचे. सिटी कोतवालीसमोर हा ऑटो उभा असतो. सिटी कोतवाली ते तपोवन व परत हा सर्वसाधारण १० रुपये दर. त्यातील ५ रुपये देणगी देणाऱ्या या ऑटोचालकाचे नाव श्री. दादाराव भाऊरावजी महल्ले व ऑटो-नंबर एम. एच. व्ही. ६८७१.

दै. महाराष्ट्र टाइम्स, मुंबई २६।८।८३ — गोविंद कासट, अमरावती

भारत– आंतरराष्ट्रीय धर्मशाळा

बांगला देशातून नुकताच बारा हजार नागरिकांनी भारतात घुसून मुक्काम ठोकला. अनेक वर्षे आसाममध्ये लाखो माणसे आली ती परत गेली नाहीत. काही इराणी विद्यार्थ्यांनी तर विद्यापीठात गोंधळ उडवून दिला. दोन इराणी गटात काही खोमेनीवादी व काही खोमेनी प्रतिवादी मारामारी करतात. मुक्तपणे चाकू-सुऱ्या यांचा वापर करतात. परवा तर अगदी कमालच झाली. भारतात चक्क इराणी व इराकी नागरिकांचे युद्ध. बंदुकीचा व गोळ्यांचा मुक्त वापर ? त्यात काही भारतीय पोलीस जखमी. याला कोण जबाबदार ? या परदेशी पाहुण्यांना बंदुका व गोळ्या कोण देते ? भारतात येतानाच आणतात का त्यांना भारतात विकत मिळतात का ती मंडळी स्वत:च तयार करतात ? काय शस्त्रघोटाळा आहे कळत नाही. सर्वधर्मसमभावप्रमाणे सर्व देशसमभाव ही वृत्ती भारताने आता सोडून द्यावी. चालू प्रसाराकडे " भारत संरक्षण खात्याचे बारीक लक्ष आहे ", असे सांगून सरकारने स्वत:चे हसे करून घेऊ नये. या आपल्या प्रिय परदेशी पाहुण्यांना जरब

बसेल अशी काहीतरी योजना हवी. जनता सावध आहे ती फसणार नाही, पण करणार काय ? भारत देश ही एक आंतरराष्ट्रीय धर्मशाळा होत आहे. राष्ट्रीय प्रवाह वाहवत आहे, वाहात नाही.

डॉ. प्र. श. मराठे, वाई

समाजवाद म्हणजे नक्की काय ?

कुठल्याशा नाटकातील नायिका आपल्या वडिलांना सांगते की, " एका तरुणावर माझे प्रेम बसले आहे. " त्यावर वडील तिला विचारतात, " म्हणजे नक्की (एक्झॅक्टली) काय झाले आहे ?" सध्या सर्व पक्षांतील मोठे नेते समाजवादावर अचानक प्रेम करू लागले आहेत. जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी या नेत्यांना समाजवाद दिसू लागला आहे. सोयीस्कर समझोते, सत्तेची खिरापत, मंत्रिमंडळात उलथापालथ, एकमेकांवर कुरघोडी, फुटीर फितुरांची मिरासदारी या सर्व प्रथा समाजवादाच्या दीपस्तंभाकडे नेणाऱ्या आहेत की, अराजकतेच्या खोल खड्ड्यात नेणाऱ्या आहेत याची उकल सामान्यजनांना होईनाशी झाली आहे. शिवाय, स्वतःची सत्ता व संपत्ती यांच्याविषयी अवाक्षरही न काढता सारे रथी महारथी समाजवादाचा उद्घोष करीत आहेत. प्रत्येकाच्या समाजवादाचे रंगढंग भिन्न दिसतात. तेव्हा समाजवाद म्हणजे नक्की काय, व आपण त्याचे आचरण कसे करतो हे या मान्यवरांनी एक परिसंवाद घेऊन जाहीर करावे म्हणजे समाजात त्याविषयी वाद राहणार नाहीत.

–श्री. ग. सबनीस, सांगली

गव्हर्नमेंट सर्व्हन्टस् बँकेत घड्याळ बसवा

कोल्हापूर येथील पद्मा टॉकीज जवळील गव्हर्नमेंट को- ऑप सर्व्हेण्टस बँकेत पूर्वी भिंतीवरील घड्याळ होते. त्यामुळे खातेदारांची चांगलीच सोय होत असे. पण हल्ली कित्येक महिने तेथे घड्याळच नाही. त्यामुळे खातेदारांची गैरसोय होते. तरी पूर्ववत तेथे भिंतीवरील घड्याळ बसवावे व थंड पाणी पिण्यासाठी ठेवावे.

–राम हरोलीकर, कोल्हापूर

गरज हाच निकष हवा

९–२–७३ चा आपला " जात दाखव, नाहीतर सवलती नाहीत ! " हा अग्रलेख आवडला. सवलतीविषयी बोलताना आपण लिहिले आहे, " माणसे नियमात बसण्यासाठी नाहीत, नियम योग्य माणसाच्या हितासाठी आहेत, हे भान हवे. गरज ठरविताना नियमापेक्षा माणुसकी व तारतम्य हवे." मदत देताना जातीपेक्षा गरज हा निकष लावला गेला पाहिजे हे आपले मत आम्हाला फारच आवडले. मात्र

संबंध देशात या नियमाचे कुठेही पालन होत नाही.

आज कित्येक खेड्यात व शहरात अशी परिस्थिती आहे की दलित समाजातील काही व्यक्तींनी आपली खूप प्रगती करून घेतली आहे. त्यांना आर्थिक स्थैर्य लाभले आहे. परंतु केवळ ते हिंदू समाजातील दलित आहेत म्हणून शासनाकडून त्याना सवलती मिळतात. नगर, सातारा, नासिक जिल्ह्यात दलित समाजातून कितीतरी लोक ख्रिस्ती झाले आहेत. परंतु केवळ त्यांचा धर्म ख्रिस्ती म्हणून त्यांना सवलती नाकारण्यात येतात. म्हणजे महाराष्ट्र सरकार निष्कर्ष लावते तोही धर्माचाच ! धर्मनिरपेक्ष लोकशाहीमध्ये शासनाच्या या वागण्याचा अर्थ काय ? हा नियम उच्चवर्गीयांनाही लागू आहे. एखादा ब्राह्मण कितीही गरीब असला तरी तो उच्च वर्णिय म्हणून त्याला शासनाकडून काहीच मदत मिळणार नाही. तेव्हा शासनाला आमची विनंती आहे की या सवलती देताना धर्म, जात यांच्याऐवजी गरज हाच एकमेव निकष लावावा.

दै. महाराष्ट्र टाइम्स. १५–१०–८२ –फ्रान्सिस दिब्रिटो. वसई

शिक्षकांचा प्रश्न

महाराष्ट्र राज्य सरकारच्या गोंधळी कारभारामुळे राज्य निवड मंडळ बरीच वर्षे अस्तित्वात येऊ शकले नाही. तेव्हा शिक्षण कायद्याप्रमाणे निवड समिती नेमून व त्यात सरकारी प्रतिनिधी घेऊन आमच्या शिक्षण मंडळातील शाळांसाठी आम्ही पाच शिक्षक नेमले. बी. सी., ओ. बी. सी. भटक्या विमुक्त जातीतीलच शिक्षक आम्हास भरावयाचे होते. कारण आता प्रत्येक खात्यात हा बॅकलॉग भरावा म्हणून आदेश आहेत. त्यामुळे या वर्गातील बहुतेक शिक्षित लोक चांगल्या नोकरीकडे आकर्षित होतात व त्यातून गळून राहिलेले शिक्षणखात्याकडे वळतात व असा गाळ राहात राहात खेड्यांपर्यंत पोहोचतो आमची निवड अगोदर झाल्याने आम्हाला बऱ्यापैकी शिक्षक मिळाले. त्यांतील एकाला शहरात नोकरी मिळाल्याने त्याने राजीनामा दिला. राहिलेले शिक्षकांना नोकरीची शाश्वती मिळावी म्हणून आम्ही त्यांना कायम करावे म्हणून ठराव केला परंतु आता राज्य निवड मंडळाकडून आम्हाला पत्र आले आहे की तुम्ही नेमलेले शिक्षक हंगामी असल्याने त्यांना तुम्ही नोकरीत एक दिवसाचा खंड द्यावा व पुन्हा त्यांची अकरा महिन्यांसाठी हंगामी शिक्षक म्हणून नेमणूक करावी व तो पर्यंत त्यांना शिक्षण निवड मंडळाकडे नोकरीसाठी अर्ज करावयास सांगवे व निवड मंडळाने त्याची निवड केल्यास मगच त्यांची कायम स्वरूपात नेमणूक करावी. अशा तऱ्हेची अधांतरी नोकरी स्वीकारण्यास वरील वर्गाचे कोणीही तयार होत नाहीत व चांगले गुणवान उमेदवार तर केव्हाच तयार होत नाहीत. शिक्षण निवड मंडळाने अगर कोणत्याही कायद्याने प्रस्थापित

झालेल्या निवड मंडळाने सर्व चाचण्या व परीक्षा घेऊन नेमलेल्या नोकरांनाच निवड मंडळाने प्राधान्य देऊन नोकरीत कायम करावे. अनेक शिक्षकमंडळांनी अशा तऱ्हेने शिक्षक नेमलेले आहेत. तेव्हा हा अनेक शिक्षकांचा प्रश्न आहे.

दै. सकाळ. २–२–८३ अॅड. पु. वा. परांजपे. तळेगाव दाभाडे.

धोक्याची जाणीव हवीच !

एस. टी. गाडयांच्या अपघाताच्या बातम्या नेहमीच येत असतात. असे अपघात का होत असावेत याचा एक अनुभव येथे सांगतो. नुकताच मी पुण्याहून कोल्हापूरला एस. टी. ने जात होतो. ड्रायव्हरच्या पाठीमागच्या बाकावर (नं. १ च्या सीटवर) मी बसलो होतो. वाटेत ड्रायव्हर मध्ये येणाऱ्या बैलगाडया, ट्रकवाले, पादचारी वगैरेंना अगदी उल्लेखही करू नये अशा शिव्या देत होता. पेठच्या पुढे गाडी अगदी जोरात चालू असताना त्याला तंबाखूची तल्लफ आली असावी. कारण स्टीअरिंग व्हील केवळ ढोपरावर कंट्रोल करीत त्याने व्ययस्थित खिशातून चंची काढून तंबाखूची चिमूट तळहातावर घेतली, अंगठ्याच्या नखाने चुना काढून मळला व मस्तपैकी फकी मारली. हे सर्व गाडी चालू असतानाच चालू होते व किमान २–३ किलोमीटर गाडी तशीच चालविली. मी अगदी जीव मुठीत धरून बसलो होतो. एकदा वाटले ड्रायव्हरला सांगावे, 'बाबारे, जरा गाडी उभी कर व मग काय तुला तंबाखू, विडी, तपकीर जी काही तल्लफ भागवायची ती भागव !' पण त्याचा पूर्वीचा 'मूड' पाहता त्याने माझ्यावरच असभ्य शब्दांचा भडीमार केला असता अगर आणखी काय तमाशा केला असता कल्पना करवत नाही. कितीही आत्मविश्वास असला तरी अशा वर्तणुकीमुळे आपण स्वतःच्या व प्रवाशांच्या जिवाला धोका ओढवून घेत आहो हे ध्यानात का येऊ नये ?

दै. केसरी. १४–७–८३ सुधीर राशिंगकर.

सुधारित संयुक्त व्यंजन ?

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाने नियुक्त केलेल्या शालेय पाठ्यपुस्तकांच्या मुद्रणात 'श्र', 'ज्ञ', 'क्ष' आणि 'य' ही संयुक्त व्यंजने "स्वतंत्र अक्षरे" म्हणून स्वीकारली आहेत. परंतु मुंबई महापालिकेच्या शालेय विश्वात यातील 'ज्ञ' खेरीज अन्य अक्षरांना सर्रासपणे फाटा देण्याची. चमत्कारिक प्रवृत्तीवाढीस लागलेली आहे. शिक्षण विभाग कार्यालयातील माहिती फलक, शालेय फलकावर, तक्त्यावर आणि शैक्षणिक परिसंवादाच्या अनुषंगाने आयोजित केल्या जाणाऱ्या खास भाषा विषयाच्या प्रदर्शनाच्या तक्त्यातील मजकुरातही उल्लेखित संयुक्त व्यंजने अनुक्रमे 'श्र', 'क्ष' व 'त्र' अशी लिहीलेली आढळ-

तात. जसे 'श्री' ऐवजी 'श्री', 'परीक्षा' ऐवजी 'परीक्षा' व 'पत्र' ऐवजी 'पत्र' तसेच 'प्र', 'क्र', 'ग्र' सारखी 'र' चिन्हयुक्त जोडाक्षरे अनुक्रमे 'प्र', 'क्र', 'ग्र' अशी लिहिली जातात जसे 'प्रमाण', 'क्रमांक', 'ग्रह' वगैरे. वैज्ञानिक लिपीच्या दृष्टीने वर्णानुक्रम पद्धती योग्य असली तरी जोपर्यंत तिचा पाठ्यपुस्तकात अवलंब केला जात नाही तोपर्यंत उल्लेखित " स्वतंत्र अक्षरे " आणि ' जोडाक्षरे ' ही तशीच लिहिली जाणे आवश्यक आहे. कारण त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये असमान लेखन पद्धती विषयाची संदिग्धता निर्माण होणार नाही.

केसरी, ३०।१।८२ रघुनाथ पां. शिरकर, वसई

अभिनव बालक वर्ष

चालू वर्ष आंतरराष्ट्रीय बालकवर्ष म्हणून सर्व देशभर मोठ्या उत्साहाने साजरे होत आहे. व निरनिराळी राज्ये बालकांचे आरोग्य त्यांची स्वच्छता, शैक्षणिक सोयी, पौष्टीक आहार, व्यायाम, क्रीडानैपुण्य वगैरे गोष्टींवर सर्वतोपरी लक्ष केंद्रात करून या बालकांच्या सर्वांगीण विकासावर भर देत आहेत.

महाराष्ट्र राज्यसुद्धा बालकांचे मेळावे, निरनिराळी प्रदर्शने, आकाशवाणी व दूरचित्रवाणीवरून व्याख्याने चर्चा याद्वारे शहरापासून खेड्यापर्यंत व सुशिक्षितापासून अशिक्षितापर्यन्त या बालकवर्षाचे महत्व पटवून देत आहे.

असे असतांना भर उन्हाळ्याचे दिवसात ग्रामीण भागात प्राथमिक शाळांची वेळ सकाळी ६–४० ते दुपारी ११–३० व पुढे एक तास १९७७ सालातील शिक्षकांचे संपामुळे विद्यार्थ्यांचे अभ्यासाचे झालेले नुकसान भरून काढावे असा आदेश शासनाने दिला आहे असे ऐकतो.

ग्रामीण भागातील ही छोटी मुले दूर अंतरावरून येत असल्यामुळे ६–४०ची शाळेची वेळ गाठण्याकरिता त्यांना निदान ६ वाजता घर सोडावे लागते व पूर्वतयारीकरिता एक तास.

मधल्या अर्धा तासाच्या सुटीत ही मुले घरी जाऊ शकत नाही. म्हणजेच दुपारी १२–३० वाजता सुटल्यावर साधारण एक वाजता रखरखीत उन्हातून घरी पोहचतात. तोपर्यंत बिचारी ही निरपराध मुले उपाशी. असे असताना ११–३० ते १२–३० या वाढीव तासात या बाल विद्यार्थ्यांच्या ज्ञानात खरेच भर पडत असेल का, हे एक प्रश्न चिन्ह आहे, तेव्हा शासनाने खरोखरच जर असा आदेश दिला असेल, तर या वर्षाला " अभिनव बालक वर्ष " हेच नाव गोंडस ठरेल असे वाटते. मात्र ही अजाण बालके गोंडस होणार नाहीत हे निश्चित.

दै. मुंबई सकाळ ७।५।७५ –चिंतामण वामन उपाध्ये, गणेशबाग, (उरण).

मंगलाक्षतापेक्षा मंगलाष्टकाचा मारा असह्याय्य !

मे व जून महिन्यात सर्वत्र लग्नाची धामधूम असते. एकाच दिवशी व एकाच मुहूर्ताची अनेक निमंत्रणे निमंत्रितांना आलेली असतात. बहुतांशी केवळ व्यवहार म्हणून काही अंशी आत्मियतेने लग्न कार्याला वेळ व पैसा खर्चून निमंत्रित जात असतात.

धार्मिक पद्धतीप्रमाणे म्हटल्या जातात त्या मंगलाष्टकांबद्दल तशी कुणाचो तक्रार नसते. शिवाय. वधूवरांच्या मस्तकी समर्पण करण्याच्या मंगलाक्षतापैकी बऱ्याच अक्षतांचा मारा वधूवरासभोवती जमलेल्या स्त्री–पुरुषांच्या मस्तकावर होऊन त्यांना आपण चतुर्भुज झालो त्या काळाची सुखद (?) स्मृती होऊन त्यांचे अंगावर सुखाचे रोमांच उभे रहात असतील (?) ! तेव्हा ही ही तक्रारीची बाब नव्हे ! पण.

आजकल, नवोदित कवी इतके उदंड झाले आहेत की, ते वधू व वराकडील मंडळींना चारचार आठआठ कडव्यांची मंगलाष्टके तयार करून देतात व लग्नात जणू " संगीत मैफल " भरावी या थाटात ती अगदी तबला पेटीच्या साथीने आळवून मोठ्या भक्तीभावाने म्हटली जातात ! स्वतः वधूवरांचेही या काव्याकडे मुळीच लक्ष नसते ! " ती " मंगल घटिका केव्हा येते व आपणा उभयतातील (एकमेकांचे चेहरे हा स्पष्ट दिसणारा) हा अंतरपाट कधी दूर होतो व परस्परांच्या गळ्यात हार केव्हा घालतो यासाठी ती उभयता अत्यंत उत्सुक असतात. त्याचवेळी हा लग्नसोहळा संपून आपण आपल्या दैनंदिन उद्योगाला कधी जातो ' या विचारात निमंत्रित असतात.

खर म्हणजे लग्नात " मंगलाष्टके " ही पद्धत आता टाईमबार झाली आहे. वधूवर पालक फार उत्साही हौशी असतील तर त्यांनी लग्नानंतर रात्री स्पेशल संगीत मैफल ठेवावी. कुणाच्याही आवाजात मंगलाष्टकांच्या फैरीवर फैरी झाडून बिचाऱ्या निमंत्रितांना अस्वस्थ करू नये असे वाटते.

या संदर्भात कै. गडकरी यांच्या सहजी विनोदाची आठवण सांगावीशी वाटते. एका लग्नात एक उत्साही एकामागूनएक मंगलाष्टके भसाडचा, बेसूर आवाजात गात होते. गडकऱ्यांच्या शेजारचे गृहस्थ चिडले. ते म्हणाले, " आणखी किती वेळ मंगलाष्टके चालणार, विचारू का ?" त्यांवर, कै. गडकरी म्हणाले, " तसे नका विचारू. त्यांना विचारा की, तुम्हाला चरण किती ?" हा विनोदाचा भाग सोडला तरी, " मंगलाक्षतांचा मारा चालेल ! पण मंगलाष्टकांच्या माऱ्यापासून आम्हाला वाचवा !" हीच निमंत्रित लोकांची प्रतिक्रिया आहे.

दै. तरुण भारत, पुणे ९।६।८० —श्री. ग. सबनीस, सांगली

सरकारी कामांना विलंब

वसंतदादा मंत्रिमंडळातील मंत्री व इतर राजकीय पुढारी यांच्या नेहमीच्या भाषणात 'युद्ध पातळीवर काम करू व झालेच पाहिजे' असे शब्दप्रयोग असतात. 'युद्ध' हा शब्दप्रयोग का करतात ? कोणी युद्ध पाहिले का ? शांतता पातळीवर हेच काम का करता येऊ नये ? स. ११ ते ५ या वेळात चहा पिणे, गप्पा मारणे किती वेळ जातो हे प्रथम पहावे, दहा वर्षे लागणारी कामे तीन दिवसांत कशी होतील याचे एकच उदाहरण देतो. दस्तऐवज, देणी-घेणी, खरेदी-विक्रीचे कागदपत्र, रजिस्टर कचेरी, पुणे येथे होतात. येथील कागद फोटो झिंको ऑफिस येथे नोंदणी-साठी जातात व परत तीन वर्षांनी घेणे, देणारे यांच्याकडे पोहोचतात. या काळात कदाचित त्यांच्या वारसांची नावेही लागतील. ज्या दिवशी कागद रजिस्टर पुण्यात झाला, त्याच्या दुसऱ्या दिवशी कलेक्टर ऑफिसमध्ये झेरॉक्स मशीनवर फोटो झिंको कागद वापरून कॉपीज मिळतील, मग तिसऱ्या दिवशी रजिस्टर साहेबांनी सही शिक्के मारून ज्याच्या नावावर पावती असेल त्याच्या नावावर पोस्टाने धाडावे किंवा ते लोक हजर असतील तर त्यांना द्यावे. समजा, याच कागदपत्रांची नक्कल वीस वर्षांनंतर कोणास लागली तर रेकॉर्डमधील कॉपी काढून परत त्या मशीनने तयार करावी. व रजिस्टारसाहेबांची सही, शिक्क्यासह द्यावी. अशा तऱ्हेने कोर्टा-तील नकला, निकाल लवकर मिळतील.

दै. सकाळ, २६।७।८३ — ग. स. ठोसर, पुणे.

गरीब–श्रीमंत दरी कायमच

आज १५ ऑगस्ट, १९८१ भारताचा चौतीसावा स्वातंत्र्य दिन, बघता बघता स्वातंत्र्य मिळून चौतीस वर्षे लोटली. अजूनही गरीब व श्रीमंत यातील दरी कमी झालेली नाही. अस्पृश्य सवर्ण यांचे वाद संपुष्टात येऊ शकत नाहीत. स्त्रियावर अत्याचाराचे प्रकार चालूच आहेत. भ्रष्टाचार पराकोटीला पोहोचला आहे. पक्षबदलू पुढाऱ्यांमुळे नेमके कोणाचे पुढारीपण पत्करावे या विवंचनेत जनता आहे. सत्तामिळविण्यासाठी व ती टिकवून वैयक्तिक स्वार्थ साधण्याची प्रवृत्ती या देशातील तथाकथित पुढाऱ्याची झाली आहे. बेकारी, महागाई वाढतच आहे. इतके जरी असले तरी आम्ही स्वतंत्र देशाचे नागरिक आहोत. याचा आम्हाला सार्थ अभिमान वाटतो.

नारायण रा. देशपांडे, पुणे.

पवित्र लग्नसोहळ्यात डिस्को डान्स कशासाठी ?

ता. २२ मे ८३ रोजी रविवारी सकाळी मुरारजी पेठ किल्ला रोडवरील एका मंगल कार्यालयात लग्न समारंभास जाण्याचा योग आला. मंगलाष्टके संपली.

नवऱ्या मुला–मुलीने एकमेकांच्या गळ्यात हार घातले व बँड वर 'जा मुली जा दिल्या घरी तू सुखी रहा !' हे गाणे आवर्जून वाजविण्यात आले. त्यानंतर मात्र 'डिस्को' डान्सचे संगीताने तालावर विशेषत: त्या प्रसंगी जमा झालेले युवकांचे तालबद्ध व अंग मेहनतीचे विक्षिप्त नृत्य सुरू झाले.

कारण काय तर नवऱ्या मुलीची आहेर स्विकारण्यासाठी खुर्चीवर बसण्याच्या तयारीसाठी व डिस्को नाच जमलेल्या लोकांच्या मनोरंजनासाठी !

त्यात दोन गोष्टी खटकल्या त्या अशा की, वीज नसल्यामुळे व उन्हामुळे शिवाय आतल्या कोंदट हवेमुळे लोक बेचैन झालेले होते व दुसरे असे की जमलेल्या मंडळींना लग्न समारंभातून बाहेर पडण्याची घाई झालेली होती.

तेव्हा लग्नप्रसंगी आपण लोकांना कशासाठी बोलावतो ? त्यातील पानिऱ्य कोणते ? याशिवाय ज्यांनी सभामंडप ज्यांना भाड्याने दिलेला होता, त्यांच्यावर त्यांच्या लग्नसभामंडप कार्यालयाला 'डिस्को नृत्याने कमीपणा येत नाही का ?, कारण प्रत्येकजणाला रस्त्यावरील मिरवणुकीमध्ये वरील सारखे नृत्य बघावयास मिळते त्यामुळे प्रत्येक (स्त्री-पुरुषाच्या) मनात प्रश्न येतो की, 'आम्हाला या साठीच लग्नाला बोलावलेले होते का ?' तेव्हा याची सर्व जबाबदारी कार्यालय भाड्याने देणाऱ्या मालकावर पडत नाही का ? हा एकच प्रश्न डोळ्यांसमोर उभा राहतो ?

दै. सोलापूर समाचार, २५।५।८३ भालचंद्र पटवर्धन. सोलापूर,

उन्हाळी सुट्टीची पद्धत बंद करा

पूर्वी ब्रिटीशांच्या कारकिर्दीत त्यांना इकडील हवा मानवत नसे. एप्रिल-मे महिन्यातील उष्णता सोसवत नसे, म्हणून त्यांनी या दोन महिन्यासाठी सुट्टीची पद्धत सुरू केली. सुट्टी घेऊन महाबळेश्वर, माथेरान, माऊंट अबू या थंड हवेच्या ठिकाणी जाऊन ते विश्रांती घेत असत.

ब्रिटीश गेले पण त्यांनी चालू केलेली ही पद्धत बंद झालेली नाही. मे महिन्यात सुट्टी पडली की कडक उन्हात मुले दंगा करतात. त्यांना ते ऊन बाधते व मुले आजारी पडतात. तरी आता परीक्षा व सुट्टीची पद्धत बदलली पाहिजे. मे महिन्याऐवजी गणेशोत्सव, दिवाळी या सणात भरपूर सुट्टी दिली पाहिजे. तरच ते योग्य ठरेल.

दै. समाज, कोल्हापूर, २३।४।८२ –राम हरोलीकर कोल्हापूर

यॉकेल वाटपाबाबत शासनाचे समसोंल धोरव हवे ! तो

सोलापूर जिल्हाधिकारी, पुरवठा अधिकारी यांनी रॉकेलबाबतचे धोरण वृत्तपत्रातून नुकतेच प्रसिद्ध केल आहे. शहरी विभागाकरीता एका कार्डावर महि-

न्याला ८ लिटर तेल नियंत्रित दरांत व ४ लिटर निर्नियंत्रितदरात मिळेल. सिलेंडर गॅस आहे. त्यांना अधिक भावाचे तेल मिळू शकेल. इतरांना नियंत्रित दरात तेल मिळेल असे जाहीर केले आहे. शहरात गॅस पुरवठा नियमितपणेहोत नाही, तोपर्यंत कार्डाच्या युनिट प्रमाणे १० युनिटपर्यंत १० लिटर, १० युनिटच्यापुढे १५ लिटर रॉकेल नियंत्रित दरात मिळणे आवश्यक आहे.

कार्ड धारकांना ८ लिटर तेल महिन्याला पुरत नाही त्यात वाढ झाली पाहिजे. रॉकेलबाबतचे सरकारचे दुटप्पी धोरण जनतेला पसंत नाही. मुंबई पुणे या शहरांना रॉकेल तेल वाढवून दिले आहे. मग सोलापूरच्या बाबतीत ही भूमिका का ? हा प्रश्न सामान्य माणसापुढे उभा राहतो सरकारने याबाबत फेरविचार करून समानतेचे धोरण अवलंबणे जरुरीचे आहे असे वाटते.

दै. संचार, सोलापूर १०।४।८३ –वि. बा. अयाचित, सोलापूर.

प्रवासी सेवेचे ब्रीदवाक्य चांगलें : पण कसूर नको

महाराष्ट्र एस.टी.ने " प्रवाशांच्या सेवेसाठी " हे ब्रीदवाक्य तर चांगले निवडले आहे, पण त्याप्रमाणे काम होते की नाही, हे ही पाहिले पाहिजे. बहुतेक एस.टी. स्टँडवर गाडच्या प्रवाशांकडे पाठ करून फलाटावर लावल्या जातात. त्यामुळे ती गाडी पुढे कुठे जाणार हे जाणून घ्यावयाचे असेल तर प्रवाशाने एकतर ज्यांतून खरखरी शिवाय काही ऐकू येत नाही अशा लाऊड स्पीकरवर विसंबून रहावे, अगर ' काय कटकट आहे?' अशा चेहऱ्याने स्वागत करणाऱ्या चौकशी खिडकीवरील माणसाला वा कंडक्टरला विचा रावे, किंवा गाडीच्या पुढच्या बाजूला जाऊन बोर्ड (असल्यास) पहावा. त्यांत परत दुसऱ्या गाडीचा धक्का लागायची भीती (आणि शक्यताही.) जास्त असते एस. टी.च्या पाठीमागे गाडच्या कोठून कोठे जाते हे खडूनं लिहिण्यासाठी एक काळा चौकोन बऱ्याच गाडच्यांवर असतो. पण बऱ्याच वेळा तो ' कोरा ' असतो. यामुळे मधल्या स्थानकावर गाडी उभी असतानाही ' आपली ' गाडी शोधण्यासाठी किती कसरत करावी. लागते, याचाही अनुभव बऱ्याच प्रवाशांना येतो. वस्तुतः गाडीच्या पुढील बाजूस जसा बोर्ड लावावा लावतात तसाच मागील बाजूस. खरे तरप्र वेशाच्या दरवाजावर लावला तर केवढी सोय होईल. हे एस. टी. अधिकाऱ्यांनी स्वतः एस. टी. ने प्रवास केला तरच त्यांना कळेल.

दै. पुढारी, कोल्हापूर २८–१०–८३ – सुधीर राशिंगकर, पुणे.

पुस्तकी शिक्षण पुरे

नुकताच बारावीचा निकाल लागला. दिवसेंदिवस विद्यार्थ्यांचे प्रवाण वाढत असून, मेडिकल, इंजिनीअरिंग, आयुर्वेद आदी व्यावसायिक शिक्षणक्रमांकडे त्यातील

अत्यल्पच जाऊ शकतात. इतर हजारो विद्यार्थ्यांचे भवितव्य शेवटी अंधारात राहते. त्यामुळे उत्तरोंतर सुशिक्षित बेकारांची संख्या वाढत असल्यास नवल नाही सध्याच्या पुस्तकी शिक्षणपद्धतीचा व चुकीच्या परीक्षा पद्धतीचाच हा परिपाक आहे. शासनही याबाबतीत उदासीन असून, महाविद्यालये व विश्वविद्यालये फक्त पदवीचा शिक्का मारणारे कारखाने बनले आहेत. यामुळे सध्याच्या शिक्षण पद्धतीत आमुलाग्र बदल करणे आता जरूरीचे झाले आहे. जास्तीत जास्त व्यवसायाभिमुख शिक्षण दिल्याखेरीज नवीन पिढीला तरणोपाय नाही. याबाबतीत 'सकाळ'च्या दूरदृष्ठीचे नवल वाटते. पन्नास वर्षांपूर्वी पुण्यात मॉर्डन कॉलेज निघाले, तेव्हा 'सकाळ'ने आपल्या अग्रलेखात. औद्योगिक शिक्षणाची आवश्यकता प्रतिपादन केली. (सकाळ : १८-३-३२) शिक्षण स्वस्त करण्याच्या उद्देशाने फक्त शिक्षणसंस्था काढण्यापेक्षा उपाशी मरणाऱ्या आजच्या व पुढचे पिढीत स्वावलंबी करणाऱ्या शिक्षणाची आता जरूरी आहे हे 'सकाळ'चे धोरण आज पन्नास वर्षांनंतरही योग्य ठरत आहे. आज त.च स्थिती आहे. याचे वाईट वाटते. आमचे शिक्षणतज्ज्ञ, शासन आतातरी जागे होईल काय ?'

दै. सकाळ, पुणे ३०-६-८२ प्रा. डॉ. रवि जवळगेकर, सोलापूर.

रस्त्यांचे नामफलक म ाठीतच हवेत

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विशेष समितीच्या ठराव क्र. ५७ अन्वये 'उर्दू भाषिकांची संख्या जास्त असलेल्या विभागातील विविधरस्त्यांचे नामफलक मराठी-उर्दू भाषात लिहिण्याच्या इष्टतेवरील अहवाल गुरुवार दि. ४ फेब्रुवारी रोजी भरणाऱ्या महानगरपालिकेच्या सर्वसाधारण मासिक सभेपुढे विचारार्थ येणार आहे.

हा ठराव महाराष्ट्र राज्याची 'राज्यभाषा' मराठीच्या सार्वभौमत्वाशी व्यभिचार करणारा आहे. कारण कोणत्याही राज्याची राजभाषा ही सर्वभौम आहे. सर्वत्र तिचाच वापर व्हायला हवा हा राजभाषा अधिनियमाचा संकेत आहे. त्यानुसार रस्त्यांचे नामफलक राजभाषा मराठीतच असायला हवेत.

आज मुंबापुरी विविध भाषी आणि पंथी लोकांची वास्तव्यभूमी बनलेली आहे. त्यानाही उद्या आपल्या भाषेत रस्त्यांची नावे लिहिली जावीत असे वाटल्यास नवल नाही. याच न्यायाने मुंबईतील सिंधी, गुजराती, तेलगू, कन्नड वगैरे विविध भाषातील नावाची हास्यास्पद मालिकाच तयार होईल नि तो नामफलक चित्र-विचित्र बनेल. एवढ्यावर हे भागले नाही तर त्या रस्त्यावरील शाळा, रुग्णालये, डाक कार्यालये, दुकाने यांचीही नावे आपल्या भाषेत लिहिण्याचा आग्रह धरण्यात येईल. कालांतराने कोणत्याही राज्याची सर्वाधिक प्रचलित भाषा हीच त्या राज्याची राजभाषा होय हे सुत्र अर्थशून्य ठरेल.

तेव्हा महापालिकेने सदर ठराव फेटाळून लावला पाहिजे. कारण राजभाषा अधिनियमांची पायमल्ली करून रस्त्यांच्या नामफलकावर उर्दूला बसविण्याचे लांगूल चालन केले गेले तर ते निश्चितच विकतचे श्राद्ध ठरेल.

दै. सांज तरूण भारत, मुंबई. ३–२–८२ – रघुनाथ पां. शिरकर, वसई

स्वातंत्र्याची गळचेंपी

'अमेरिकन विद्यापीठांवरील निर्बंध' या आपल्या (सकाळ: ३ डिसेंबर, ८१) अग्रलेखाने शैक्षणिकदृष्टया महत्त्वाच्या व मूलभूत प्रश्नाचा ऊहापोह केला आहे. देशाचे सुरक्षिततेस महत्त्व आहेच हे कोणीही नाकारणार नाही, पण परदेशी विद्यार्थ्यांना प्रवेश देताना सरकार झोपले होते का हा महत्त्वाचा प्रश्न आहे. त्यापेक्षा जो अभ्यासक्रम परदेशी विद्यार्थ्यांना शिकवावयांचा नाही त्याची स्वतंत्र व्यवस्था आपल्या विद्यार्थ्यांपुरती करावी व काही विषयाबाबत असे अभ्यासक्रमाचे लचके तोडता येत नसतील तर तो विभाग परदेशी विद्यार्थ्यांपुरता प्रवेशासाठीच बंद करावा. प्रवेश द्यावयाचा व नंतर निर्बंध तेही ज्ञानग्रहणासाठी घालावयाचे हे योग्य नाही. विद्यापीठात शिक्षण घेताना देशी व परदेशी असा भेदभाव करून ज्ञानाची कवाडे विद्यार्थ्यांना बंद करता येणार नाहीत,- असे काही विद्यापीठांना वाटते हे अगदी बरोबर आहे. शिक्षणदानाचे पवित्र कार्य करणाऱ्या संस्थांना राजकारणाचे सोयरसुतक बाळगण्याचे काहीच कारण नाही. अमेरिका व चीन यांच्या करारानुसार चीनचे २,७७० व अमेरिकेचे मात्र फक्त २४० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. हा दोष कोणाचा? विद्यार्थ्यांचे अभ्यासक्रम, त्यांचे वाचन, संशोधन, त्यांच्या हालचाली यांच्यावर लक्ष ठेवून त्यासंबंधी पोलिस अहवाल हा तर खुळचटपणाचा कळसच. राष्ट्राची सुरक्षिवता महत्त्वाची त्याबद्दल दुमत नाही, पण प्रवेश देऊन निर्बंध घालणे चूकीचे होय. याबाबतचा इंटरनॅशनल हेरल्ड ट्रिब्यूनचा 'ज्ञानाभोवती भिंत घालणे, म्हणजे फुलाचे रक्षण करण्यासाठी सूर्याला झाकण्यासारखेच आहे.' हा अभिप्राय पुरेसा बोलका आहे.

दै. सकाळ, पुणे २९–१२–८१ प्रा. वि. आ. शेख; फलटण.

मरावे परी नेत्ररूपी उरावे

आकाशवाणी पुणे केंद्रावरून रविवारी 'गृहिणी'मध्ये अपंगत्वावर मात या मालेतील 'नवी दृष्टी' ही इंदूमती राव यांची मुलाखत ऐकली. ती उद्‌बोधक व नवी माहिती देणारी मार्गदर्शक वाटली. नेत्रदानाविषयी मनात असलेले गैरसमज दूर झाले. मेल्यानंतर आपले डोळे दुसऱ्या अंध व्यक्तीला देऊन डोळ्याच्या रूपाने

प्रत्येकाला मागे राहता येणार आहे. आज शेकडो अंध व्यक्ती काळ्याकुट्ट अंधारात आपल्या मरणोत्तर नेत्राची मोठ्या आशेने वाट पहात आहेत. पण आपल्या समाजाला अजूनही नेत्रदानाचे महत्त्व पटलेले नाही. ही दुर्देवाची व खेदाची गोष्ट आहे. तरी सूज्ञ व जागृत बंधू-भगिनींनी, सेवाभावी संस्थांनी, महिला मंडळांनी यासाठी संघटित होऊन लोकजागृती. केल्यास खचितच अनेक अंध व्यक्तींच्या जीवनात प्रकाशाचे किरण दिसतील.

दै. तरूण भारत, पुणे — जयनंदा शंकरदेव देशमुख आटपाडी (सांगली)


सरकार मांढरदेवीच्या हजारो भक्तांची गैरसोय दूर करील काय ?

पुणे स्वारगेट ते अंबाखिड पर्यंत एस. टी. सुरू झाल्या आहेत. परंतु त्यानंतर हजारो भक्तांना (भाविकांना) हे सात वळणावळणाचे डोंगर शिखर चढून जाणे फार त्रासाचे व जिवाला धोक्याचे आहे. मांढरगांव तालुका वाई. जि. सातारा इथे श्री. माढरदेवी (श्री काळूबाई) देवीच्या जत्रेसाठी दरवर्षी लाखो भाविक आपल्या बायका-मुलांसह देवीच्या दर्शनास येत जात असतात. हजारो भाविकांची ही कुळदैवत आहे. त्यासाठी महाराष्ट्र सरकारने १) मांढरगावातून एस. टी. देवीच्या मंदिराच्या पायथ्याशी सुरू करावी. ती एस. टी. स्वारगेट पुण ते वाईगाव वाईगाव ते मांढरगांव (माढरदेवी) पर्यंत सुरू करावी. २) मांढरगांवात एक मोठा पाण्याचा हौद (विहिर) आहे. त्याचे पाणी मांढरगांवात व देवीच्या यात्रेकरूसाठी ५ रुपये प्रमाणे एक डबा विकत दिले जाते. हजारो गरजू भाविक लोक अडणीसाठी नैवेद्य करणे, आंघोळ करणे व पिण्यासाठी ते घेत असतात. आणि हे पाणी इतके गढूळ असते. व घाण असते. त्यापासून भाविकांना रोग होण्याच संभव आहे· त्यासाठी या हौदात (विहिरीत) जंतुनाशक पावडर टाकून पाणी स्वच्छ करावे तर देवीच्या भक्तांसाठी वाई गावातून कृष्णा नदीच्या पात्रातून स्वच्छ पाणीपुरवठा पाईपाने करण्यात यावा अथवा देवीच्या मंदीराजवळ एक मोठी स्वच्छ पाण्याची टाकी बांधण्यात यावी. ३) जत्रेच्या दिवशी संरक्षणदल मजबूत असावे चोर दरोडेखोर पाकिटमार असे. अनेक लोकही येत-जात असतात, त्यासाठी भाविकांना संरक्षण मिळावे यासाठी जास्त प्रमाणात पोलिसदल ठेवण्यात यावे. या तीन अत्यंत आवश्यक सोयी श्री. मांढदेवीच्या (श्रा. काळूबाई) यात्रेसाठी महाराष्ट्रशासनाने त्वरीत करून हजारो भाविकांची ही गैरसोय दूर करावी.

दै. सांजशिवनेर, मुंबई १७–३–८२ — श्री. सुर्यकांत पां. खैरे, मुंबई, ५१

पक्षांतर ही लोकशाहींची थट्टामस्करी !

ध्येयनिष्ठ माणसांचा आज कोंडमारा झालेला दिसत आहे. स्वार्थी लोकांची चुरस व चढाओढ यासुळे प्रत्येक पक्षात बजबजपूरी माजली असेच अखिल भारतीय



चित्र आज दिसत आहे.

विशेषत: महाराष्ट्रात हे चित्र फारच भडक व उठून दिसते. कोणत्याही नेत्याला आज निवडणुकीशिवाय कशातच रस नाही. काही मराठी माणसे एकत्र आली की, लगेच त्यांत दोन गट, तीन तट व चार कट होतात, नितिमुल्यांची जाणीव कोणालाच नाही.

ज्या महाराष्ट्रात, म. फुले, डॉ. आंबेडकर, वि. रा. शिंदे व आगरकर यांनी समाज सुधारणेची मशाल पेटवली तिचा थोडाही प्रकाश महाराष्ट्रांत उरलेला दिसत नाही. बुद्धीवादी मंत्र, समतासागर मानवतावाद, जातपात तोडमंडळ,निधर्मी संघटना, हुंडा विरोधी चळवळ या नुसत्या वाचण्यांत येतात. हुंडा प्रतिबंधक कायदा करण्याची सरकारवर पाळी यावी हे कशाचे लक्षण ?

बलात्कार चालूच आहेत मंगळसुत्रे भर रस्त्यात तुटत आहेत रेल्वेत खून होतात, गाडया अडवून प्रवाशांना लुटण्यात येते हे प्रकार नित्याचेच झाले आले आहेत यांचा विचार शासनापेक्षा नेत्यांनीच केला पाहिजे. शासन काही लोकांना सांगत नाही की, जा बलात्कार करून या ४।५ तरी मंगळसूत्रे तोडून या मग हे असे का होते ? इकडे कोणाचेच लक्ष नाही.

आश्यर्य असे, की केवळ लोकशाही टिकवण्याकरिताच पक्षांतर होत आहे. पक्षांत पूर्वीही तीच घोषणा लोकशाही धोक्यांत आहे निवडून आल्यानंतर ? लोकशाही धोक्यांत आहे ! ज्या मतदारांनी (इं.) कॉंग्रेस विरोधी निवडून आणले ते सारे आपले भराभरा पुन्हा (इं.) कॉंग्रेसमध्ये कारणकाय, लोकशाही करिता ? जे काही चालले आहे त्याला जनता फसत आहे ? पण मग हे असे का व्हावे ? नागरिकांनी जरा आत्मपरिक्षण करावे, व सरळ समाजसुधारण्याचा मार्ग पत्करावा. पक्षांतर म्हणजे राजकारण नव्हे लोकशाहीची निवळ थट्टा केली जाते.

प्र. श. मराठे वाई

बोदवड मार्गे औरंगाबाद बस हवी

जळगाव– विभागाच्या एस. टी. महामंडळाच्या औरंगाबादला जाणाऱ्या बसेस नेहमी एदलाबाद जळगाव मार्गे औरंगाबादला जातात पण त्यामुळे बोदवड साळशिगी इ. भागातील लोकांच्या दृष्टीने हा मार्ग अधिक खर्चाचा आणि वळणाच्या लांब पल्ल्याचा आहे तेव्हा एखादी बस एदलाबादहून बोदवड मार्गे औरगाबादकडे जाणारी सुरू झाल्यास या भागातील जनतेचा पैसा आणि वेळ बचत होऊन प्रवासाची सोयही होईल. आता बोदवड जामनेर मार्गातील सूर नदीवर पक्का पूल बांधण्यात आलेला असून तो चार महिन्यापासून वाहतुकीस खुला झालेला आहे तेव्हा जळगाव विभागाचे एस. टी. महामंडळाचे संबंधित वरिष्ठ अधिकारी या

गोष्टीकडे त्वरेने लक्ष घालून या भागातील जनतेची गैर सोय दूर करतील काय ?

दै. बातमीदार १८-६-८३ जळगांव बाबुराव गंभीर वाणी बोदवड, जळगाव

शेतकऱ्यांची नित्याची डोकेदुखी

गाजर गवताचे गंभीर संकट नाहीसे करण्यासाठी शाळा, कॉलेजे व विद्यापीठे ताबडतोब एक महिन्यासाठी बंद करावीत आणि हे विषारी संकट समूळ उपटून टाकावे अशी आग्रहाची विनंती कृषी विद्यापीठाचे कुलगुरूंनी मुख्यमंत्र्यांना केली आहे. ही विनंती स्वागतार्ह व आनंदाची आहे. आज ग्रामीण विभागात विशेषत: जिरायतीव बागायती शेतात गाजर गवताचे निरंकुश साम्राज्य आहे. हे गाजर गवत शेतकऱ्यांचा एक नंबरचा शत्रू असून ते नित्याची डोकेदुखी आहे. शेतकऱ्यांच्या समस्यांबाबत मुख्यमंत्र्यांचं धोरण उदार व प्रेमाचे आहे. त्याचप्रमाणे त्यांनी अनेक धाडसी व महत्त्वपूर्ण निर्णय घेतलेत. तरी कुलगुरूंनी केलेल्या विनंतीचा सहानभूतीपूर्वक विचार व्हावा ही अपेक्षा !

दै. तरुण भारत, पुणे —जयनंदा शंकरदेव देशमुख आटपाडी (सांगली)

खेळाडूंच्या मार्क्सच्या सवलती बंद करा !

दि. ९ एप्रिलच्या अंकात मार्क्स खेळाडूंना अगदी उलट विचार असे–

आधीच मेडिकल व इंजिनिअरिंगच्या प्रवेशाच्या वेळी खेळाडूंना मार्क्स मिळतात म्हणून आपल्या पाल्याचा कसेही करून कुठल्या ना खेळात (केवळ उभे राहण्यापुरता का होईना ?) समावेश व्हावा म्हणून पालक लोक धावपळ करतात. आय. टी. आय., प्राचार्य, जिल्हा क्रीडा अधिकारी व पालक या चौघाची 'खेळ सर्कस सुरू असते. सर्व बाजूंनी 'वजन' आणले जाते. एखाद्या खेळात खेळाडू केवळ उभा राहून २, ४, ५ विरूद्ध चमूला 'वॉक ओव्हर' देतो व 'ॲक्चुअली प्लेड'चा शिक्का लावून घेतो. यावेळी त्याच्यासाठी खऱ्या अर्थाने खेळलेले असतात ते खेळ शिक्षक, पालक व प्राचार्य. हे मी कित्येक सामन्यातून पंच राहून अनुभवले आहे.

हे सर्व का होते ? तर खेळाडू (?) ला वरील शाखत प्रवेशाच्या वेळी ज्यादा मार्क्स दिले जातात म्हणून जर हे मार्क्स बंद झाले तर खेळाडूला खेळ अनिवार्य होणार नाही. मग ते खरे हाडाचे खेळाडू आहेत. त्याचाच चमूमधून भरणा राहील. आणि जर पत्रलेखकाने लिहिल्याप्रमाणे ग्रेसचे मार्क्स दिले तर नक्कीच 'सर्कस' अधिक तीव्रतेने खेळली जाईल.

मार्क्स नाही, म्हणजे चमूत खऱ्या खेळाडूंचा (खेळांसाठी खेळ म्हणून खेळणाऱ्या, मार्क्ससाठी खेळ म्हणून नव्हे) समावेश राहील व अशावेळी द्यायचेच झाले तर संबंधितांनी त्यांना भिजवलेले चणे, अंडी, दूध (भजी, आलुबोंडे नव्हे) इ.

पौष्टिक पदार्थ द्यावेत. मार्क्स देवून खेळाचे, महाविद्यालयाच्या (व पर्यायाने राज्याच्या व देशाच्या) खेळमास्तरांचे भले होणार नाही.

–गोविंद कासट अमरावती.

इंदिराजी युनोत हिंदीतून बोलतील का ?

संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेमध्ये भारताच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांचे दिनांक २८ सप्टेंबर १९८३ रोजी भाषण होणार आहे असे वाचण्यात आले आहे. सदरहू भाषण हे भारतीय राष्ट्रभाषा हिंदीतून देतील अशी अपेक्षा आहे. भा. ज. प. चे अध्यक्ष खासदार श्री. अटलबिहारी वाजपेयी यांनी हिंदीतून भाषण यापूर्वी दिलेले आहे. दि. १४ सप्टेंबर हा फक्त हिंदी दिन पाळला जातो. हिंदी भाषेला शासकीय व्यवहारात मान व स्थान मिळवून देण्याकरता भारताच्या पंतप्रधानांनी आमसभेत हिंदीतून भाषण देऊन हिंदीला राजाश्रय मिळवून द्यावा. हिंदीप्रेमी भारतीयांनी देशाच्या पंतप्रधानांना पत्र पाठवून आमसभेत हिंदीतून भाषण करण्याची लेखी विनंती करावी व त्याकामी हिंदीप्रेमींनी पुढाकार घ्यावा अशी विनंती आहे.

दै. तरूणभारत १९–९–८३ –सुहास मुंगळे (मास्तर) पुणे

इंग्रजीचे विकृत अनुकरण

सर्वसामान्यपणे 'उच्चार सुलभता' आणि 'प्रयत्नलाघवता' यासाठी शब्द-विस्ताराचा शब्दसंक्षेप केला जातो. जसे, 'महानगरपालिका'चा 'मनपा' 'भारतीय जनता पक्षा'चा 'भाजप' आणि इंग्रजीतील 'बॉम्बे म्युनिसिपल कॉर्पोरेशन'चा 'बी. एम. सी.' पण आज इंग्रजीचे वारे शिरलेल्या डोक्यातून शब्दांचा विस्तार संक्षिप्त करण्याची एक विचित्र टूम निघालेली आहे. उदा. इंग्रजीतील 'कमांड एरिया डेव्हलपमेन्ट ॲथॉरिटी' (सिंचनक्षेत्र विकास प्राधिकरण) चे 'कडा' (महाराष्ट्र शासनाचे एक खाते) आणि दिल्ली येथे नुकत्याच होऊन गेलेल्या 'नॉन अलाइण्ड मुव्हमेन्ट' (अलिप्तवादी चळवळ)चे 'नाम' झाले आहे.

सर्वसामान्य माणसाला उल्लेखित 'कडा' म्हणजे डोंगरकडचाच्या संदर्भातील एखादे नवीन खाते, आणि 'नाम' म्हणजे नाव या 'नामाचा गजर' असे वाटल्यास नवल नाही. परंतु हे खरे नाही. हे शब्द म्हणजे 'भाषा व अर्थ' या दृष्टीने नितांत गल्लत करणारे आहेत. इथे इंग्रजी शब्दविस्ताराची त्या शब्दांतील अद्याक्षरे घेऊन केलेली शब्दनिर्मिती ही भाषेची भयानक विकृती आहे. त्याहीपेक्षा अशा शब्दांची 'मराठी'त होणारी घुसखोरी मोठी अघोरी आहे.

उद्या याच धर्तीवर 'फायनन्स ऑफिसर'चा 'फो' 'हेल्थ ऑफिसर'चा 'हो'

'मेंबर ऑफ 'मोला' स्लॅटिव्ह असेंब्ली'चा 'मोला' (मोळा) आणि 'गव्हर्नर ऑफ महाराष्ट्र'चा 'गोम' अशी मराठी भाषेशी व्याभिचार करणारी अनर्थक शब्दपैदास होऊ शकते.

तेव्हा इंग्रजीने प्रसवलेल्या या भाषाविकृतीला आवर घातला पाहिजे.

दै. नवशक्ती दि. २२ एप्रिल १९८३ –रघुनाथ पां. शिरकार, मुंबई.

एक सामाजिक जाणीव "पोस्टमन आपला सच्चा मित्र"

घरोघरी ज्या व्यक्तीची प्रतिदिनी अगदी आतुरतेने वाट पाहिली जाते अशी व्यक्ती म्हणजे पोस्टमन. खरे तर सर्वांचा सच्चा मित्र तोच. त्याच्या कामाचा भार हलका व्हावा म्हणून आपण किती काळजी घेतो ? काही साध्या साध्या बाबतीत आपण स्वारस्य घेतले तर हाच पोस्टमन आपणास अधिक तत्परतेने अधिक आस्थेने सेवा देऊ शकेल. याबाबतीत उद्योगधंदे, समाजसेवी संस्था, शासन, पोस्ट खाते वगैरेंनी जाहिराती, भित्तीपत्रे, स्टिकर्स वा लेखनाद्वारे समाजप्रबोधन केल्यास थोड्या कालावधीत योग्य ती जागृती होऊ शकेल. उदाहरणार्थ खालील आशयाचा संदेश सर्वत्र पोचविल्यास याच पोस्टमनचे काम कितीतरी सुलभ होईल.

१) उत्तम पोस्टसेवेसाठी पत्रावर पूर्ण पत्ता सुवाच्च अक्षरात लिहा.

२) पिनकोड न विसरता टाका. त्यामुळे तुमचेच पत्र अधिक जलद पोचेल.

३) आपल्या घराच्या प्रवेशद्वारावर आपले नाव व पत्ता ठळक दिसेल असा लावा व पत्रव्यवहाराचा आपला अचूक व पूर्ण पत्ता इतरांना सांगा.

४) आपण वरच्या मजल्यावर रहात असाल तर तळमजल्यावर एक पत्र पेटी ठेवा.

५) पोस्टमनला आपल्या दाराशी कमीतकमी वेळ तिष्ठत ठेवा.

६) आपण परगावी जात असल्यास पोस्टाला पूर्वसूचना द्या.

७) आपल्या पाळीव प्राण्यांचा विशेषतः कुत्र्याचा पोस्टमनला उपद्रव होणार नाही याची काळजी घ्या.

८) पोस्टमन हा आपला मित्र आहे.

या साध्या गोष्टींची काळजी घेणे आपणास अशक्य आहे काय ? मग 'शुभस्य शीघ्रम.

दै. जिव्हाळा, सातारा, ९।२।८४ –सुधीर राशिंगकर, पुणे.

अपंगांच्या अडचणी कायम

दोन वर्षांपूर्वी केंद्र शासनाच्या वतीने आंतरराष्ट्रीय अपंगवर्ष मोठ्या उत्साहाने देशभर साजरे करण्यात आले. तदनंतर सरकारने पुढील पाच वर्षे अपंगांना

ऊर्जितावस्था प्राप्त होण्यासाठी काही विशेष कार्यक्रम जाहीर करण्यात आले. या कार्यक्रमांपैकी अपंगांच्या आर्थिक पुनर्वसनासाठी स्वयंउद्योग अवलंबनासाठी राष्ट्रायीकृत बँकामार्फत सहा हजार रुपयांपर्यंत कर्ज देण्यात येते. हे कर्ज दिल्यानंतर त्याची परतफेड होण्यासाठी अपंगांना आपला उद्योग व्यवसाय चालू रहाण्यासाठी अनेक तऱ्हेचे परवाने तथा इतर शासकीय नियमांच्या पूर्ततेसाठी ज्या अनंत अडीअडचणी निर्माण होतात किंवा केल्या जातात त्यांचे निरसन करण्यासाठी शासन केव्हा लक्ष देणार ?

केसरी २०–१०–८३ हरिभाऊ शिंदे, पुणे.

वाहनांवर नियंत्रण एक सूचना

भरभाव जाणाऱ्या वाहनांवर नियंत्रण आवश्यक का आहे हे पटविणारी फुगेवाडी येथील घटना बोलकी आहे. फुगेवाडी येथे बेदरकार वाहन चालकांच्या आपापसात भरधाव वेगाने चालवण्याच्या शर्यतीने तेथील रहिवाशांचा राग दि. २३–८–८२ रोजी घडलेल्या अपघाताने अनावर झाला. संताप उफाळला, दंगल झाली त्यात मोठी हानी झाली. तथापि सर्वसामान्यांच्या हितासाठी अशा घटनांना आळा कसा बसेल हे पाहणे आवश्यक आहे. घडण्यापूर्वी ती कशी टाळता येईल आणि त्याबद्दल कोणती खबरदारी घेणे आवश्यक हे पाहिले पाहिजे. कारण अशा घटनांनी नुकसान अखेर सोसावे लागते ते सामान्यांना. त्याच्या जिवीतास धोका पोहोचू नये म्हणून सदैव अपघात घडणारी ठिकाणे, वळणे, भरगच्च रहदारीचे रस्ते, रात्री ज्या ठिकाणी प्रकाश कमी आहे अशी ठिकाणं निवडून त्या ठिकाणी सावधानतेचा इशारा देणारे दिवे (Caution Lamp) आणि रात्रीसाठी पथके (Caution Unit) सदैव ठेऊन पोलीस (वाहतूक नियंत्रण) खात्याने योजना हाती घ्यावी आणि मदतीला होमगार्डस, सिव्हिल डिफेन्स स्काऊट आर. एस. पी., रेडक्रॉस, रोटरी क्लब, सेवाभावी संस्था इत्यादींची मदत घेतल्यास पोलीस खात्यावर पडणारा ताण कमी होईल. मात्र यासाठी प्रत्येक खात्याच्या अंदाजपत्रकावर थोडाफार जादा बोजा पडणार आहे तो शासनाला सहन करणे आवश्यक आहे. कारण तो जादा खर्च अपघातात होणारी जीवित हानी आणि मालमत्तेचा होणारा या योजनेवर कितीतरी कमी होणार आहे. या नित्रंत्रणामुळे सामाजिक जीवन सुरळीत, सुरक्षित आणि सुखमय होणार आहे.

नियंत्रणाबरोबर उल्लंघन आलेच. आज नियमाचे पालन करण्यापेक्षा त्यांचे उल्लंघन करण्याची प्रवृत्ती जास्त बळावत आहे. कारण राज्य आपलेच आहे हे असे चालायचेच अशी समजूत असते. म्हणून अपघात टाळण्यासाठी खालील योजना राबविल्यास बरे.

१) वरील उल्लेखलेल्या ठिकाणी वेगमर्यादेचा फलक लावणे तसेच त्याबद्दलची माहिती राजपत्रात व स्थानिक वृत्तपत्रात जाहीर करणे म्हणजे ही योजना माहीत नाही. ही भूमिका नियमाचे उल्लंघन करणाऱ्याला घेता येणार नाही.

२) वेगमर्यादेचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांचा वाहनचालक परवाना वरील पथकाच्या प्रमुखाने तात्काळ काढून घेऊन संबंधित अधिकाऱ्याकडे पाठविणे. त्यावर योग्य ती कारवाई करणे हे संबंधित अधिकाऱ्यावर बंधनकारक राहील.

तथापि अनवधानाने एखादा अपघात घडला तर त्यातील जखमींची देखभाल करणे, दवाखान्यात पाठविणे यासाठी प्रत्येक पथकाबरोबर एक प्रथमोचार पथक असणे आवश्यक. म्हणजे त्याकरिता लागणारा पोलीस खात्याचा वेळ वाचेल आणि त्याचे नित्याचे कार्य सुकर होईल. या योजनेमुळे सर्वांना दिलासा मिळेल आणि अशा घटनांना आळा बसेल ही अपेक्षा.

दै. प्रभात ९–२–८२ –मु. दा. कुलकर्णी, पुणे ३०.

लक्ष्मी रोड वाचवा, वाचवा

पुणे शहराची वाढती लोकवस्तीमुळे पुणे शहर वाढले आहे. रोडवरून पायी चालणेसुद्धा एक डोकेदुखी झाली आहे. त्यामुळे शहरात अपघाताचे प्रमाण फारच वाढले आहे. म्हणून पुण्याच्या आयुक्तांनी एक योजना तयार केली आहे.

याआधी पुढील विचार करावयास पाहिजे. पायी चालणारांना फूटपाथ रिकामा पाहिजे. ती कधी खुली नसती. सर्व लहान धंदे करणारे आपले दुकान मांडून बसत असतात. तर काही ठिकाणी हातगाडीवाले गाडी घेऊन उभे असतात. त्यामुळे पायी चालणारांना नीट चालता येत नाही. शिवाय रोड लहान असल्याने रोडवरून वाहने चालवण्यास त्रास होतो व त्यामुळे अपघातांची मोठी भीती आहे. म्हणून महानगरपालिकेने दुपारी ५ ते ९ पर्यंत या रोडवर त्यांना बंदी करावी व काही भागात एकेरी वाहतूक करून अपघात टाळावेत. शिवाय वाहनाकरिता पार्क जवळच्या बोळात करावे म्हणजे रोडवर जागा खुली राहील व पायी चालणारे व वाहने यांना जागा मिळेल. फूटपाथ रिकामे असल्याने पादचारी वरून जातील. व रोडही खुला राहील. यामुळे लक्ष्मीरोडवरील अपघात कमी होतील व हजारोंचे प्राण वाचतील.

दै. सांजसमाचार १८–५–८२ काशिनाथ नि. मुळे, पुणे.

गॅसधारक 'गॅसवर'

'गॅसवितरणात शिस्त हवी' (केसरी, दि. ७ सप्टेंबर) हे पत्र वाचले. कदाचित त्यांचे गॅसवितरक बरेच साळसूद दसतात. सर्वसाधारण अनुभव असा

आहे की धारकांचे रजिस्टर वितरक ठेवतात, नोंदविणाऱ्यांना नंबरदेखील देतात. परंतु पुढे त्यांना कोणी विचारणारे (?) नसल्यामुळे रजिस्टर व नंबर एक फार्स होऊन राहतो. मर्जीनुसार गॅसवितरण केले जात आहे. फार झाले तर धारकांना स्वखर्चाने, धोका पत्करून वितरकांकडून गॅस घेऊन जाण्यास सांगितले जाते. हे दृश्य कोणत्याही वितरकाकडे केव्हाही पाहायला मिळू शकेल. धारक रिक्षा, स्कूटर्स सायकलीवरून रिकामे सिलेंडर्स आणून बदलून नेत आहेत. पोलिसही अशा अडलेल्या नागरिकांकडे सहानुभूतीच्या दृष्टीने दुर्लक्ष करतात. धारक सहनशील असेल व एक-दीड महिना महिना गॅस सिलेंडरसाठी नोंदणीनंतर थांबला तर गॅस घेऊन येणारे कर्मचारी, गरजेनुसार रु. ५–१०–१५ घेऊन इतर धारकांना परस्पर सिलेंडर्स देतात व धारकांच्या घरी कोणी नसल्याचे वा इतर सबबी सांगतात व परत नवीन नंबरप्रमाणे गॅस पुरवतात. असे दोन ते अडीच महिनेदेखील धारकाला गॅसअभावी 'गॅसवर' राहावे लागते. आमच्या एका मित्राचा अनुभव असा आहे की, गॅस कंपनीच्या पुण्यातील प्रमुख कार्यालयाला फोन करून "आमच्या नंतरच्या नोंदविणाऱ्यांना (रजिस्टरप्रमाणेदेखील) वितरण झाले आहे. चोवीस तासात गॅस सिलेंडर घरी न आल्यास रजिस्टर जप्त करू, पोलीस तक्रार करू', सांगितल्यावर चक्रे फिरली व चोवीस तासात गॅस सिलेंडर घरपोच करण्यात आला. सर्वांना हे शक्य आहे का ? व हे आवश्यक कशासाठी असावे ? रजिस्टरची नियमित तपासणी, गॅसधारकांच्या तक्रारींची दखल, कंपनीकडून, पोलिसांकडून यांची व्यवस्था कायम स्वरूपात व्हावी. तपासणी पथकांची योजनादेखील करता येईल.

दै. केसरी, दि. १२–९–८३ — जुगल सी. राठी, पुणे,

धोक्याची साखळी : एक संस्मरण

हनुमान जयंतीची महत्त्वाची वार्ता म्हणजे सांगली–मिरज–कोल्हापूर रेल्वे डब्यातील धोक्याच्या साखळीचे उच्चाटन. अलीकडे बहुजन स्वातंत्र्याच्या जमान्यात रेल्वे डब्यातील चेन मनमानी खेचण्याचे अनंत प्रकार होऊ लागले. दंड रु. ५० या नियमास कुणी जुमानेनात. तेव्हा शासनानेच साखळीचीच गच्छंती केली. आता या निमित्ताने पूर्वीचा जमाना न आठवला तरच नवल. त्या काळी लोक किती शिस्तीने वागत ते पाहण्यासारखे आहे. फालतू कारणापायी साखळी न ओढणे व रेल्वेचा खोळंबा न करणे, हा तो प्रामाणिक हेतू असे. संस्थांनी राजाराम कॉलेजातील ब्रिटिश प्रोफेसर मिरज ते कोल्हापूर हा प्रवास करीत असता ते दरवाज्यात उभे राहून सृष्टीशोभा पाहत होते. मध्येच त्यांची हॅट उडाली व वाऱ्याबरोबर वाहत गेली. प्रोफेसर विचलीत झाले नाहीत. गाडी स्टेशनवर थांबताच त्यांनी स्टेशन मास्तरकडे टेलिग्राम पोलवर रंगवलेला नंबर लिहून दिला.

परत ते गाडीत चढले व गाडी कोल्हापूरच्या दिशेने धावू लागली. दुसऱ्या दिवशी रेल्वे सेवकाने प्रोफेसरांच्या बंगल्यावर त्यांची हँट आणून दिली. या प्रसंगावरून ब्रिटिशांची शिस्त, समयसूचकता व जनतेला त्रास न देण्याची प्रवृत्ती स्पष्ट होते. गेल्या दोन तीन वर्षांत मंत्री डब्यात चढू शकले नाहीत म्हणून गाडी उशिरा सोडल्याच्या वार्ता छापून आल्या होत्या. आता बोला !

दै. मराठा २९–४–८१ –गो. शं. हुजूरबाजार, मुंबई.

सूर्यनारायण जेव्हा नारायणीचे दर्शन घेतो !

कोल्हापूरनगरीच्या सभोवती नवदुर्गांची देवालये विखुरली आहेत. करवीर-नगरीचा मध्यबिंदू अर्थात श्रीजगदंबा मंदिरच. हे शिल्प इसवीसनापूर्वी तिसऱ्या शतकातील. या चार हाताच्या देवीच्या एका हाताचा वज्रलेप २५ वर्षांपूर्वी झाला, अन्यथा मूर्ती निकोप आहे, कार्तिक पौर्णिमेस देवालयाची तीन शिखरे तेलाच्या पणत्यांनी उजळतात. सप्तमीस (रवि. दि. ९) सूर्याची किरणे मावळत असता श्रीमूर्तीच्या पायांना स्पर्श करतात. पुढील दोन सायंकाळी मूर्ती अधिकाधिक संपूर्ण-पणे सूर्यप्रकाशित होते. त्यानंतर 'नारायणि नमोऽस्तु ते' असे म्हणून सूर्यनारायण वर्षभर दर्शनोत्सुकच राहतो तो राहतो. या वर्षी मी स्वत: दुर्बिणीतून हा चमत्कारच पाहिला. दृष्टी धन्य झाली !

दै. नवशक्ति, मुंबई –गो. शं. हुजुरबाजार, मुंबई.

"सेवानिवृत्तीनंतर 'त्यांचे' जीवन चालते तरी कसे" हा ता. ३ सप्टेंबरच्या 'स्वराज्यातील' लेख वाचला. त्यातील मुलाखतीमधील विचार अनुकरणीय वाटले. सर्वचजण नोकरी करतात असे नाही. सरकारी नोकरीशिवाय निमसरकारी, खासगी अशाही नोकऱ्या असतात. व्यावसायिक मात्र शारीरिक दुर्बलता येईपावेतो निवृत्त होत नाही. आर्थिक सुस्थिती ज्यांची चांगली असेल त्या सेवानिवृत्तांना समाजकार्याकरिता खूप वेळ देता येईल. याबाबतीत रा. स्व. संघातील निवृत्तांचे एक चांगले उदाहरण मला समजले. महाराष्ट्रातील एका जिल्हयाच्या गावी अशा निवृत्तांची संघटना आहे. ही मंडळी त्या त्या भागात गटागटाने घरोघर जातात, ज्या घरातील स्त्री–पुरुष दोघेही नोकरी करतात तेथील वृद्धांची व लहान मुलांची विचारपूस करतात. त्यांना एकप्रकारचा आधार देतात. विभक्त कुटुंबात अशा प्रकारच्या आधाराचे फार महत्त्व वाटते ही देखील एक समाजसेवाच आहे.

सा. स्वराज्य १० सप्टेंबर ८३ –तात्या फडके, पुणे.

यात्रेकरूंबद्दलचा गैरसमज

आपल्या ता. १७ नोव्हेंबरच्या पत्रव्यवहारात 'वाऽरे विठ्ठल भक्त' या

मथळ्याखाली प्रसिद्ध झालेले पत्र वाचले. पत्रलेखकांचा यात्रेकरूंबद्दल बराच गैरसमज झालेला दिसतो. पत्रलेखकाने यात्रेकरूंना हुल्लडबाजी माजविणारे महाभाग असेही म्हटलेले आहे ते चूक आहे. बिचारे यात्रेकरू रात्रंदिवस थंडीचीही पर्वा न करता पांडुरंगाच्या दर्शनासाठी बारीत बसलेले असतात. ते काही हुल्लडबाजी करण्याकरिता नव्हे ! रात्रंदिवस थंडीचा त्रास सहन करून बडवे मंडळींच्या वशिलेबाजीमुळे 'बडव्या माणसांची' दर्शने घडणार असली तरी कोणताही अशिक्षित माणूस गप्प बसणार नाही. त्यांच्याजवळ पैसा नाही म्हणून त्यांनी कोणा कडूनही त्रास सहन करून घ्यावा ? इतक्या वर्षांत हुल्लडबाजीचे असले प्रकार किती वेळा झाले ते फक्त परमेश्वरालाच माहीत. पंढरीस जाणाऱ्या यात्रेकरूंना बडवे मंडळींकडून दिली जाणारी निर्दय वागणूक प्रत्यक्ष तेथे गेल्याशिवाय दृष्टीस पडणार नाही. पंढरीच्या वारीस जाणारे यात्रेकरू म्हणजे सोज्वळ, मेणांसारखे मऊ निरुपद्रवी असेच असतात, हे लेखकाला कळले नाही.

वै. वामन विष्णू मेहेंदळे, पुणे ३०.

'धर्म' या मानवी संकल्पनेमुळे आजपर्यंत मानवजातीचा जेवढा फायदा झाला असेल त्यापेक्षा शेकडो पटीने नुकसानच झाले आहे हे इतिहासाचा आणि वर्तमानाचाही थोडा अभ्यास केला तरी समजून येईल.

ज्यू विरुद्ध ख्रिश्चन, ख्रिश्चन विरुद्ध मुस्लिम, मुस्लिम विरुद्ध हिंदू, मुस्लिम विरुद्ध ज्यू, असे अनंत झगडे; धर्मामध्ये प्रॉटेस्टंट विरुद्ध कॅथॉलिक, शिया विरुद्ध सुन्नी, शैव विरुद्ध वैष्णव, सवर्ण विरुद्ध अस्पृश्य हे झगडे; पारशी, ज्यू, तिबेटी, नवबौद्ध, बहाई, इस्रायली, दाऊदी बोहरा, यांचा केवळ धार्मिक कारणावरून झालेला व होणारा छळ, प्रत्येक धर्मातील असंख्य वेडगळ अंधश्रद्धा आणि शास्त्रीय व सामाजिक प्रगतीला धर्मश्रद्धांचा सातत्याने होत असणारा विरोध. हे सर्व पाहिल्यावर प्रत्येक शहाण्या माणसाने 'धर्म' ही कल्पनाच झुगारून दिली पाहिजे.

या विचाराशी सहमत असणाऱ्या सर्वांनी आगामी जनगणनेत 'मानव' हा आपला धर्म लिहावा. जन्मधर्म लिहिण्याची सक्ती असल्यास त्या धर्मापुढे 'जन्माने' असे लिहून सध्याचा धर्म 'कोणताच नाही' किंवा 'मानव' असे लिहावे.

मानवाच्या सर्वांगीण प्रगतीकरता 'मानवता' आणि 'विज्ञाननिष्ठा' हाच नव्या युगाचा 'धर्म' मानला पाहिजे.

दै. केसरी. १९८२ डॉ. शरद अभ्यंकर, वाई

वाद असा रंगतो

गोखले हॉल का साडी सेन्टर ?

लक्ष्मी रोडवरचा गोखले हॉल हे एकेकाळी पुण्याचे महत्त्वाचे सांस्कृतिक केंद्र होते. तेथे सभा होणे हे भूषण असे. गोखले हॉलच्या कित्येक सभा एकेकाळी गाजल्या आहेत, पण गेले कित्येक वर्षे येथे काही सांस्कृतिक, सार्वजनिक, सामाजिक वा राजकीय कार्यक्रम झाल्याचे ऐकिवात नाही. हल्ली पाहावे तर या ना त्या निमित्ताने येथे साड्या, कपडे वा अन्य वस्तूंचे 'सेल' लावलेले असतात. पुण्यात आधीच अशा मध्यवर्ती जागा कमी आहेत. मग ज्या व्यवसायाकरिता अन्य जागा मिळू शकतात अशा कापडविक्रीला हा हॉल द्यायचे संस्थेच्या विश्वस्तांनी कधी ठरविले ? हा हॉल कोठल्या उद्देशाने बांधला होता का केवळ पैसा कमविणे हेच ध्येय होते. तसे असेल तर त्याला 'गोखल्यांचे' नाव कशाला द्यायचे ? एखादे 'कापड मार्केट' किंवा असेच काही नाव का नाही ? चॅरिटी कमिशनरांचेही अशा सार्वजनिक संस्था वा न्यायाच्या जागेचे गैरवापर थांबविण्यावर काही नियंत्रण नसते का ? पुण्यातील सार्वजनिक संस्था वा समाजसेवकही अशा गोष्टींकडे कानाडोळा कसे करतात ?

दै. सकाळ २९–९–८३ सुधीर राशिंगकर, पुणे.

गोखले हॉलचें महत्त्व

'गोखले हॉल की साडी सेंटर ?' पत्र वाचले (सकाळ २९–९–८३) पुण्यात आजकाल मध्यवर्ती सार्वजनिक व सांस्कृतिक समारंभास योग्य अशा जागा मिळणे फारच दुरापास्त झाले आहे. त्यामुळे गोखले हॉलसारख्या शहराच्या मध्यवर्ती जागेकडे केवळ पैशाच्या दृष्टीने न पाहता एक समाजसेवा म्हणून पाहिले पाहिजे. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे गुरू नामदार गोपाल कृष्ण गोखले यांच्या नावाचा दुरूपयोग झाल्यासारखे वाटते. चॅरिटी कमिशनर, कलेक्टर व म. न. पा. तसेच विश्वस्त सव्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी यांनी अशा बाबतीत लक्ष घालून या पवित्र वास्तुचे व पुण्यनगरीची शान असलेल्या या 'गोखले हॉल'चे महत्त्व कलंकित करू नये.

दै. सकाळ, ७–१०–८३ हरिभाऊ शिंदे, पुणे.

गोखले हॉलबद्दलच ओरड का ?

लक्ष्मी रोडवरील गोखले हॉलबद्दलची पत्रे वाचली. गोखले हॉलबद्दलचं काही विशिष्ट लोकांची ओरड का ? टिळक स्मारक मंदिराची नवीन वास्तू सर्व

सरकारी मदतीने बांधली. तेथे नाटक–तमाशे चालतात. टिळकांच्या नावाला हे चालते मग गोखल्यांच्याच नावाची ओरड का ? पूर्वी टिळक स्मारक मंदिरात वसंत व्याख्यानमालेची व्याख्याने होत. आता त्यांना जागा का नाही ? अनेक मान्यवर शैक्षणिक संस्थांनी मोठमोठ्या व्यक्तीची नावे देऊन चारी बाजूंनी दुकाने बांधून लग्नाला जागा देऊन उत्पन्न केले आहे. थोडक्या भाडचात कुमठेकर रस्त्या-वरील शिक्षण खात्याचा हॉल मिळतो तो या लोकांना का नको ? महापालिकेचा व इतर संस्थांचेही हॉल आहेत हे ते सांस्कृतिक कार्यक्रमास चालत नाहीत का ? कारण तेथे भाडी भरपूर आहेत. टीकाकारांचा उद्देश थोडक्या भाडचात त्यांना हवा असेल तेव्हा मुख्य रस्त्यावर हॉल उपलब्ध व्हावा हाच दिसतो. हॉलचे भाडे देताना फक्त या लोकांची खळखळ व इतर खर्च मात्र हवे तेवढे. तेव्हा या लोकांनी अशा संस्थांच्या वाढत्या खर्चाचा कधीच विचार केलेला दिसत नाही. नामदार गोखल्यांच्या वेळी हिंद सेवक संघाला जनता उत्स्फूर्त देणग्या देत असे. आजकाल फक्त प्रतिष्ठानलाच देणग्या मिळतात.

दै. सकाळ १५–१०–८३ द. रा. कदम, पुणे.

पुन्हा एकदा गोखले हॉल

'गोखले हॉलबद्दल ओरड का ?' पत्र (सकाळ : १५–१०–८३) वाचले. जास्त श्रोत्यांची सोय व्हावी म्हणून वसंत व्याख्यानमाला टिळक स्मारक मंदिराच्य पटांगणात भरवली जाते. शिवाय टिळक मंदिरात अशिष्ट, अश्लील नाटच–कला प्रयोगांना बंदी आहे. तेथे सदोदित सेल लागत्याचे आठवत नाही. संस्थेचे उत्पन्ना-साठी मोकळचा जागेत दुकाने वा अन्य योग्य मार्गाने पैसा मिळवायला हरकत नाही, पण उद्या एखादी शिक्षणसंस्था पैसा मिळवायचा म्हणून वर्ग बंद करून दुकानाला जागा देईल तर गैर होईल. गोखले हॉलबाहेरील मोकळचा जागेत एखादी कमर्शियल बिल्डिंग बांधून संस्थेसाठी उत्पन्नाची व्यवस्था करता येईल का याचा अवश्य विचार व्हावा. असे केल्याने मूळच्या हॉलचा सामाजिक कार्यासाठी कायम उपयोग करता येईल. बहुतेक सामाजिक सेवाभावी संस्था तुटपुंज्या अशा संकल्पावर काम करतात. त्यांना मोठी भाडी परवडत नाहीत. त्यामुळे गोखले हॉलसारखी मध्यवर्ती वास्तू त्यांना उपलब्ध होण्याने मोठी सोय होऊ शकेल. असे केल्यानेच गोखल्यांचे खरे स्मारक होणार आहे.

दै. सकाळ १९–१०–८३ सौ. नीता मुळे, पुणे.

'अर्थपूजा' व्हावी हे दुर्दैव

गोखले हॉलसंबंधी बऱ्याच पत्रांना सकाळने प्रसिद्धी देऊन एका महत्त्वाच्या

सामाजिक प्रश्नाला तोंड फोडले आहे. 'भारत सेवक समाज' हे नाव धारण करणाऱ्या संस्थेच्या हातून समाजसेवा घडण्याऐवजी 'अर्थपूजा' व्हावी, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. दुसरे म्हणजे विश्वस्तांतर्फे अगर चॅरिटी कमिशनरतर्फे त्यांची बाजू मांडली जाण्याइतकेही सौजन्य नसावे हे आश्चर्यजनक आहे. सार्वजनिक संस्थेबद्दल जनतेच्या मनात किंतु नसावा. संस्थेची बाजूही जनतेसमोर यायला हवी. सेल चालू ठेवणे आवश्यकच असेल तर किमान हॉलचे नाव तरी बदलावे.

दै. सकाळ २८।१०।८३ — सुरेंद्र पाठक, पुणे

गोखले हॉलचा सदुपयोग

एकेकाळी सांस्कृतिक केन्द्र म्हणून प्रसिद्ध असलेला गोखले हॉल आता 'सेल हॉल' झाला आहे. एकूणच तथाकथित सांस्कृतिक कार्यक्रमात लक्षणीय घट झाली आहे. त्यामुळे गोखले हॉल आणि अन्य काही वास्तू 'सेल हॉल' झाल्या तरी विशेष बिघडत नाही. तरीपण चालकांनी या हॉलचे 'कलादालनात' रूपांतर केल्यास कलाप्रेमी नागरिक निश्चितच दुवा देतील. येथेच महाराष्ट्राचे शासकीय ग्रंथालय आहे. तेव्हा कलादालन म्हणून उपयोगात आणला गेल्यास शहरातील एक सांस्कृतिक केन्द्र म्हणून पुन्हा पूर्वीच्याच वैभवाने 'गोखले हॉल' चमकू लागेल.

दै. सकाळ १७।११।८३ नीलकंठ वा. देशपाडे, पुणे.

आयकर पात्र उत्पन्नाची मर्यादा वाढवा !

रुपयाची किंमत जशी घसरत आहे व जसजशी महागाई वाढत आहे तसे हाती येणारे उत्पन्न जीवनावश्यक बाबीसाठी अपुरे पडू लागले आहे. आजच्या किंमतींचा विचार केला असता आयकर आकारणीसाठी आवश्यक किमान उत्पन्नाची मर्यादा २५ हजार रुपयांपर्यन्त वाढवली पाहिजे असे सुचवावेसे वाटते. तूर्तास शासनाला आयकर देणाऱ्या एकंदर व्यक्तींत २५ हजारापेक्षा कमी उत्पन्न असणारांची संख्या फार मोठी असूनही त्यांच्याकडून प्राप्त होणारा आयकर महसूल एकंदर आयकर उत्पन्नाच्या मानाने अगदी कमी आहे.

एका शासकीय प्रकाशनने केलेल्या पाहणीचा निष्कर्ष फार उद्‌बोधक ठरेल. १९८०–८१ साली देशातील १४ लाख ४५ हजार ७०० जणांवर आयकर आकारणी करण्यात आली. २५ हजारापेक्षा कमी उत्पन्न असणारांचे प्रमाण ६६.३ टक्के इतके होते. पण त्यांच्याकडून वसूल झालेल्या आयकराचे प्रमाण एकंदर उत्पन्नात केवळ ८.८ टक्के इतकेच होते.

याउलट २५ हजारापेक्षा अधिक उत्पन्न असणारे आयकर दाते संख्येने ४२.२

टक्के इतके तर त्यांच्याकडून वसूल केले जाणारे उत्पन्न ९०.२ टक्के इतके आहे.

म्हणजे आयकर पात्रतेची मर्यादा २५ हजार करण्याने ६६ टक्के कर दात्यांना सूट मिळणासू आहे. पण त्या बदल्यात शासनाला फार नगण्य उत्पादनाला मुकावे लागणार आहे. शिवाय ही उत्पन्न मर्यादा न्याय्यही ठरणार आहे.

(दै तरुण भारत) २५।१।८४ –जुगल राठी, पुणे

वृत्तपत्र लेखक संघटना, महाराष्ट्रराज्य, पुणे
काही माहिती

वृत्तपत्र व नियतकालिके यांमधून पत्रलेखन करणाऱ्या वृत्तपत्रलेखक–लेखिकांचे दरम्यान परस्पर सलोख्याची–सहकार्याची भावना निर्माण करून ज्वलंत वा दुर्लक्षित विषयांना पत्रांद्वारे वाचा फोडणे, जनतेच्या सूचना, गाऱ्हाणी, तक्रारी संबंधित खात्याकडे पाठविणे, अन्यायविरुद्ध आवाज उठविणे, जनमत जागृत करणे या विविध समाजहितैषि उद्देशाने वृत्तपत्रलेखक संघटना, महाराष्ट्र राज्य पुणे कार्य करत आहे. संघटनेची स्थापना ५ एप्रिल १९८१ रोजी झाली. नोंदणी क्रमांक एम्. ए. एच. १००८ पुणे असा आहे. वृत्तपत्रलेखक हा हौशी पत्रकार आहे, तो समाजजागृतीचा पुरस्कर्ता आहे, स्वत:चा अमूल्य वेळ व पैसा खर्च करून हा समाजसेवक काम करत असतो. यामुळेच वाचकांचा पत्रव्यवहार हे आज सर्व नियतकालिकांचे अविभाज्य अंग बनले आहे. यामागे अशा वृत्तपत्रलेखकांचे परिश्रम कारणीभूत आहेत. वृत्तपत्रलेखकांची ही संघटना कोणतीही. आर्थिक सामाजिक, वा राजकीय लालसा नसलेली परंतु सातत्याने सत्याचा पाठपुरावा करणाऱ्यांची यंत्रणा आहे. याद्वारे समाजाच्या सर्व थरातील, सर्व भागातील समविचारी मंडळींनी एकत्र यावे, विविध विषयांवर चर्चा करावी, अडीअडचणींचा विचार करावा, आपला लेखनाचा दर्जा वाढवावा व या सर्वांद्वारे एक अभ्यासू नागरिक व आदर्श समाजवार्ताहर निर्माण व्हावा हा संघटनेचा प्रयत्न असून अशा समविचारी लेखकांना एकत्र आणण्यास कार्य संघटना करत आहे. एका प्रकारे संघटनेचा उपयोग एक समान व्यासपीठ म्हणून व्हावा असा प्रयत्न आहे.

संघटना ही नोंदणीकृत आहे. संघटनेचे कार्यकारी मंडळ संघटनेचा दैनंदिन कारभार चालविते. हे मंडळ सर्व सभासद निवडतात. संघटनेतर्फे जिल्हावार प्रतिनिधी नेमले जातात व त्यांचेमार्फत त्या त्या जिल्ह्यातील लेखकांशी संबंध ठेवला जातो. याशिवाय संघटनेतर्फे एक सल्लागार मंडळही निवडलेले असते. ते त्यात विविध प्रथितयश दैनिकांचे संपादकवा सहसंपादक असतात. हे मंडळ संघटनेच्या कार्यक्रमात बहुमोल सल्ला देण्याचे कार्य करेते.

संघटनेतर्फे विविध वृत्तपत्रे, नियतकालिके, सरकारी वा अन्य सेवाखाती

यांचेही सुसंवाद राखण्याचा प्रयत्न केला जातो. त्यासाठी अशा संस्थांना भटी देणे, अधिकाऱ्यांशी चर्चा करणे वा त्यांना संघटनेच्या मासिक बैठकांना बोलावणे वगैरे कार्ये केली जातात. त्याशिवाय सभासदांच्या प्रसिद्ध अप्रसिद्ध पत्रांवर मासिक बैठकीत विचारविनिमय होतो. विविध बिषयांवर तज्ज्ञांची व्याख्याने वा परिसंवाद आयोजित केले जातात. दरवर्षी लेखकांचे शिबीरही घेतले जाते. लेखकांच्या लेखनाचा दर्जा वाढावा या दृष्टीने गेली दोन वर्षे पुणे विद्यापीठाच्या वृत्तपत्र विद्याविभागाच्या सहकार्याने अभ्यासवर्ग घेतले गेले असून यापुढेही असे वर्ग घेतले जातील. दरवर्षी लेखकांची उत्कृष्ट वृत्तपत्रलेखक स्पर्धा संघटनेतर्फे घेतली जाते तर उत्कृष्ट वृत्तपत्रलेखक सभासद ढाल देण्याची पद्धतही चालू करण्यात आली आहे. या सर्वांमागील उद्देश लेखकांचा लेखनदर्जा वाढविणे व संयुक्त प्रयत्नांतून सामाजिक समस्या सोडविण्याचा प्रयत्न करणे हाच आहे.

वृत्तपत्रात लेखन करत असलेल्या किंवा करायची इच्छा असलेल्या कोणाही व्यक्तीस वृत्तपत्रलेखक संघटना, महाराष्ट्रराज्य, पुणेचे सभासद होता येईल. त्यासाठी संघटनेच्या नियमांचे व घटनेचे पालन करण्याचे बंधन मात्र पाळावे लागेल. सभासद नोंदणी वा अधिक माहितीसाठी खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

वृत्तपत्रलेखक संघटना, महाराष्ट्र राज्य पुणे
३३६ नारायण पेठ, मोदी गणपती जवळ
पुणे ४११०३०
दूरध्वनी ५५१६२।३२०९७

REFBK-0024324

मराठी ग्रंथ संग्रहालय
३०५
दा. क्र. २४३२२
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

- "रोटरी इंटरनॅशनलने" महत्कृत्य पारितोषिक (सिग्निफिकंट अचिव्हमेंट अवार्ड) देऊन गौरविलेला सेवा प्रकल्प.
- महाराष्ट्र सरकारच्या शिक्षण संचालनालयाने शैक्षणिक संस्थांना शिफारस करण्याच्या पुस्तक यादीत समाविष्ट केलेले व्यवसाय मार्गदर्शनपर मराठीतील अग्रगळे पुस्तक
- आपल्या संग्रही हवेच

'तुमचे भवितव्य तुमच्या हाती'

पृष्ठे : २८५ किंमत १५ रु.

यांत काय वाचाल ?

• १० वी पूर्वीपासून पदव्युत्तर विविध क्षेत्रातले अभ्यासक्रम, शिक्षणसंस्था • भारतातील विद्यापीठे, इंजिनियरिंग व मेडिकल कॉलेजेस • उपयुक्त पत्ते • कमवा आणि शिका योजना • लघु-उद्योगासाठी राखीव उत्पादने व सवलती • व्यवसाय मार्गदर्शनपर पुस्तके व व्य. मा. केंद्रांची माहिती • पालकांशी बातचीत • विद्यार्थ्यांशी हितगुज वगैरे उपयुक्त माहिती

लेखक : सुधीर राशिंगकर

१२०६ ब/२५, शिवाजीनगर, पुणे ४११००४.

प्रकाशक : रोटरी क्लब ऑफ पूना मिडटाऊन

प्रमुख विक्रेते : उत्कर्ष बुक सर्व्हिस

डेक्कन जिमखाना, पुणे ४११००४.